होईल काय! उभयतांची भेट होण्याचो खोटी की कापूर जळून ज्योतच होऊन जातो. (त्याप्रमाणे काम-क्रोध-वृत्ती रूपी ज्योतीशी श्रवण, मनन व समाधीरूपी कापूराचा समागम झाला की त्या ज्योतीत कापराप्रमाणे ते एकदम जळून जातात.) श्रुती व स्मृती यांनी मना केलेल्या (अविहित) दुष्कर्मांत जो सदा (अविरत) लोळत असतो व ज्याला आपले योग्य व अयोग्य (विहित व अविहित) कर्म (कर्तव्य) कळत नाही तो ज्ञानी असून स्वत:चे कोणते हित साधेल! तसेच जो नेहमी अशांत असून, ज्याचे अंत:करण अस्वस्थ आहे व इंद्रियांच्या चंचलपणाने ज्याचे चित्त क्षुब्ध (इंद्रिय+लौल्यें विक्षिप्त+चित्त) आहे, तो ज्ञानाने परिपूर्ण (निवृत्त) होऊ शकत नाही. (पहा मागच्या अ. १६ तील ओ. १४३-१४४ आणि त्यावरील टीका.) ज्याच्या चित्तास समाधान आहे, जो गुरुचा शिष्य (गुरु+पुत्र) असून सदाचारी आहे, ज्याचे आत्म्यावरील ध्यान निश्चल आहे, तोच एक ज्ञानसंपन्न होऊ शकतो. (ओ. १५-२७)

संसारात असो किंवा मोक्ष मिळविण्याच्या खटपटीत असो, शेवटी तर निजधामीच (स्वस्थानी, म्हणजे ईश्वराकडेच) जायचे आहे. शरीररूपी रथाचा तू मालक (स्वामी) हो! नुसता वडवड करणारा (वाग्मी) काय करू शकेल! येथे नुसते तोंड चालविणाऱ्याला जागा नाही. अभ्यास (मेहनत) हेच खरे सार आहे. शरीराला रथाच्या ठिकाणी लाव व तू त्यात स्वस्थपणे बैस. या स्वत:च्या शरीराच्या रथाचा आपल्या बुद्धीला सारथी (रथ हाकणारा) कर व स्वत: मालक होऊन शांत चित्ताने रथात बैस. मग विषयभोगांच्या अनेक मार्गांची बिकट परंपरा (दुर्गमरूप रसमार्ग+राजी) ओलांडायला सारथ्याला सांग आणि मनरूपी लगामाने (प्रग्रहामार्जी) दहा इंद्रियरूपी दाव नसलेल्या अविचारी (उच्छृंखल=उत्+शृंखला) घोड्यांना (वाजी) आवरायला लाव. घोडे जरी सैरावैरा धावले तरी लगाम त्यांना आपल्या जागी ठेवील. अशी ती लगाम सारथ्याच्या हातात सोपवून तू खुशाल स्वस्थ चित्ताने बैस. सारथी कुशल व निपुण असला तरच घोडे करसूत चालतात; परंतु तोच मनरूपी लगामाच्या आधीन (इच्छेप्रमाणे चालणारा) असला तर ते घोडे बलहीन होतात (पुढे चालण्यास असमर्थ होतात). जेथे विवेकयुक्त बुद्धीचे सारथ्य (रथ चालविणे) आहे, ज्याचा मनावर ताबा आहे (समनस्क) व ज्याचे चित्त एकाग्र झालेले (समाहित) आहे, त्यालाच परमपद (निज+धाम) प्राप्त होते. इतर लोक मार्गात थकतात. ज्याचे मन कधी ताब्यात नसते तो त्या पदापर्यंत पोहचतच नाही (न+तत्+पद+अभिगमन) व त्याला संसाराचे फेरे चुकत नाहीत. (पहा कठोपनिषद, अ. १, वल्ली ३, मंत्र ३, ४ व ९. **आत्मानं रथिनं विद्धि, शरीरं रथमेव तु। बुद्धिं तु सारथिं विद्धि, मन:प्रग्रहंमेव च॥** हे नचिकेता! तू आपल्या जीवात्म्याला रथाचा स्वामी, म्हणजे रथात बसून चालणारा मालक समज व शरीराला रथ समज. बुद्धीला सारथी, म्हणजे रथ हाकणारा आणि मनाला घोड्यांची लगाम समज. **इंद्रियाणि हयानाहु: विषयाँस्तेषु गोचरान्। आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिण:॥** ज्ञानीलोक इंद्रियांना या रथाचे घोडे म्हणतात, विषयांना त्या घोड्यांना भटकण्याचे विविध मार्ग म्हणतात आणि शरीर, इंद्रिये व मन यांच्यासह राहणारा जीवात्माच सर्व विषयांचा भोक्ता आहे, असे म्हणतात. **विज्ञान सारथिर्यस्तु मन: प्रग्रहवान् नर:। सोऽध्वन: पारमाप्नोति तद्विष्णो: परमं पदम्॥** ज्या मनुष्याची विवेकशील बुद्धी सारथी असेल व मनरूपी लगामाला ताब्यात ठेवणारी असेल, तो संसारमार्ग पार करून सर्वव्यापी परब्रह्म पुरुषोत्तमाचे (विष्णुचे) सुप्रसिद्ध परमपद प्राप्त करतो. हे जीवात्मा व शरीराच्या संबंधाचे सुंदर रूपक अध्यात्मात फार प्रसिद्ध तर आहेच; परंतु हेमाडपंतांनाही ते इतके आवडलेले आहे की त्याचा पुनरुच्चार त्यांनी अ. ३९, ओ. ८४-८६ आणि अ. ४९, ओ. १७४-१८३ यांत पुढे केलेला आहे.) (ओ. २८-३५)

असे ते मोठे परमपद आपण होऊनच जसेच्या तसे प्रगट होते व ते कोठे आहे, याची शंका फिटते. येथे तर्कवाद (बुद्धिप्रामाण्यवाद), अनुवाद (स्पष्टीकरणासाठी पुनरावृत्ती), प्रवाद (अफवांची बोलणी) किंवा संवाद (प्रश्नोत्तररूप संभाषण किंवा चर्चा) चालत नाही. येथे ईश्वरकृपेनेच दाद लागते (तक्रार दूर होते). वादविवादांचा काही उपयोगच होत नाही. येथे तर्काची चतुराई (अनुमान करण्याचा चटाईतपणा) चालत नाही. तर्कज्ञाची (तर्क करणे जाणणाऱ्याची) बुद्धी कुंठित होते (अडखळते). भोळा भावच सिद्धीस जातो. हीच येथली नवलाई (आश्चर्य) आहे. उत्तम प्रकारच्या (सम्यग्) ज्ञानाला जो कारण, तो मार्ग वेगळा (गति आन) असतो व ती बुद्धीही वेगळी असते आणि ते उत्तम ज्ञान देणारा शास्त्रज्ञही वेगळाच असतो, हे लक्षात ठेवावे. हे अमूल्य शरीर वाया चालले आहे. धनाची तृष्णा (हाव) ही दुपारच्या सावलीसारखी फार टिकणारी नाही व हरीची माया पार करण्याला अवघड आहे, हे सर्व जाणून संतांच्या पायी लागावे (त्यांनाच शरण जावे). संत हे संसाररूपी सागर पार करण्याची नौका (तारू) आहेत. त्यातील तू एक प्रवासी (उतारू) हो! त्यांच्याशिवाय पलिकडल्या काठावर नेण्याला कोण बरे समर्थ आहे! विवेक (सदसद्विवेक किंवा चित्तवृत्ति निरोध) आणि वैराग्य (विषयसुखांचा किंवा प्रापंचिक इच्छा-आकांक्षांचा त्याग) या जोडीला जो एकत्र बांधून (सांगड) ठेवील तो भारी मूर्ख (जडमूढ) दगड असला तरी त्याला संसाररूपी सागर (भव+सिंधु) पार करणे अवघड जाणार नाही. (सारांश, विवेक व वैराग्य ही दोन्ही महत्त्वाची आहेत. पहा एकनाथी भागवत, अ. २३, ओ. ४३९. **वैराग्य विवेकावीण आंधळें। विवेक वैराग्याहून पांगळें। ते माझें हृदयीं जावळीं फळें। एक वेळे उपजविलीं॥३९॥**) भगवंताचे ऐश्वर्य सहा गुणांचे आहे. (यश, श्री, औदार्य, कीर्ती, ज्ञान व वैराग्य.

पहा एकनाथी भागवत, अ. ३१, ओ. ३५०) त्यातील 'वैराग्य' हे खरोखर मुख्य ऐश्वर्य (प्रथम+ऐश्वर्य साचे) आहे. जे महाभाग्यवान असतील त्यांच्याच वाट्याला हे येते; इतरांच्या नव्हे. शास्त्राने योग्य ठरविलेले (विहित) कर्म केल्याशिवाय चित्त (मनोविकार, राग इत्यादींचे अधिष्ठान मानलेले हृदयस्थान) शुद्ध होत नाही आणि जोवर चित्तशुद्धी होत नाही, तोवर ज्ञान संपादन होत नसते. म्हणून ज्ञानप्राप्तीचे मूळ कारण कर्म हेच जाणावे. नित्य (रोज करण्याची देवपूजा, उपासना, पंचकर्म वगैरे), नैमित्तिक (ठराविक वेळी व प्रसंगी करण्याची, उदा. वर्षश्राद्ध) कर्मे आचरल्याने (चित्ताचा) मळ धुऊन निघतो. अशाप्रकारे शुद्ध झालेल्या चित्तात विवेक व वैराग्य यांची उत्पत्ती होऊन शम, दम वगैरे ब्रह्मज्ञान प्राप्त करण्याच्या साधनसंपत्तीचा (ह्या सहा आहेत. शम म्हणजे मनाचा निग्रह, दम म्हणजे इंद्रियांचा निग्रह, उपरति म्हणजे बाह्य प्रवृत्तिपासून निवृत्ति किंवा विषयभोगांबद्दल अरुचि, तितिक्षा म्हणजे दुःखाच्या निवारणासाठी काही उपाय केल्याशिवाय किंवा त्याच्याबद्दल चिंता व पश्चात्ताप व्यक्त केल्याशिवाय ते सहन करण्याची शक्ती, श्रद्धा आणि समाधान) लाभ होतो व याच देही (विदेह) मुक्ती प्राप्त होते. फलाच्या इच्छेचा व संकल्पाचा त्याग करून व मन एकाग्र करून जो सद्गुरुला अनन्यपणे शरण जातो त्याला सद्गुरु पदरी घेतो. ज्याने इंद्रियांच्या बाहेरच्या प्रवृत्ती टाकलेल्या आहेत व जो अनन्य व भाविक भक्त आहे त्यालाच आत्मज्ञानाचा लाभ होऊन तो शहाणा (प्रज्ञ) होतो. इतर उपाय त्याठिकाणी चालत नाहीत. मात्र आत्मज्ञान प्राप्त झाल्यावरदेखील जर तो अधर्माच्या मार्गाचे आचरण करील तर खाली या पृथ्वीवर (अत्र) किंवा वर स्वर्गात (परत्र) न राहता त्रिशंकूसारखा मध्येच लोंबकळत राहील. जीवाची जी (आपण शरीर आहोत; आत्मा नाही) ही अज्ञानाची वृत्ती तीच संसाराकडे त्याला प्रवृत्त करते. आत्मज्ञान (आपण विनाशी शरीर नसून अविनाशी आत्मा आहोत व त्याची परमात्म्याशी एकरूपता आहे, असे ज्ञान) प्राप्त झाल्यावर तोच जीव संसारातून निवृत्त होतो. आत्म्याला जाणलेल्याला (आत्मज्ञ) अहंभाव (मीच सर्व कर्मांचा कर्ता आहे, असा अभिमान) कधीही नसतो, पुण्य (धर्म) किंवा पाप (अधर्म) नसते व शुभ किंवा अशुभही नसते. त्याला या संसारातील लाभ व नुकसान (हित+अहित) यांच्याशी काय करायचे आहे! देहाची अहंकारी वृत्ती शांत झाली की तेथेच तात्काळ निवृत्ती (जगातील सर्व उपाधींची उपेक्षा) घर करते (संचली) व तीच जीवाची परमात्म्याशी एकरूप झाल्याची स्थिती होय, ही खूण निश्चित मनात बांधून ठेवावी. प्रवृत्तीच्या ठिकाणी शत्रु व मित्र असतात. निवृत्तीचे तर नवल हे की मीच मी सर्वत्र आहे, असे पाहणाऱ्याला शत्रुत्व किंवा मित्रत्व ते कुठले! अशा महान सुखापुढे देहाचे महान दुःख ते काय बापुडे (त्याची कोण पर्वा करतो)! जेव्हा महान सुख आवडायला लागते तेव्हा ऐहिक (प्रपंचातील) सुखासाठी कोण वेरं रडेल! ऐहिक दुःखांचा डोंगर जरी त्यावर कोसळला तरी केवळ धैर्याचा तो पर्वतराज (गिरिवर) लवभरसुद्धा हलत नाही. भगवंत ज्यावर प्रसन्न होतो त्यालाच मग तो वैराग्य देतो, त्याची विवेकाशी सांगड घालून (संबंध जोडून) देतो व भवसागर पार उतरवितो. आरशात (आदर्शी) उठणाऱ्या चेहऱ्याच्या प्रतिबिंबाप्रमाणे आत्म्याच्या स्पष्ट दर्शनाची जो इच्छा (हेतू) धरतो त्याला खालची ही पृथ्वी (भू+लोक) किंवा वरचा ब्रह्मलोक यांशिवाय तिसरी जागाच नाही. यज्ञ केल्याने (यागी) देवतांची तृप्ती झाली की पितृलोकाची प्राप्ती होईल, कर्मफलांच्या उपभोगाचा (उपभुक्ति) लाभ होईल; परंतु आत्मज्ञान लाभणार नाही. गंधर्वलोक (भूवर्लोक किंवा अंतरिक्ष), महर्लोक, जनर्लोक, तपर्लोक व सत्यलोक (पहा अ. १, ओ. ४ मधील १४ भुवनेवरील टीका) यांमधील आत्मदर्शन अतिशय अस्पष्ट (अविविक्त) असते. म्हणून ज्यांना आत्मदर्शनाची आसक्ती असते ते भूलोक (या पृथ्वीवरील आयुष्य) भरपूर मागतात (यथोक्त वांच्छिती); (कारण) येथेच चित्तशुद्धी होते, आरशासारखी निर्मळ बुद्धी लाभते आणि त्यात शुद्ध व पवित्र आत्मस्वरूप प्रतिबिंबित होते. दुसरे स्थान जे ब्रह्मलोक, तेथेही आत्मदर्शन (आत्मा+अवलोकन) होते; परंतु त्यासाठी तेथे अनेक प्रकारचे प्रयत्न (सायास) करावे लागतात. तो ब्रह्मलोक अतिशय (अतितर) कष्टकारक आहे. तेथे सापाप्रमाणे माया (ईश्वराची मोह घालणारी शक्ती) वेटाळते, आतून आतडी पूर्णपणे (अक्षी) पिळते व बाहेरूनही सर्व शरीर कवटाळते. तिला टाळण्यास कोण समर्थ आहे? (ओ. ३६-६२)

"खिशात पन्नासपट (बाबांना हातउसने हवे असलेल्या पाच रुपयाच्या पन्नासपट, म्हणजे अडीचशे) रुपये असताना तुम्ही बसल्या बसल्या सर्व पाहता? काढा पाहू बाहेर आता. ब्रह्म तर तुमच्याच खिशात आहे", असे बाबा त्या ब्रह्मजिज्ञासूला म्हणताच त्याने हात घालून खिशातून पुडके बाहेर काढले व मोजताच दहादहाच्या पंचवीस नोटा निघाल्या. हे पाहून तो गृहस्थ मनातल्या मनातच ओशाळला (विरघळला) व "केवढे महाराज अंतर्ज्ञानी", असे आश्चर्य करीत त्याने बाबांच्या चरणांवर मस्तक ठेवले आणि आशीर्वचनांची उत्कंठेने वाट पाहू लागला. मग बाबा त्याला म्हणाले, "गुंडाळ (गोळा करून आवर) आपले ब्रह्मगुंडाळे (ज्यात ब्रह्माचे सार गुंडाळून ठेवले आहे ते बाटोळे, भेंडाळे किंवा बंडल). लोभाचे बाटोळे (नाश) झाल्याशिवाय तुला ब्रह्म मिळणार नाही. पुत्र, पशु वगैरे आणि धन कमावणे (वित्त+अर्जन) यातच ज्याचे मन आसक्त आहे त्याचे द्रव्यरूपी विघ्न (व्यवधान) दूर झाल्याशिवाय त्याला ब्रह्मज्ञान कुठले प्राप्त व्हावयाला! द्रव्याचा मोह फार कठीण असतो. जणूकाय तृष्णा (अतिकामना किंवा लोभ) रूपी भोवरे (आवर्त) असलेला दुःखाचा डोहच, म्हणजे नदी किंवा तळे यातील खोल पाण्याची जागाच (दुःख+गाह). त्यातील मद (गर्व) व मत्सररूपी मगराच्या (मकर) अस्तित्वामुळे सहन करण्यास तो कठीण (दुःसह) असतो. एक निस्पृहच (कसलीही तृष्णा किंवा

इच्छा नसलेलाच) तो पार करू शकेल. लोभाशी ब्रह्माचे अखंड वैर असते. तेथे मनाच्या एकाग्रतेला (ध्यानाला) थारा नसतो. मग कुठली मुक्ती आणि संपूर्ण विरक्ती (विषयसुखांबद्दल अनासक्ती)! खरोखर लोभिष्ट माणूस आचारभ्रष्ट (विहित धर्मकृत्ये न करणारा) असतो. लोभाच्या ठिकाणी शांती नसते, समाधान नसते व निश्चिंतताही नसते. चित्तात एक लोभ जरी ठाण करून बसला तरी परमार्थाची सर्व साधने मातीत जातात. श्रुती व स्मृती यांनी अयोग्य ठरविलेले, जे मनाई केलेले पापाचरण (निषिद्ध+दुष्चरित) यातच जो सदैव आसक्त असतो त्याचे चित्त स्वस्थ नसते (असमाहित+चित्त तो). त्यालाच "विक्षिप्त-चित्त" (ज्याचे चित्त गोंधळलेले आहे असा) म्हणतात. तो सदा दुष्कर्मांत गढलेला असतो, विषयरूपी चिखलात लोळत असतो व आपले हित व अहित पाहत नसतो. ब्रह्मविज्ञान (दृश्यमात्राचा लय होऊन एकच अद्वितीय ब्रह्म या जगात आहे, असा अनुभव) प्राप्त होऊनही ज्याला कर्मफलाची विरक्ती किंवा अनासक्ती नसेल (निर्विण्ण) तर फुकट त्याचे ब्रह्मविज्ञान; त्याला (खरा) आत्मलाभ झालेलाच नाही. कोणी काही मागावयाला आला तर संत आधी त्याचा परमार्थासाठी अधिकार (योग्यता) पाहतात व मग जशी ज्याची योग्यता किंवा अयोग्यता असेल तसेच त्याला ते देतात. ज्याच्या मनात रात्रंदिवस देहाचा अभिमान व विषयांचे चिंतन असेल त्याला गुरुच्या उपदेशाचा प्रयत्न व्यर्थच (शीणच) असतो आणि त्याचे प्रपंच व परमार्थ ह्या दोन्हींचे नुकसानच असते (व्यर्थ नागवण उभयार्थी). चित्तशुद्धी झाल्याशिवाय जो परमार्थात शिरू पाहतो त्याचे ते नुसते ज्ञानाचा दिमाख दाखविणे (ज्ञानगर्वाची मिरवणूक) असते. त्यातून काहीच निष्पन्न होत नसते. म्हणून रुचेल (ज्याचा परिणाम होईल) तेच बोलावे (उपदेश करावा) आणि पचेल तितकेच खावे. नाहीतर फुकट अजीर्ण मात्र होईल, हे सर्वांना ठाऊकच आहे. माझे भांडार (खजिना) भरपूर आहे. जे जे ज्याला पाहिजे (चाहे) ते ते त्याला मी देईन; परंतु घेणाऱ्याची शक्ती पाहिजे. मी तर घेणारा सहन करू शकेल (साहे) तितकेच त्याला देतो. हे जर लक्ष देऊन ऐकाल तर तुमचे कल्याण होईल. या मशिदीत बसून मी खोटे बोलत नसतो." (ओ. ६३-७९)

ही संतवाक्यरूपी अमृताची जणूकाय नदीच (संतवाक्य+सुधा+सरिता) आहे. त्यात श्रद्धेने (भावार्थे) बुडी देताच पापरूपी मळ धुऊन निघाला (क्षाळण होता) म्हणजे अंत:करणाची व आचरणाची (अंतर+बाह्य) पवित्रता प्राप्त होते. साईबाबांच्या अशा महिम्याचे वर्णन करू जाता त्याला अंतच येत नाही. ज्याला जोडच नाही (निर्+उपमा) त्याला उपमा तरी कसली द्यावी! बाबा निर्व्याज, म्हणजे ढोंगाशिवायच्या (शुद्ध) प्रेमाच्या आधीन असतात. ते सगळ्यांची 'माऊली (आई)' आहेत. दु:खाने पिडलेल्यांचे व कष्टाने थकलेल्यांचे (आर्त+श्रांतांची) विश्रांतिस्थान आहेत. आश्रयाला आलेल्यांचे ते (सर्व इच्छा पुरविणारे) कल्पवृक्ष आहेत व दीन-दुबळ्यांसाठी (सुख देणारी) सावली (छाया) आहेत. संसारावर पाणी सोडून, पर्वतांच्या गुहांमध्ये (गिरिकपाटी) एकांतवास पत्करून व मौन (न बोलण्याचा नेम) धरून, फक्त स्वत:च्या कल्याणासाठी तत्पर (दक्ष) असणारे संत पुष्कळ असतात. ते केवळ आपला स्वार्थ व परमार्थ साधतात. त्यांना इतरांची काय काळजी (अर्थ)! परंतु साईबाबा तसले संत नव्हते. आप्तेष्ट (स्नेहीसोबती) व गणगोत (सगेसोयरे) नसताना आणि घरदार व स्त्री-पुत्र (जाया+सुत) नसतानादेखील ते प्रपंचात (संसारात) रहात होते. पाच घरी मूठमूठ (कर+तल) भिक्षा मागून चोवीस तास (अष्टौ+प्रहर) झाडाखाली (तरु+तल) वस्ती करून, तुटपुंज्या (थिटचा) संसाराचा पसारा मांडून ते लोकांना व्यवहार शिकवित होते. स्वत: ब्रह्मस्थिती प्राप्त केल्यावर जनतेच्या कल्याणासाठी झिजणारे महाज्ञानी संत या जगात फारच थोडे (विरळा) असतात. धन्य तो देश, धन्य ते कुळ, धन्य ते निष्पाप (निर्मळ) आईबाप आणि धन्य त्यांच्या पवित्र (स+उज्ज्वल) कुसवा (गर्भाशय) की ज्यांच्या पोटी असे हे शुद्ध (निर्मळ) रत्न जन्मास आले (प्रसवले). काहीही प्रयत्न केल्याशिवाय (अनायासे) परीस (ज्याच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते असा एक काल्पनिक दगड) सापडावा व तो दगड समजून बऱ्याच लोकांनी (बहुतांनी) दूर फेकून द्यावा, तसेच या श्रेष्ठ भागवताला (साक्षात् ईश्वराशी संबंध असलेल्याला) या शिरडीत बहुत काळ कोणी ओळखले नाही. उकिरड्यावर पडलेले रत्न पोराबाळांना सापडले म्हणजे ते जसे वाटेल तेथे फेकतात व खुशाल दगडासारखे पायाखाली तुडवितात (तसेच साईबाबांच्या बाबतीत सुरुवातीला झाले होते). (ओ. ८०-९०)

असो. याप्रमाणे तो ब्रह्मज्ञानाची आवड असणारा (भोक्ता) गृहस्थ (नुसत्या) आशीर्वचनाने तृप्त झाला. तुमची आमची सर्वांची हीच तऱ्हा (गत) असते. मार्ग कष्टदायक (विकट) असला की सोडून द्यायचा (ब्रह्मज्ञान मिळविणे एवढे विकट ना! मग ते आपल्याला नको). जोवर शब्द ऐकणे, स्पर्शाची जाणीव (संवेदन) होणे, सुगंध घेणे (आमोदा घ्राणन), उघड्या (बाह्य) अंगाचे दर्शन घेणे वगैरे इंद्रियगम्य (बाह्य) विषयांचे उपभोग घेणे असते, तोपर्यंत विषयांना प्रतिबंध (विरोधन) करणे शक्य नसते. इंद्रियांचा निग्रह (निरोधन) झाल्याशिवाय सहजिकरीत्या येणारी विषयसुखांपासून विरक्ती (स्वभाव+प्रवृत्त+परावर्तन), अंतरात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन (प्रत्यक्+रूपाचे अवलोकन) किंवा त्याचे यथार्थ ज्ञान (तत्+बोधन) अशक्य असते. आधी सर्व ईषणांचा (इच्छा तीन प्रकारच्या असतात; वित्तैषणा, पुत्रैषणा व लोकैषणा, म्हणजे सत्तेची किंवा मानपानाची इच्छा) त्याग करतो व मग सद्गुरुला अनन्यपणे शरण जातो, असा जो दृढ श्रद्धायुक्त साधक असतो तोच आत्मसाक्षात्काराला पात्र होतो. श्रोत्रादि (कान वगैरे) पाच इंद्रिये जेव्हा आपापल्या विषयांना सोडतील, मन जेव्हा संकल्प (एखादी गोष्ट करण्याचा बेत

करणे) व विकल्प (मग लगेच त्या गोष्टीबद्दल संशय घेऊन ती करण्यास घुटमळणे) स्वतःहूनच सोडून देईल आणि अशाप्रकारे प्रत्येक गोष्टीपासून निवृत्त झालेल्या अंतःकरणात बुद्धीदेखील जेव्हा आपली निश्चय करण्याची हालचाल (व्यापार) बंद करील, तेव्हा तीच खरी अत्यंत उत्कृष्ट अवस्था (परम+गति), म्हणजे मोक्ष होय आणि तीच कधीही न बदलणाऱ्या (निर्विकार) ब्रह्माची प्राप्ती होय! (पहा कठोपनिषद, अध्याय २, वल्ली ३, मंत्र १०–**यदा पञ्चावतिष्ठन्ते, ज्ञानानि मनसा सह। बुद्धिश्च न विचेष्टति, तामाहुः परमां गतिम्॥१०॥** योगाभ्यास करताना जेव्हा मनासहित पाचही इंद्रिये चांगल्याप्रकारे स्थिर होतात व बुद्धीसुद्धा कोणत्याही प्रकारची चेष्टा करीत नसते, त्या स्थितीला योगीजन परमगती, म्हणजे योगाची सर्वश्रेष्ठ स्थिती म्हणतात.) ज्याच्या बुद्धीने कोणत्याही गोष्टीचा निर्धार करणे थांबविलेले असेल (निश्चय+शून्य) व ज्याच्या चित्तात मीच तो एकटा आहे, माझ्याशिवाय जगात दुसरे कोणी नाही, अशी स्फूर्ती (चैतन्य) प्रगटलेली असेल, तोच भाग्यवान आत्म्याला जाणेल. विषयांपासून तोंड फिरविले की इंद्रिये आत्म्याकडे तोंड करतील (आत्मोन्मुख) आणि तेव्हाच आत्मसुख प्रगट होईल. इतर सर्व सुख नव्हेच (असुख ते). जे विषयांच्या क्षुब्ध मनोवृत्तींखाली दडलेले आहेत (विषय+विकार+प्रच्छन्न) त्यांना अतिसूक्ष्म व अस्पष्ट (दुर्दश) असे जे परमानंद प्राप्तीचे साधन, म्हणजे आत्मज्ञान ते समजण्यास फार कठीण असते (अति गहन आकळाया). या लोकाच्या व परलोकाच्या (इह+अमुत्र) गोष्टींमध्ये, ब्रह्मदेवाच्या अधिकार पदापर्यंतच्या सर्व गोष्टींबद्दलही ज्याला आसक्ती नसेल तोच एक ब्रह्मनिष्ठपदावर (ब्रह्माशी एकरूप झालेल्या अधिकारावर) अभिषिक्त (विधिपूर्वक बसविलेला) व मुक्त (मोक्ष पावलेला) जाणावा. चित्ताला विषयांपासून हळूहळू माघारी (माघौते) फिरवून स्वस्वरूपी स्थिर करून आत्मज्ञान जोडावे. या लोकी व परलोकी (कर्म) फलांची विरक्ती आणि हर्ष, शोक यांसारख्या द्वंद्वांचा त्याग याचा बुद्धिमंत लोकच अनुभव (भोग) घेतात व हाच तो आत्मज्ञानाचा मार्ग (योग) होय! (ओ. ९१-१०२)

आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक दुःखरूपी वडवानलाच्या (समुद्रातील अग्नीच्या) संपूर्ण (निखिल) ज्वाळांनी अतिशय तापलेल्या संसाररूपी सागराच्या पाण्यात (संसार+अर्णन+उदकीं) कोण बरे सुखी असेल! त्यातून आपली संपूर्ण सुटका (निज+सम्+उद्धरण) करून घेण्यासाठी साईबाबांची कृपा संपादन करावी आणि त्यांच्या चरित्राचे आदरपूर्वक वाचन (अवलोकन), श्रवण व मनन करावे. हे श्री साईनाथांचे चरित्र श्रोत्यांनी आपल्या पुत्र, मित्र व पत्नी (कलत्र) सह ऐकले तर या लोकीचे व परलोकीचेही इष्ट साध्य होईल. बाबांची लीला अनेक तऱ्हेची (विचित्र) आहे. भाग्यवान श्रद्धाळू श्रोतेच ह्या कथा ऐकणारे आहेत. ही कथा हळूवारपणे श्रवण केली तर शांततेलाही शांतता येते (मनाची शांतता आणखी वाढते). या कथारूपी झऱ्याच्या प्रवाहात (कथा+निस्यंद+निर्झरें) चांगले व वाईट हे दोन्ही कर्मरूपी मीठ (कर्म+अकर्म+लवण) विरघळून जाते आणि कानांच्या द्वारे साईबाबांचे सुंदर (साजिरे) रूप डोळ्यात शिरते. या चरित्राच्या श्रवणाने पातकांचा ऱ्हास होतो, काळाशी (मृत्यूशी) देखील झगडून विजयी होण्याची तयारी (काळावरी कास) होते आणि श्रोत्यांना अत्यंत श्रेष्ठ आनंद (परम+उल्हास) विनायासे प्राप्त होतो. श्रवणाने अंतःकरण शुद्ध होते. श्रवणाने जन्ममरण चुकते. श्रोत्यांनी जर त्या श्रवणाच्या फलाची इच्छा न ठेवता जर ते (श्रवण) ब्रह्मार्पण (ईश्वराला अर्पण) केले तर त्यांना ब्रह्मपण प्राप्त होते. असा हा साईबाबांच्या सेवेचा उद्योग (सेवा+काम) सेवकांना सदा इच्छारहित (निष्काम) करील व श्री साईराम आपल्या भक्तांना सर्वदा आराम (स्वास्थ्य किंवा दुःखांपासून मुक्तता) देईल. श्रोते हो! या ग्रंथाचा एक एक अध्याय घेऊन (भागशः) दररोज त्याचे वाचन, श्रवण, मनापासून अभ्यास (परिशीलन), मनन आणि सतत चिंतन (निदिध्यासन) करा. "**आनंदो ब्रह्मेति व्यजानात्**" (आनंद हाच ब्रह्म आहे, हे निश्चितपणे जाणले) असे जे तैत्तिरीय उपनिषदात (वल्ली ३, अनुवाक् ६) प्रसिद्ध आहे, त्याच श्रुतिसिद्धांताचा (निर्णीत) अर्थ बाबा आपल्या भक्तांना जणूकाय दुसऱ्या शब्दांत सांगत (अनुवादत) होते. त्यांचा नेहमी उपदेश असे, "जराशीदेखील फिकीर (काळजी) करू नये, सदा आनंदित रहावे आणि मरेपर्यंत चिंता करू नये." (ओ. १०३-११३)

असो. या अध्यायाचा रोख (धोरण) ब्रम्हतत्व स्पष्टपणे जाणून घेणे (निर्धारण) हा आहे की ज्यामुळे साईबाबांना शरण जाणाऱ्याला ते संसाररूपी सागर पार करून नेण्याची नौका होईल. दुसऱ्यांना वारंवार त्यांच्या हिताच्या गोष्टी सांगाव्यात, त्यांच्यावर सदा उपकार करावेत. ह्या (शास्त्र) वचनांचे अनुकरण (अनुकार) करून बाबा स्वतः त्याप्रमाणे वागत असत. हे चांगले की हे वाईट (संयुक्तिक का असंयुक्तिक), हा मतभेद केवळ व्यक्तीव्यक्तींचा असतो. ज्यामुळे सर्वसामान्य जनतेला आनंद (तोख) होईल त्याकडेच या ग्रंथाचा रोख आहे व हाच येथला ठरविलेला हेतू (प्रयोजन) आहे. बाबा कोठल्याही कार्याचे कारण जाणतात. जशी ज्याच्या मनाची इच्छा असते तसेच होणारे होते (होण्यमाणही तैसेंच). गुरुच्या तोंडच्या कथा ऐकाव्यात, त्यांच्या अतर्क्य (कल्पना न करता येणाऱ्या) लीला अनुभवाव्यात, आठवतील त्या गोळा करून (संग्रही) ठेवाव्यात आणि मग इतरांना ऐकवाव्यात. साईबाबांचे हे सुंदर चरित्र अत्यंत आदराने श्रवण केले असता, श्रोते आणि वक्ते यांचे दुःख (दैन्य) नष्ट होते आणि इतर सर्वांचे वाईट दिवस (दुर्दिन) संपून जातात (ओसरे). बाबांची अलौकिक लीला पाहून जो चकित झाला नाही, केवळ दर्शनानेच ज्याचे मन शांत झाले नाही व जो त्यांच्या पदकमली नम्र झाला नाही, तो अभागीच म्हणावयाचा. साईबाबांच्या गोष्टी (चरित) निर्मळ (विशद) आहेत. त्या उदार (प्रशस्त) मनाने

(कंटाळा न करता) ऐकावयाच्या असतात. अशी आलेली सुखाची संधी कोण बरे फुकट घालवील! (ओ. ११४-१२१)

स्त्री, पुत्र व मित्ररूपी हा भोवरा (आवर्त, म्हणजे नदीच्या प्रवाहातील गोलगोल फिरणारे पाणी, ज्यात अडकले की पोहणाऱ्याला बाहेर निघणे अत्यंत अवघड असते) काम, क्रोध वगैरे सुसरींनी (मगर, म्हणजे एक जलचर प्राणी ज्याने पकडल्यावर त्याच्या मिठीतून सुटणे अशक्य असते) भरलेला (ग्राह+युक्त), नाना रोगरूपी तिमिंजल नावाच्या मोठ्या मांसाने आणखी वाढलेला (उज्जृंभित) आणि आशारूपी मोठ्या लाटांनी (कल्लोळी) खवळलेला (उद्वेलित) आहे. कित्येकदा उद्वेगाचा (खिन्नतेचा किंवा त्रासून गेल्याचा) झटका येऊन जातो, हर्ष, शोक वगैरे द्वंद्वांनी मनात संशय (खटका) उत्पन्न होतो (अनिश्चिततेची खळबळ उठते); परंतु चट्कन (स्त्री, पुत्रांचा) संबंध (तटका) तोडवत नाही. स्वतःच आपल्या जीवाला (जीवात्म्याला) समजावून जागे करावे (बोध करावा) की तूच शुद्ध ब्रह्म आहेस. देहाच्या सहवासाने वसण्यासाठी दिलेल्या नळीला पायांनी घट्ट धरून आपल्याला उलटा टांगून घेणाऱ्या पोपटाप्रमाणे (नलिका+पिनद्ध शुक जैसा) तू स्वतःच बद्ध झालेला आहेस. केवळ मोहमायेने (प्रेमाच्या व ममतेच्या अतिरेकाने) तू तुझी बुद्धी गमावली आहेस (भुललासि) व त्यामुळे स्वतःचे हित विसरला आहेस. तुझा तूच सावध हो आणि स्वस्वरूपाकडे चट्कन (परत) ये (स्वतःचे खरे स्वरूप जाणून घे). खोट्या समजुतीमुळे (भ्रमामुळे) मनाचा गोंधळ (भ्रम) वाढतो आणि मी देह आहे व मीच कर्ता आहे, वगैरे खोटा अभिमान (अहंकार) वाढतो. 'मी मम' (मी आणि माझे) हे मृगजळासारखे फसवे आहे, हे जाणून निर्मम व्हावे (सर्व गोष्टींबद्दल ममत्व किंवा मालकीपणाची आसक्ती सोडून द्यावी). हे पोपटा! या मी-तू-पणाच्या घोटाळ्यात (प्रपंचात) कशाला गुंतावे! तू आवळलेले पाय सोड आणि उंच उडत जाऊन चैनीने आकाशात संचार कर की! मुक्त माणसाकडे बद्धता येऊ शकते व बद्ध माणूस मुक्त होऊ शकतो. दोन्ही दशांपासून वेगळा होऊन तू शुद्ध स्वस्वरूपातच रहा. हे ज्ञान तर साक्षेपतेचे (तुलनेचे) असते. सुख किंवा दुःख हे सर्व अज्ञान टाकून विज्ञान (ज्ञानाचा अनुभव) प्राप्त कर म्हणजे ब्रह्मज्ञान अगदी जवळच असेल. देहात जोपर्यंत मी-तू-पणा आहे तोपर्यंत तू स्वतःचे हित पाहणारा (देखणा) होणार नाहीस. तो (मी-तू-पणा) टाक, आपला कृपणपणा (देह पकडण्याचा चिकटपणा) दूर भिरकावून दे आणि आपल्या (खऱ्या) स्वरूपाकडे पहा (पाहीं आपआपणा). कुबेरासारखा श्रीमंत जर भिक्षा मागत फिरू लागला तर ते केवळ अज्ञानाने प्राप्त झालेले दुर्दैवच (नष्ट+चरित) नाही का! (जीवात्मा हा स्वतः सर्वव्यापी व सर्वज्ञ परमेश्वर असून तो आपणाला फक्त देहच मानतो, हे चुकीच्या समजुतीने, म्हणजे अज्ञानाने प्राप्त झालेले दुर्दैवच नाही का!) (ओ. १२२-१३१)

नित्य उत्तम शास्त्रांचे (ग्रंथांचे) श्रवण करावे, विश्वासपूर्वक सद्गुरुवचन पाळावे व सदा सावध राहून आपले ध्येय (अनुसंधान) लक्षात ठेवावे. त्यांनी (शास्त्रांनी व गुरुंनी) सांगितलेली आचारपद्धती लक्षात ठेवून लोक आपल्या उद्धाराचा मार्ग निवडतात (चोखाळती). त्यांच्या उपदेशाने असंख्य लोकांचा उद्धार होतो व त्यांचा (लोकांचा) मोक्षाचा मार्ग सुलभ होतो (सहज गति त्यांचेनी).

संसाराच्या बंधनातून सुटका होईल तो क्षण (घटका) कधी येईल अशी ज्याच्या मनात रात्रंदिवस चुटपुट (चटका) लागलेली असते तो (स्त्री-पुत्रांचे) बंधन (तटका) चट्कन (अवचट) सोडतो. साधवेल तो एकांत साधून, संसारात काही अर्थ नाही (निरर्थक) अशी मनाशी गाठ बांधून, अध्ययन व आत्मचिंतन यात सदा (चिरंतन) मग्न असावे. भक्ती व श्रद्धायुक्त मनाने, पूर्ण नम्रतेने, साष्टांग नमस्कार करून गुरुला शरण गेल्याशिवाय तो शिष्याला ज्ञानाचा ठेवा (केणें) देत नसतो. गुरुला सर्वस्वी अर्पण करून त्याची सेवा करावी, बंध व मोक्ष ह्या गोष्टी स्पष्ट करवून घ्याव्यात (विवरावी), विद्या व अविद्या याबद्दल त्याला प्रश्न करावेत म्हणजे गुरुमहाराजांकडून उत्तम फळ मिळते. आत्मा कोण, परमात्मा कोण हे गुरुशिवाय कोणाला सांगता येणार नाही. गुरुदेखील शिष्य पूर्णपणे शरण आल्याशिवाय ज्ञानाचा एक कणही देत नसतो. गुरुशिवाय इतर कोणी ज्ञान दिले तर ते संसारातून पूर्ण सुटका करणारे (निवर्तक) होत नसते, मोक्षाचे किंचितही फळ देणारे नसते व कधीही मनात ठसणारे नसते. म्हणूनच गुरुविना (ब्रह्म) ज्ञान नाही, हे सर्व विद्वान जाणतात. ब्रह्म व आत्मा यांच्या ऐक्याची सोय (अनुभवाची व्यवस्था) करायला गुरुचेच पाय समर्थ आहेत. तेथे आढेवेढे न घेता (न करितां अनमान), ताठ अभिमान टाकून, जमिनीवर दंडाप्रमाणे (लांब काठीप्रमाणे) सरळ लोटांगण घालून, गुरुच्या चरणी मान वाकवा आणि मनाचा निश्चय (धडा) पक्का करून गुरुचे पाय धरून तोंडाने म्हणा, "मी तुमचा दासानुदास आहे व मला तुमच्याच पायांचा भरंवसा आहे." मग पहा त्या गुरुचा चमत्कार!! तो गुरुरूपी दयेचा सागर (दया+अर्णव) डोलायला लागेल व आपल्या लाटांच्या शय्येवर (निज+शेजी तरंगाच्या) तुम्हाला वरच्यावर झेलील. आपला अभय (सुरक्षिततेची खात्री देणारा) हस्त तुमच्या डोक्यावर ठेवून इडापिडांना (सर्व संकटांना व दुःखांना) उध्वस्त करील आणि मस्तकाला उदी फासून पापाच्या सर्व राशी (ढीग) जाळून टाकील. (ओ. १३२-१४४)

अशाप्रकारे ब्रह्मार्थीला ब्रह्माचे निरूपण हे केवळ निमित्त करून बाबांनी जीवात्मा व परमात्मा यांच्या ऐक्यतेची खूण भक्तांना संपूर्णपणे कथन केली. मनात सहज शंका येईल की साई महाराजांची एवढी अचाट बुद्धिमत्ता (अतुल प्रज्ञा) व गाढ विद्वत्ता असताना थट्टेची एवढी प्रौढी (महत्त्व) कशासाठी

आणि विनोदाची बाबांना आवड कशाला? (ब्रह्मार्थीला ब्रह्मज्ञानासारखा गहन विषय समजावून सांगताना बाबांनी त्याच्या द्रव्यलोभाची सर्व लोकांसमोर थट्टा करून का बरे सांगावा?) परंतु विचार करून पाहिले तर त्याचे एकच समाधानपूर्वक कारण लक्षात येते. ते नीट ऐका. मुलाबाळांशी बोलताना, त्यांच्या बोबड्या बोलात रमून जाताना पोक्त माणसांच्या अलंकारिक व सभ्य शब्दरचनांच्या (प्रौढत्वाच्या) कथावार्ता कधी असतात का! ज्याची थट्टा केली जाते त्याच्यावर प्रेम नसते असे कधी म्हणता येईल का (वर्णू काय शकेल वैखरी)! परंतु उपदेश (बोध) करण्याची विनोद व थट्टा ही एक विशेष तऱ्हा आहे. आपल्या पोटात काय रोग आहे, हे काय तान्ह्या बाळाला कळते का! औषधाची गोळी (गुटी) ते हट्टी बाळ घेत नसले तरी त्याला कधी ओंजारून गोंजारून (कुरवाळून), कधी डोळे वटारून (नेत्र पिंजारून), कधी चवदाव्या रत्नाची (छडीच्या माराचा उपयोग करून) (चतुर्दश+रत्न+प्रयोजन), तर कधी प्रेमाने हृदयाशी धरून आईला ती (औषधाची गोळी) पाजावी लागते. परंतु तोच बाळ मोठा होऊ लागला की त्याचे लाड (कोड) करावेसे वाटले तरी त्याच्या तीव्र किंवा बोजड बुद्धीचा विचार करावा लागतो. ज्ञानाचे तसेच आहे. तीव्र (तीक्ष्ण) बुद्धीचे तीव्र ग्रहण असते. उपदेश ठरण्याला क्षणही लागत नाही. परंतु जड बुद्धीचे कामच विलक्षण असते. डोक्यात ठसवायला फार कष्ट पडतात. समर्थ साई हे ज्ञानाचे भांडार आहेत. ज्या भक्ताची जशी बुद्धी तशी त्याची पात्रशुद्धता ठरवून ते ज्ञानरूपी द्रव्य वाटतात. ते पूर्ण अंतर्ज्ञानी आहेत. त्यांना सर्वांची आधीच माहिती (जाण) असते. ज्याला जसे योग्य साधन तसेच त्याला नेम घालून देणे असते. जसा ज्याचा अधिकार तसा त्याचा विचार करून त्याच्या योग्यते किंवा अयोग्यतेप्रमाणे भक्तांची जबाबदारी बाबा घेतात (भक्तांचा भार बाबांना), तसेच आम्ही दिसायला जरी वयाने मोठे (थोर) असलो तरी त्या सर्व सिद्धी व ज्ञान प्राप्त झालेल्या (सिद्ध) साईसमोर लहानांहूनदेखील लहान (पोरांहूनि पोर) आहोत व थट्टेसाठी (विनोदीं) सदा आतुर असतो. बाबा विनोदाचे आगर (साठा) आहेत. ज्या ठिकाणी ज्यांची आवड असते ते ते त्यांना यथेष्ट पुरवून भक्तांना ते निश्चिंत किंवा समाधानी (अव्यग्र) ठेवतात. (हेतू हा की आपला उपदेश त्यांना नीट समजावा व त्यांच्या मनात सहज ठसावा) बुद्धिवान असो की मंदबुद्धीचा असो, हा अध्याय वाचला तर परमानंद प्रगटेल, ऐकला तर श्रवणाचा छंद वाढेल आणि मनन केला तर स्वानंदाचे समाधान लाभेल. त्याचे आवर्तन (पुन्हा पुन्हा पठण) केले तर परमार्थाचे ज्ञान होईल, निदिध्यासन (निरंतर चिंतन) केले तर मोठा आनंद (महद्+उल्हास) आणि अखंड व निर्धोक (निर्बाध) सुख प्राप्त होईल. अशी ही बाबांची लीला अमर्याद आहे. येथला यत्किंचितही अनुभव ज्याने भाग्यवशात् भोगला असेल तो येथे काया-वाचा-मनाने खिळलाच (चिकटलाच) म्हणून समजावा. (खरोखरच) साईबाबांची लीला अतर्क्य (कल्पना न करता येण्यासारखी आश्चर्यकारक) आहे. (ओ. १४५-१६१)

हेमाडपंत साईबाबांच्या चरणीं शरण आले आहेत. थट्टामस्करी करून ज्ञान वाटण्यात (विनोदमार्गे ज्ञान+प्रदान) भक्तांचे कल्याण करावे, हाच एक बाबांचा हेतू होता. ब्रह्मार्थी हा केवळ निमित्तच समजावा. पुढील अध्याय या अध्यायापेक्षाही गोड असेल व ऐकणाऱ्यांचे लाड पुरविले जातील. माझ्या मनाची (जीवीची) गुप्त इच्छा (होड) स्पष्टपणे उघड करून (फोड फोडून) पुरविली जाईल. मी माधवराव देशपांड्यांजवळ जाईन, त्यांना बाबांचा निरोप देईन व मग बाबांचा अनुग्रह (कृपा) मी कसा पावेन, हे संपूर्णपणे (स+आदि+अंत) श्रोत्यांनी ऐकावे. (ओ. १६२-१६४)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंतांनी रचलेल्या श्री साई समर्थ यांच्या सत्य चरित्राचा "**ब्रह्मज्ञान कथनं – २**" (जगाच्या उत्पत्तीचे कारण व मूळ घटक जे ब्रह्म त्याचे व त्याच्या प्राप्तीच्या मार्गाचे निरूपण) या नावाचा सतरावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

---

## अध्याय १६ व १७ ची आणखी टीका

ह्या दोन्ही अध्यायांत '**ब्रह्मज्ञान-कथन**' हा अति गहन विषय आलेला आहे. कोणी एक लोभी श्रीमंत गृहस्थ बाबांची कीर्ती ऐकून परत-भाड्याचा टांगा करून बाबांजवळ ब्रह्मज्ञान मागण्यास कसा आला व बाबांनी थट्टेने त्याच्या खिशातून ते काढून दाखवून त्याला व जमलेल्या भक्तमंडळींना "**लोभ सुटल्यावांचूनि निष्टंक। ब्रह्म निःशंक अप्राप्य॥**" हे कसे ठसवून दिले, ही सरळ सुंदर कथा जरी सांगितली असली तरी नंतर केलेले ब्रह्मज्ञानाचे विवेचन त्यातील गहन विषयामुळे व वेदान्तातील संस्कृत भाषेतील तांत्रिक शब्दांमुळे वाचकांना ते समजण्यास फार कठीण जाते. म्हणून त्याचा थोडक्यात सार सोप्या भाषेत खाली देत आहे.

**ब्रह्म म्हणजे काय?**

ब्रह्म म्हणजे परमात्मा – जगाच्या उत्पत्तीचे कारण व घटक. तो सर्व जगाला व्यापून आहे व सर्वांच्या हृदयात वास करून या जगाचे सूत्र चालवितो. त्याच्या भीतीने सूर्य व चंद्र यांचे नियमाने उगवणे व मावळणे, ग्रीष्म, वसंत वगैरे ऋतूंचे नियमाने येणे आणि इंद्रादि देव व लोकपाल यांनी नेमाने प्रजेचे पालन करणे घडते.

**ब्रह्मज्ञान कशाला म्हणतात?**

या ब्रह्माला यथार्थ जाणणे, ते व आपला आत्मा हे

एकच आहेत, वेगळे नाहीत, असा विश्वास असणे; एवढेच नव्हे तर तसे प्रत्यक्ष अनुभवणे, याला 'ब्रह्मज्ञान' म्हणतात. घड्यातील आकाश व त्याच्या बाहेरील जगाला व्यापून असलेले आकाश हे जसे वेगळे नसते तसेच आपल्या शरीरातील आत्मा व सर्व जगाला व्यापून असलेला परमात्मा हे वेगळे नसतात. म्हणूनच ब्रह्मज्ञानाला 'आत्मज्ञान' असेही म्हणतात व आत्म्याला यथार्थ जाणले म्हणजे ब्रह्मालाच जाणण्याचा अनुभव येतो.

**ब्रह्मज्ञान माणसाने कशासाठी प्राप्त करावयाचे ?**

'ब्रह्मज्ञान' झाले की माणसाची या जगात सर्वकाही आपणच आहोत, आपल्याशिवाय जगात दुसरी काही वस्तूच नाही, अशी भावना होते. त्यामुळे त्याला कसली भीती उरत नाही. त्याला कोणी शत्रु नसतो व मित्रही नसतो. तसेच एकदा ब्रह्म जाणले की मग आणखी काही जाणण्याचे उरत नाही. साक्षात्कारामुळे हाताच्या तळव्यावर असलेल्या आवळ्याप्रमाणे सर्वकाही त्याला ठाऊक असते. या ब्रह्मज्ञानाचे फळ म्हणजे संसारातील सर्व दु:खांपासून व चिंतेपासून निवृत्ती, सतत टिकणाऱ्या परमानंदाची प्राप्ती आणि मोक्षाच्या सुकाळाचा लाभ होतो. हे ब्रह्मज्ञान जाणल्याशिवाय जर शरीर पडले तर संसारातील बंधन पिच्छा पुरवील व पुनर्जन्म चुकणार नाही. म्हणून विचारी पुरुष देह पडण्यापूर्वी ब्रह्मपुरुषार्थ साधून घेतात.

**ब्रह्मज्ञानाचा अधिकारी कोण ?**

ब्रह्मज्ञानाचा मार्ग फार कठीण असतो. सर्वांना सरसकट तो सोपा नसतो. ब्रह्मासाठी पाच प्राण, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, अहंकार, बुद्धी व मन ही सर्व समर्पण करावी लागतात. जे योगी पर्वतात दडले, यमनियमात अडकले व ध्यानधारणी गढले अशांनादेखील गुरुकृपा झाल्याशिवाय ब्रह्म दिसत नसते.

ब्रह्मज्ञानप्राप्तीचीच जो इच्छा करतो, दुसरी कसलीही इच्छा मनात ठेवत नाही, इह व परलोकाचा किंचितही लोभ धरत नाही, तोच ब्रह्मज्ञानाचा अधिकारी होय! अहंकार गळाल्याशिवाय, लोभाचे उच्चाटन झाल्याशिवाय व मन निरिच्छ झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान ठसत नाही. देह हा आत्मा आहे, अशी जी बुद्धी तीच माणसाला भ्रमात टाकते. कुठल्याही वस्तुविषयी आसक्ती असणे, हेच बंधनाला कारण होते. विषयांविषयी कल्पना व इच्छा सोडा, म्हणजे ब्रह्म हाती येईल.

जोवर जिभेने बाह्य विषयांचे स्वाद घेणे, कानाने शब्द ऐकणे, त्वचेने स्पर्शाचे सुख भोगणे, नाकाने सुगंध घेणे व डोळ्याने सुंदर अवयवांचे दर्शन घेणे असते, तोवर इंद्रियांचे संयमन अशक्य असते. सर्व एषणा (इच्छा, आसक्ती) सोडून सद्गुरुला अनन्य शरण गेलेला असा दृढ श्रद्धायुक्त जो साधक तोच आत्मज्ञानाला पात्र होय! डोळे, कान वगैरे पाच इंद्रिये आपापल्या विषयांना सोडतील. मन जेव्हा संकल्पविकल्प करणे निश्चयपूर्वक स्वत:च सोडून देईल व बुद्धीदेखील जेव्हा आपल्या निश्चल झालेल्या अंत:करणात आपला निश्चय करण्याचा व्यापार बंद करील, तेव्हा होणारी स्थिती हीच परमगती होय आणि तेच निर्विकार ब्रह्म होय! बुद्धी निश्चय न करणारी होईल व चित्तात मी तोच एक आहे, माझ्याशिवाय दुसरं जगात काही नाही, असे चैतन्य प्रगटेल, तोच भाग्यवान आत्म्याला जाणेल. चित्ताला हळूहळू माघारी फिरवून ते आत्मस्वरूपी स्थिर केले म्हणजे आत्मज्ञान जोडले जाते. या लोकी व परलोकी कर्मफलाची विरक्ती व हर्ष-शोक वगैरे द्वंद्वांचा त्याग हे बुद्धिमंत लोकच करू जाणे.

**ब्रह्मज्ञानाचा अधिकार कोणाला नाही ?**

पुत्र, पशु वगैरे आणि धन कमविणे यातच ज्याचे मन आसक्त आहे त्याला द्रव्यरूपी विघ्न दूर झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान कुठले? द्रव्याचा मोह फार कठीण असतो. तृष्णारूपी भोवरे असलेला दु:खाचा जणूकाय हा डोहच आहे. मद, मत्सर हा भयंकर मगरींच्या अस्तित्वामुळे एक निस्पृहच तो पार करू शकेल. लोभाशी ब्रह्माचे अखंड वैर असते, तेथे ध्यानाला स्थान नाही, मग कुठली भक्ती, मुक्ती व विरक्ती? खरोखर लोभी मनुष्य आचारभ्रष्टच असतो. लोभाच्या ठिकाणी शांती नसते. चित्तात हा एक लोभ जरी ठाण मांडून बसला तर सर्व साधने मातीत जातात.

ज्ञान प्राप्त झाल्यावरदेखील जो अधर्म मार्गाने आचरण करील तर खाली या पृथ्वीवर किंवा वर स्वर्गात न राहता त्रिशंकूसारखा मध्येच तो लोंबकळत राहील. जीवाची ही अज्ञानाची (आपण शरीर आहोत, आत्मा नाही ही) वृत्ती तीच त्याला संसाराकडे प्रवृत्त करते. जो सदा अशान्त व अस्थिर असतो, ज्याचे चित्त एकाग्र नसते, अशा ज्ञानी माणसालाही आत्मा पावत नसतो.

जो मनुष्य दुष्कृत्यांपासून किंवा पापाचरणांपासून विरक्त होऊन त्यांचा त्याग करीत नाही, ज्याचे मन ईश्वराला विसरून रात्रंदिवस संसारातील भोगात भटकत राहते, ईश्वरावर श्रद्धा नसल्याने जो सदा अशान्त राहतो व ज्याचे मन, बुद्धी व इंद्रिये स्वाधीन नाहीत, असा मनुष्य सूक्ष्म बुद्धीने आत्मचिंतन करूनही ब्रह्म प्राप्त करू शकत नाही.

**ज्याला जाणल्याने ब्रह्म जाणले जाते तो आत्मा कसा असतो ?**

खरे पाहता आत्म्याचे वर्णन करता वेद थकले, तपस्वी वनवासी झाले, उपनिषदांनी हात टेकले व कुणालाही नीट निदान झाले नाही. तरीपण अनिर्वाच्याला त्याला शब्दात गुंतवून वेदान्त्यांनी त्याचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे; तो असा:

हा आत्मा सदा असणारा, प्राचीन व कधीही नाश न

पावणारा आहे. जन्ममृत्यू त्याला बाधत नाहीत. त्याला आरंभ व शेवट नसून तो स्वतंत्र आहे.

कवडशातील, म्हणजे भोकातून येणाऱ्या उजेडाच्या किरणातील अति सूक्ष्म कण, त्याहून असलेला अणू आणि त्या अणूपेक्षाही अति सूक्ष्म, अशी त्या आत्म्याची कल्पना केली जाते. मोठ्यात मोठे म्हणजे ब्रह्मांड; पण आत्मा त्याहून मोठा असतो, असाही समज आहे. परंतु ह्या सर्वसापेक्ष, म्हणजे तुलनेसाठी कल्पना आहेत. खरे पाहता आत्मा माप घेण्याच्या पलिकडचा आहे आणि सूक्ष्मत्वाने सूक्ष्मापेक्षा सूक्ष्म व मोठेपणाने मोठ्यापेक्षा मोठा आहे. त्याच्या बाबतीत नाम व रूप ह्या उपाधीच समजाव्यात. तो सदा परिपूर्ण व उपाधिशिवायचा आहे आणि सहज प्राप्त होण्यासारखा नाही. ॐ कार प्रतीक असलेले जे ब्रह्म ते त्याचे मूळ स्वरूप आहे.

**ब्रह्मज्ञान प्राप्त कसे करावयाचे ?**

ब्रह्मज्ञानाचा मार्ग अवघड असतो. सर्वांना सरसकट सोपा नसतो. त्यासाठी अभ्यास व श्रम करून हाडांच्या काड्या कराव्या लागतात (शरीर वाळवावे लागते). उत्तम अधिकार असलेल्यांना ब्रह्मज्ञान अडचणींशिवाय सहज प्राप्त होते, तर मध्यम अधिकार असलेल्यांना ठराविक पद्धतीने हळूहळू जावे लागते. एक आकाशमार्गाने जातात, तर दुसरे क्रमाक्रमाने पायऱ्या चढून जातात. परंतु अधिकार नसलेले लोक मात्र ब्रह्म जाणण्याकरिता व्यर्थ श्रम करतात (ब्रह्म प्राप्त करण्याचे त्यांचे श्रम फुकट जातात).

ब्रह्मप्राप्तीसाठी ह्या दोन अध्यायांत खालील उपाय सांगितले आहेत :

(१) अविद्येपासून या संसाराची उत्पत्ती होते व त्यापासून सुटका व्हावयाचे साधन म्हणजे ब्रह्म व आत्मा हे एक आहेत, ही वृत्ती बनणे होय! जेव्हा विषय व संकल्प यांनी शून्य अशी स्थिती होईल, जेव्हा **'अहं ब्रह्मास्मि'** (मीच ब्रह्म आहे) या वेदाच्या महावाक्याच्या आवृत्तीने बुद्धीचा तसा कल होईल, जेव्हा गुरुच्या वचनाच्या व शास्त्राच्या म्हणण्याच्या खरेपणाची खात्री पटून मनाची व शरीराची कर्म करण्याची प्रवृत्ती थांबेल तेव्हाच आत्म्याची पूर्णपणे ओळख होईल.

(२) वाणी इत्यादी सर्व इंद्रियांचा लय करा व मनाचा निश्चय पक्का करा. नंतर त्या मनाचाही लय करून बुद्धीला पकडा. प्रकाशस्वरूप जी ज्ञान देणारी बुद्धी तेथे मन एकाग्र करा. मनासकट सर्व इंद्रियसमूह एका बुद्धीच्या स्वाधीन असतात. मातीच्या घड्याला आदिकारण जशी माती तशीच इंद्रियांना व्यापून असणाऱ्या बुद्धीला महत्तत्वात, म्हणजे समष्टी सर्वव्यापी ईश्वरात विलीन करावे व महत्तत्व आत्म्यात (आतमत्वी) समर्पावे. अशी गोळाबेरीज केली म्हणजे आत्म्याचे स्वरूप निश्चितपणे कळते. मग रूपे, मृगजळ व सापाचा आकार हे (अनुक्रमे शिंपला, सूर्याचे किरण व दोर याबद्दलचे) केवळ दृष्टीचे भ्रम बनतात.

(३) परब्रह्माचे प्रतीक ''प्रणवस्वरूप ॐकार'' याचे सदा ध्यान करावे. हे सर्व वेदांचे सार आहे. त्याचा नुसता उच्चार केला तरी त्याच्या अर्थाचे तत्व मनाला स्फुरते व त्याचे आवर्तन (वारंवार पठण) केले असता ब्रह्माचा साक्षात्कार होतो.

(४) अंत:करणाला मल (राग, द्वेषादि विकार), विक्षेप (भ्रम किंवा मनाचा गोंधळ) आणि आवरण (ब्रह्मस्वरूपाला अज्ञानाने झाकून टाकणे) हे तीन दोष असतात. निष्काम कर्मे करून मलाचे निर्मूलन होते (चित्तशुद्धी होते) व उपासनेने विक्षेप धुऊन निघतो. अशाप्रकारे स्वकर्म व उपासना करून चित्ताला परिपक्वता येते आणि मल व विक्षेप यांचा नाश होऊन फक्त 'आवरण' शिल्लक राहते. हे सव अनर्थाचे बीज जे हे 'आवरण' ते ज्ञान प्राप्त झाल्यावर सूर्य उगवल्यावर अंधाराचा जसा नाश होतो तसे नाश पावते. अशाप्रकारे ज्ञानी माणूस स्वस्वरूपी लीन झाला म्हणजे सत्य, ज्ञान व आनंद (सच्चिदानंद) इत्यादी लक्षणांनी ज्याचे वेदांतातील विद्वानांनी वर्णन केले आहे ते हे ब्रह्म स्वत:हून त्याच्या ठिकाणी प्रकाशते. अंधार व थोडे चांदणे असताना एखादा वाटसरू रानात चालत असताना तुटलेल्या झाडाच्या बाकी राहिलेल्या खोडालाच चोर समजून भीतीने तेथेच लपतो. त्याला वाटते ''मी एकटाच आहे. जवळ पैसा आहे. तो चोर तर वाटपाड्या (लुटारू) सारखा टपून बसला आहे. आता जीवाचा भरंवसा नाही.'' तोच दुरून दिव्याचा उजेड येतो व खोडाचे खरे स्वरूप प्रगट होते. वाटसरूची भीती नाहीशी होते व स्वत:ला झालेला चोराचा खोटा भास त्याला कळतो.

(५) 'श्रेय' म्हणजे सर्व दु:खांपासून संपूर्णपणे मुक्त होऊन नित्य आनंदस्वरूप परब्रह्म पुरुषोत्तमाला प्राप्त करण्याचा उपाय आणि 'प्रेय' म्हणजे स्त्री, पुत्र, धन, घरदार, मानसन्मान, यश इत्यादी इहलोकातील व परलोकातील सुखे भोगण्याच्या गोष्टी प्राप्त करण्याचे उपाय. श्रेय विवेकरूप असते तर प्रेय अविवेकरूप असते. श्रेयाचा विषय केवळ विद्या व प्रेयाचा निव्वळ अविद्या. श्रेय अज्ञानीजनांना आवडत नाही व प्रेय शहाण्यांना भुलवीत नाही. जोवर कनक व कामिनी यांची ओढ असते, इंद्रियांना विषयांची आवड असते आणि विवेक, वैराग्य जोडलेले नसते, तोवर प्रेयच गोड वाटत असते. पाणी व दूध जसे एकत्र मिसळलेले असते तसेच प्रेय व श्रेय हे एकत्र गुंतलेले असतात. मानस सरोवरातील हंस जसे दूधच तेवढे वेगळे करून पितात, तसे दृढ निश्चयी, बुद्धिमान, विवेकी व भाग्यवान माणसे श्रेयाकडेच आसक्त असतात व प्रेयाकडे पाठ फिरवितात; परंतु तेच मंदबुद्धीचे लोक पहा! शरीर, पुत्र, धन, मान वगैरे योगक्षेमाच्या नादी लागून फक्त प्रेयच साधतात. श्रेय काय व प्रेय काय, हे दोन्ही

जरी समजले तरी मनुष्यप्राणी बुद्धीने स्वतंत्र असल्याने त्यातून कोणते पसंत करावयाचे हे त्यालाच ठरवावे लागते. दोन्ही पुढे असल्यावर त्यांची निवड करणे अवघड असते, कारण माणसाच्या मंदबुद्धीवर विजय मिळवून प्रेयच त्याला चिकटते. प्रेय बाजूला सारून श्रेयाचा आदर करणे, हाच तो पुरुषार्थ होय!

(६) पुरुषार्थाचा उदय झाला की मग तो पुरुष संसारचक्राच्या भ्रमणापासून सुटण्याचा आपल्या हिताचा योग्य उपाय साधणारा होतो. अनादि अशी जी अविद्या किंवा माया शिंपल्यावरच्या रुप्यासारखी किंवा मृगजळातील पाण्यासारखी निकामी आहे. तिच्या खोटया आभासरूप अडथळ्यांचा नाश केला पाहिजे. स्वप्नात सोन्याच्या गारांचा पाऊस पडतो. वेळी कामास येतील असे वाटून त्या प्रयत्नपूर्वक खूप गोळा केल्या तरी जागे झाल्यावर त्या हरवून जातात. अनुभवलेल्या किंवा न अनुभवलेल्या भोगांची वासना असणे किंवा आशा, उत्कंठा वा इच्छा असणे, ही सदा विघ्ने आणतात म्हणून त्यांना मूळासकट खणून काढा. काम व क्रोध ह्या दोन वृत्ती ज्ञानाची प्राप्ती होऊ देत नाहीत. श्रवण, मनन व समाधी यांचा त्या हातोहात भंग करतात. श्रुतीला व स्मृतीला जे त्याज्य त्या दुष्कर्मात जो सदा लोळत असतो व ज्याला योग्य व अयोग्य कर्म कळत नाही तो ज्ञानी असून स्वत:चे कोणते हित साधू शकेल! तसेच जो नेहमी अशांत असून ज्याचे मन एकाग्र नाही व इंद्रियांच्या लाडाने ज्याचे चित्त क्षुब्ध आहे तो ज्ञानाने परिपूर्ण होऊ शकत नाही.

(७) संसारात असो किंवा मोक्ष मिळविण्याच्या खटपटीत असो, शेवटी आपल्याला आपल्या कोणत्यातरी ध्येयाकडेच (निज+धामी) जावयाचे असते. म्हणून तुझ्या शरीररूपी रथाचा तू मालक हो व आपल्या बुद्धीला त्या रथाचा सारथी करून तू स्वस्थ बैस. मग विषयांच्या अनेक मार्गांची बिकट परंपरा ओलांडायला सारथ्याला सांग आणि मनरूपी लगामाने दहा इंद्रियरूपी उच्छृंखल घोड्यांना आवरायला लाव. घोडे जरी सैरावैरा धावले तरी लगाम त्यांना आपल्या जागी ठेवील. सारथी कुशल व निपुण असला तरच घोडे कसून चालतात. परंतु तोच मनरूपी लगामाच्या आधीन असला तर ते शक्तिहीन होतात. जेथे बुद्धीचे विवेकरूप सारथ्य असते, ज्याचा मनावर ताबा आहे व ज्याचे चित्त एकाग्र झालेले आहे, त्यालाच परमपद प्राप्त होते. इतर लोक मार्गात थकतात.

(८) विवेक व वैराग्य या जोडीला जो जुंपील तो जड, मूर्ख किंवा दगड असला तरी त्याला संसाररूपी सागर अवघड नाही. भगवंताचे ऐश्वर्य सहा गुणांचे आहे. त्यातील 'वैराग्य' हे पहिले खरे ऐश्वर्य आहे. जे महाभाग्यवान आहेत त्यांच्याच वाटयाला हे येते, इतरांच्या नव्हे. शास्त्राने योग्य ठरविलेले कर्म केल्याशिवाय चित्त शुद्ध होत नाही व जोवर चित्त शुद्ध होत नाही तोवर ज्ञान संपादन होत नाही. म्हणून कर्म हेच ज्ञानप्राप्तीचे मूळ कारण होय! नित्य व नैमित्तिक कर्म आचरल्याने चित्ताचा मळ धुऊन निघतो. अशाप्रकारे शुद्ध झालेल्या चित्तात शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा व समाधान ह्या साधनसंपत्ती उत्पन्न होतात व याच देही मुक्ती प्राप्त होते.

(९) जीवाची जी अज्ञानाची (आपण आत्मा नसून देहच आहोत) ही वृत्ती, तीच त्याला संसाराकडे प्रवृत्त करते. आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर तोच जीव संसारातून निवृत्त होतो. आत्म्याला खरोखर जाणणाऱ्याला अहंभाव कधीही नसतो, धर्म किंवा अधर्म नसतो, शुभ किंवा अशुभ नसते. त्याला संसारातील हिताची किंवा अहिताची काय पडली आहे! प्रवृत्तीच्या ठिकाणी शत्रु व मित्र असतात. निवृत्तीचे नवल हेच की मीच मी सर्वत्र आहे, हे पाहता शत्रुत्व व मित्रत्व ते कुठले! अशा महासुखापुढे शरीराचे महादु:ख ते काय बापुडे! जेव्हा महासुख आवडायला लागते तेव्हा ऐहिक सुखासाठी कोण रडेल? ऐहिक दु:खाचे डोंगर जरी त्यावर कोसळले तरी केवळ धीराचा पर्वतराजच तो लवभारही हलत नाही.

(१०) आरशात उमटणाऱ्या चेहऱ्याच्या प्रतिबिंबाप्रमाणे आत्म्याच्या स्पष्ट दर्शनाचा जो हेतू धरतो त्याला ही पृथ्वी (भूलोक) किंवा वरचा ब्रह्मलोक याशिवाय तिसरी जागाच नाही. यज्ञ केल्याने देवतांची तृप्ती झाली की पितृलोकाची प्राप्ती होईल व कर्मफलांच्या उपभोगांचा लाभ होईल; परंतु आत्मज्ञान लाभणार नाही. गंधर्व, महा, जन, तप व सत्य वगैरे लोकांतील आत्मदर्शन अतिशय अस्पष्ट असते. म्हणून ज्यांना आत्मदर्शनाची आसक्ती असते ते भूलोक (या पृथ्वीवरील आयुष्य) भरपूर मागतात; कारण येथेच चित्तशुद्धी होते, आरशासारखी निर्मल बुद्धी प्राप्त होते आणि त्यात शुद्ध व पवित्र आत्मस्वरूप प्रतिबिंबित होते.

(११) डोळे, कान वगैरे पाच इंद्रिये आपापल्या विषयांना सोडतील, मन जेव्हा संकल्पविकल्प करणे निश्चयपूर्वक स्वत: सोडून देईल व बुद्धीदेखील जेव्हा अशाप्रकारे निश्चल झालेल्या अंत:करणात आपला निश्चय करण्याचा व्यापार बंद करील तेव्हा होणारी स्थिती हीच परमगती होय आणि हेच निर्विकार ब्रह्म होय! ज्याची बुद्धी निश्चय न करणारी होईल व चित्तात मी तोच एक आहे, माझ्याशिवाय दुसरे जगात काही नाही, असे चैतन्य प्रगटेल तोच भाग्यवान आत्म्याला जाणेल. ब्रह्मदेवाच्या पदापर्यंत या लोकाच्या व परलोकाच्या विषयांमध्ये ज्याला आसक्ती नाही तोच एक ब्रह्मपदाचा अभिषेक झालेला व मुक्त झालेला जाणावा. चित्ताला विषयांपासून हळूहळू माघारी फिरवून आत्मस्वरूपी स्थिर करून आत्मज्ञान जोडावे. या लोकी व परलोकी कर्मफलाची विरक्ती व हर्ष-शोक वगैरे द्वंद्वांचा त्याग, हे बुद्धिमंत लोकच करू जाणे व हाच तो अध्यात्माचा

(आत्मज्ञानाचा) मार्ग होय!

(१२) स्त्री, पुत्र व मित्ररूपी हा भोवरा काम, क्रोध वगैरे सुसरींनी भरलेला, नाना रोगरूपी तिमिंगिल नावाच्या मोठ्या माशांनी विस्तारलेला आणि आशारूपी मोठ्या लाटांनी खवळलेला आहे. कित्येकदा घटकेघटकेला उद्वेगाचा झटका येऊन जातो. सुख-दुःख, शोक-मोह वगैरे द्वंद्वांनी मनात शंका उत्पन्न होते. परंतु स्त्री-पुत्रांचा मोह चट्‌कन तोडवत नाही. स्वतःच्या जीवाला उपदेश करावा की तून शुद्ध ब्रह्म आहेस. देहाच्या संगतीने नळीला बांधून घेणाऱ्या पिंजऱ्यातील पोपटाप्रमाणे तू स्वतःच बद्ध झाला आहेस. मोहमायेने तू केवळ भ्रमात पडला आहेस; म्हणून स्वतःचे हित विसरला आहेस. तुझा तूच सावध हो आणि स्वस्वरूपाकडे चट्‌कन ये. भ्रमामुळेच संशय आणि 'मी देह आहे', असा खोटा भास तुझा वाढला आहे. 'मी माझे' (मी मम) हे मृगजळासारखे फसवे आहे, हे जाणून 'माझेपण' (ममत्व) सोडून दे. हे पोपटा! या मीतूपणाच्या घोटाळ्यात घट्ट कशाला गुंतावे? ते आवळलेले पाय सोड आणि उंच उडत जाऊन नैनीने फीर की!

(१३) श्रुती व स्मृती यांनाही दुर्गम असलेला तो आत्मा काय सर्वांना सरसकट सुगम होईल? त्याचे वर्णन करता वेद थकले, तपस्वी वनवासी झाले आणि उपनिषदांनी हात टेकले व कुणालाही नीट निदान झाले नाही. आत्मस्वरूपाच्या ठिकाणी पोहोचायला अभेदाचे (आत्मा व परमात्मा एकच आहे याचे) दर्शन घडविणारा आचार्यच (गुरुच) हवा. तेथे इतरांचा काय पाडाव? नुसते तर्क करणाऱ्यांना तर तेथे थाराच नाही. ते भ्रमरूपी भोवऱ्यात गरगर फिरतील. स्वतःच्या बुद्धीचे कल्पनारूपी तारे (चांदण्या) चौऱ्यांशी लक्ष पुनर्जन्माचे फेरे चुकवू शकत नाहीत. आचार्यरूपी चंद्र मात्र एकच पुरतो. जे कष्टाने साधत नाही ते सद्गुरुची कास घट्ट धरून ठेवणाऱ्याला अगदी थोडक्या प्रयत्नाने साधते. सविद्या त्याला प्रकाशित करते व अविद्या कार्यासहित बाजूला सरते. सच्चिदानंद स्वरूप स्थिर होते आणि स्वस्वरूप स्थिती अवतरते. त्यालाच मोक्ष असे दुसरे नाव आहे. हेच जीवाचे अपेक्षित ध्येय आहे.

(१४) येथे वादाचा काही उपयोग होत नाही व तर्काची चतुराई चालत नाही. तर्क जाणणाऱ्यांची मती कुंठीत होते. भोळा भावच सिद्धीस जातो. हीच येथील नवलाई आहे. उत्तम ज्ञानाला जे मूळ त्याची वाटचालच वेगळी व ती बुद्धीही वेगळी आणि ते उत्तम ज्ञान देणारा शास्त्रज्ञही वेगळाच असतो, हे जाणावे. हे अमूल्य शरीर वाया चालले आहे, धनाची तृष्णा ही दुपारच्या छायेसारखी फार टिकणारी नाही व हरीची माया पार करण्याला अवघड आहे, हे सर्व जाणून संतांच्या पायी लागावे. संत हे संसाररूपी सागराची नाव आहे. त्यातील तू एक उतारू हो. त्यांच्याशिवाय पलीकडे नेण्याला कोण समर्थ आहे?

(१५) संसाराच्या बंधनातून सुटका होईल तो क्षण कधी येईल, अशी ज्याच्या मनात रात्रंदिवस चुटपुट लागलेली असते तो स्त्री-पुत्रांचा मोह चट्‌कन सोडतो. साधेल तो एकांत साधून, संसारात काही अर्थ नाही, ही मनाशी गाठ बांधून, अध्ययन व आत्मचिंतन यांत निरंतर मग्न असावे. भक्तिश्रद्धायुक्त मनाने, पूर्ण नम्रतेने, साष्टांग नमस्कार करून, गुरुला शरण गेल्याविना तो शिष्याला ज्ञानाचा ठेवा देत नाही. गुरुला सर्व अर्पण करून त्याची सेवा करावी, बंध व मोक्ष ह्या वृत्तींनी त्याच्याशी चर्चा करावी, विद्या व अविद्येबद्दल त्याला प्रश्न विचारावे, म्हणजे गुरुमहाराजांकडून फळ प्राप्त होईल. आत्मा कोण, परमात्मा कोण हे गुरुशिवाय कोणाला सांगता येणार नाही. गुरुदेखील पूर्ण शरण आल्याशिवाय ज्ञानाचा कणही देत नसतात. गुरुशिवाय इतरांनी ज्ञान दिले तर त्यामुळे संसारातून पूर्ण सुटका होत नाही, म्हणून गुरुविना ज्ञान नाही, हे सर्व विद्वान जाणतात. ब्रह्म व आत्मा यांच्या ऐक्याची सोय करायला गुरुंचेच पाय समर्थ आहेत. तेथे आढेवेढे न घेता, ताठ अभिमान टाकून, जमिनीवर दंडाप्रमाणे सरळ लोटांगण घालून गुरुच्या चरणीं मान वाकवा आणि मनाचा हिय्या पक्का करून गुरुचे पाय धरून तोंडाने म्हणा, "मी तुमचा दासानुदास आहे व मला तुमच्या पायांचाच भरंवसा आहे." मग पहा त्या गुरुचा चमत्कार! तो गुरुरूपी दयेचा सागर डोलायला लागेल व लाटांच्या शय्येवर तुम्हाला वरच्या वर झेलेल. इडापिडांचा नाश करून आपला अभय देणारा हात तुमच्या डोक्यावर ठेवील व सर्व पापांच्या राशी जाळून मस्तकाला उदी फासेल.

(१६) या संसाररूपी वडवानलाच्या आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक अशा तीन तापरूपी संतप्त आगीत कोण बरे सुखी असेल? यातून आपला उद्धार करून घेण्यासाठी साईबाबांची कृपा संपादन करावी. त्यांच्या चरित्राचे आदरपूर्वक वाचन, श्रवण व मनन करावे. ही कथा हळूवारपणे श्रवण केली तर शांततेला शांतता येते. या कथारूपी झऱ्यात कर्म व अकर्मरूपी मीठ विरघळून जाते व कानांच्या द्वारे साईबाबांचे रूप डोळ्यात शिरते. चरित्रश्रवणाने पातकांचा ऱ्हास होतो, काळाशीदेखील झुंज देऊन विजयी होण्याची तयारी येते व खूप स्फूर्ती येऊन श्रोत्यांना समाधान प्राप्त होते. श्रवणाने अंतःकरण शुद्ध होते. श्रवणाने जन्ममरण चुकते. श्रवणाने कर्मफळाची इच्छा न केल्याने ब्रह्मपण प्राप्त होते, म्हणून श्रोत्यांनी या ग्रंथाचा एकेक अध्याय घेऊन दररोज त्याचे वाचन किंवा श्रवण, मनापासून अभ्यास आणि सतत मनन, चिंतन करावे.

**सारांश**

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ब्रह्मज्ञान म्हणजे म्हातारपणी इंद्रियशक्ती क्षीण झाल्यावर, जगात कोणी विचारत नसल्यावर

रिकामटेकडेपणी उगीच सूत काढीत बसण्यासारखी गोष्ट नव्हे. तसेच परत-भाड्याचा टांगा करून घाईघाईने येऊन आणि तेही जवळ २५० रुपये खिशात असून केवळ पाच रुपड्यांचा लोभ धरून प्राप्त होत नसते. ब्रह्मप्राप्तीसाठी साधकाला सर्व सुखोपभोगांचा त्याग करून, सर्व आशा-आकांक्षा सोडून मोठे श्रम करावे लागतात, श्री साईबाबांसारख्या सद्गुरुची कास धरावी लागते आणि मगच ब्रह्म म्हणजे आत्मा प्रसन्न होऊन तो स्वत:च साधकासाठी आपले यथार्थ स्वरूप दाखवून देतो :

**तया नाहीं अन्य साधन। तेणेंचि व्हावें लागे प्रसन्न।**
**साधक पाहूनि आत्मप्रवण।**
**आत्मा त्या आपणचि करी कृपा॥२०५॥**

– अध्याय ५०

असे हे अति श्रेष्ठ पण अति दुर्लभ व दुर्धर ब्रह्मज्ञान किंवा आत्मज्ञान प्राप्त करण्याचे उपाय ह्या दोन्ही (१६ व १७) अध्यायांत विस्तारपूर्वक सांगितलेले आहेत. मुमुक्षूंनी त्याचे वारंवार वाचन करून त्याचा शब्दार्थ व भावार्थ नीट समजून त्यावे मनन, चिंतन करून मग त्यातील उपाय कृतीत आणावे. म्हणजे साईबाबांच्या कृपेने त्यांना खात्रीने ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होईल.

तशी फलप्राप्ती हेमाडपंतांनी अ. १७ च्या शेवटी सांगितलीही आहे :

**सुबुद्ध वा बुद्धिमंद। वाचितां प्रगटेल परमानंद।**
**परिसतां वाढेल श्रवणछंद। मननें स्वानंद-संतुष्टी॥१५९॥**
**आवर्तनीं परमार्थबोध। निदिध्यासनीं महदाल्हाद।**
**सौख्य उपजेल अखंड निर्बाध।**
**ऐसी अगाध ही लीला॥१६०॥**

अपार साईंच्या अपूर्व कथा। शांतिदायक भवदवार्ता। श्रोतयां देतील श्रवणोल्हासता। चित्तस्थिरता निजभक्तां॥३६॥ कथा वदले परोपरीच्या। व्यावहारिक उपदेशाच्या। तैशाचि सर्वांच्या अनुभवाच्या। वर्माच्या निजकर्माच्या॥३७॥ अपौरुषेय श्रुति विख्यात। जैशा असंख्य आख्यायिका विश्रुत। तैशाचि बाबा मधुर अर्थभरित। अपरिमित सांगत॥३८॥ ऐकतां त्या सावधान। इतर सुखें तृणासमान। विरोनि जाय भूकतहान। समाधान अंतरीं॥३९॥ कोणासी व्हावी ब्रह्मसायुज्यता। अष्टांगयोगप्रावीण्यता। समाधिसुखनिर्भरता। होईल कथा परिसतां या॥४०॥ श्रवणार्थियांचे कर्मपाश। तोडूनि टाकिती या कथा अशेष। बुद्धीसी देती सुप्रकाश। निर्विशेष सुख सकलां॥४१॥ तेणें मज स्फुरली वासना। ऐशा सुसंग्राह्य कथा नाना। ओवूनि करावें मालाग्रथना। हीचि उपासना चांगली॥४२॥ कानीं पडतां चार अक्षरें। तात्काळ जीवाचा दुर्दिन ओसरे। संपूर्ण कथा ऐकतां सादरें। भावार्थी उतरेल भवपार॥४३॥

–अध्याय २, श्री साईसत्चरित

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वतीने विविध विकास योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. ह्या योजनांसाठी विशेष स्वरूपाच्या देणग्या स्वीकारण्यात येत आहेत. यासंबंधीची माहिती पुढीलप्रमाणे :

'साईबाबा भक्तनिवासस्थान' या इमारतीचे बांधकाम जोरात चालू असून रु. ५०,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील एका खोलीला देण्यात येईल. रु. २,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील जनरल हॉलला देण्यात येईल. ह्या देणगीदारांना वर्षातून दोनदा आगाऊ एक महिना कळविल्यास तीन दिवस रहाण्यासाठी विनामूल्य जागा देण्यात येईल.

मंदिर-नूतनीकरणासाठी रु. १,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

रुग्णालय-विस्तारीकरणासाठी रु. ५,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव एका वॉर्डला अगर ऑपरेशन थिएटरला देण्यात येईल. रु. २०,००० देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव एका बेडला देण्यात येईल. रु. १०,००० अगर त्याहून अधिक देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

---

(पृष्ठ क्र. १४ वरून)

छे. पण तेनुं रहस्य पासे बेसनाराओमार्थी भाग्येज थोडा माणसो पोत पोताना अधिकार प्रमाणे ग्रहण करे छे.

पृ. ६२

"पन्नास हजार आले आणि छपन्न हजार गेले त्याच्याशी आपल्याला काय करायचे? ज्यांची निष्ठा धड आहे आणि इमान शाबूत आहे त्याला सात समुद्र न्याहाल करीन. माझ्या माणसांना ७२ पिढ्यापर्यंत मीच सांभाळतो."

### बाबा निष्ठेसंबंधी बोलताना

पृ. ६३

शिरडी गाम ज्या बाबाए छेल्ला लगभग ६० वर्षथी वास कर्यो छे अने ज्यां हालमां तो बाबा उपरांत एकाद बे सत्पुरुष शीवाय तमारा जोवामां कंई वीशेष नहीं आवे, पण जमाना पुर्वे ते महात्माओ अने ऋषीओनुंज स्थान हतुं एम बाबानी वखतो वखतनी वातचीत परथी जणाई आवे छे, अने हजी बाबा एक बोले छे के एक वखत पाछो एवो आवशे ज्यारे तेज हालनु उजाड गाम पांछु तेनी पुर्वनी कीर्ती संपदन करशे, अने मोटुं तीर्थ धाम बनी रहेशे. हालमां पण ज्यारे बाबाना भक्तोंना मुखमां शब्दो रमी रह्या छे के :

**"शिरडी माझे पंढरपुर। साईबाबा रमावर॥"**

त्यारे भविष्यना जमानामां ते एक मोटुं तीर्थधाम थई पडे तेमां कंईपण अजब थवा जेवुं नथी.

---

## ५० रुपयांची पुस्तके ४० रुपयांत!!

### नित्योपयोगी स्तोत्रे

| | |
|---|---|
| श्रीरामरक्षा, (मूळ) | १ |
| मंत्रमाला, विविध जप | १ |
| श्रीशिवकवचम्, (मोठा टाइप) | १ |
| अकरा स्तोत्रे, परांजपे | १ |
| श्रीगुरुचरित्र १४ वा, १८ वा ५१ वा | प्र. १ |
| शतश्लोकी श्रीगुरुचरित्र | १ |
| नवीन आरती संग्रह (छोटा आकार) | १ |
| सर्वारिष्टनिवारण स्तोत्र | १ |
| सार्थ भीमरूपी स्तोत्र, घैसास | १ |
| सार्थ श्रीगणपत्यथर्वशीर्षम्, जोशी | १ |
| अष्टविनायकदर्शन यात्रा | २ |
| श्रीव्यंकटेश स्तोत्र, (मोठा टाइप) | २ |
| श्रीगुरुगीता, (मोठा टाइप) | २ |
| तुकारामाचे १२ अभंग | २ |
| सार्थ श्रीरामरक्षा, वि. वि. परांजपे | २ |
| सटीप श्रीमनाचे श्लोक, (छोटे) | २ |
| श्रीविष्णुसहस्रनाम (स्तोत्र) | ३ |
| सटीप मनाचे श्लोक, (देवस्थळी) | ३ |
| श्रीमद्भगवद्गीता, (मूळ) | ३ |
| सार्थ हनुमान चालीसा, घैसास | ३ |
| श्रीगणपत्यथर्वशीर्षम्, सहस्र-नामस्तोत्रम् व सहस्रनामावलि: । | ४ |
| श्रीशनिमाहात्म्य, (मोठा टाइप) | ४ |
| श्रीशिवलीलामृत ११ वा अध्याय | ४ |
| सार्थ श्रीव्यंकटेश स्तोत्र, कामत | ४ |
| ऋग्वेदीय सार्थ संध्या, वझेशास्त्री | ५ |
| श्रीदेवीस्तोत्राणि, दिवाकर माधव | ५ |
| श्रीगणेशस्तोत्राणि, दिवाकर माधव | ६ |
| सार्थ श्रीगुरुगीता, कामत, घैसास | ६ |
| सार्थ शिवमहिम्न: स्तोत्रम्, दामले | ६ |
| अष्टविनायक ९ फोटो | ९ |
| सप्तशती श्रीगुरुचरित्रसार | १० |
| मनोबोध, सार्थ श्रीमनाचे श्लोक, पांगारकर | १० |
| चल चल रे मुंग मुला, सौ. ग. देसाई | १० |

### चरित्र

| | |
|---|---|
| स्वामी नित्यानंद, स्वामीभक्त | ३ |
| अक्कलकोट स्वामी महाराज, माल्पाठक | ५ |
| गोंदवलेकर महाराज, माल्पाठक | ५ |
| शेगावचे गजानन महाराज, माल्पाठक | ५ |
| श्रीकृष्ण चरित्र, न. प. महाजन | ६ |
| जे. कृष्णमूर्ति, कृष्णप्रेमी | ८ |
| श्रीरामचरित्र, न. प. महाजन | १० |
| राजा शिवाजी, गो. स. सरदेसाई | २५ |
| जरा वळून मागे, डॉ. पाटणकर | १० |
| राष्ट्रगुरु समर्थ रामदास, न. प. महाजन | १० |
| स्वामी स्वरूपानंद, शांताराम थत्ते | २० |
| साईबाबा हाच चमत्कार, मवाणकर | २० |
| अंतरीच्या नाना कळा, नाना अभ्यंकर | ४० |
| श्रीसमर्थावतार, शं. श्री. देव | १२५ |
| समर्थ सदनातून स्पर्धेतील यशस्वी निबंध | १० |

### विवेचन, तत्त्वज्ञान व साधना

| | |
|---|---|
| ३३ सुविचारांचे दान, कामत | ३.३० |
| श्रीगणेश पूजा, दि. अ. घैसास | ४ |
| संतोषी माता व्रतकथा, दि. अ. घैसास | ३ |
| श्रीसाईगीतायन, चकोर आजगावकर | ५ |
| समर्थ स्थापित अकरा मारुती, हर्षे | ६ |
| रामदास आणि याज्ञवल्क्य, दातार शास्त्री | ६ |
| कुंडलिनीशक्ती, माल्पाठक | ६ |
| गायत्री रहस्य, रा. म. आठवले | १० |
| ज्ञानसुधा, रा. दि. दीक्षित | १० |
| नवविधाभक्ती, ल. रा. पांगारकर | १० |
| शक्तिपीठ दर्शन, ३॥ शक्तिपीठे, आबासाहेब आथवेकर | १२ |
| विमल वैजयंती, विमला ठकार | १२ |
| श्रीसत्यनारायण पूजा-कथा, वैशंपायन | १५ |
| श्रीललिताभाऊली | २० |
| पूजा करितो मी देवाची, घैसास | १५ |
| नामजपाचे महत्त्व, रा. कृ. कामत | २० |
| भक्तिमार्गप्रदीप, ल. रा. पांगारकर | २० |
| अभंग रत्नावली, १ व २ पाटणकर | प्र. २० |
| आत्मशक्ती, न. खं. क्षीरसागर | ३० |
| आत्मोल्लास, विमला ठकार | ५० |
| आधार पण आश्रय नव्हे, विमला ठकार | ५० |
| आर्य संस्कृति, श्रीधर स्वामी | ६० |
| जगावेगळं अध्यात्म, विमला ठकार | ७५ |
| सत्त्वाचा सागर, नरहरी सोनार | ७५ |
| पातंजल योगदर्शन, कोल्हटकर | १४० |
| स्वामी विवेकानंद समग्र ग्रंथ १ ते २१ | ५२५ |

### भविष्य आणि ज्योतिष

| | |
|---|---|
| जन्मटिपण (पुस्तक) | १.५० |
| भारताचा भावीकाल, (१९९१ ते २०००) | १५ |
| जन्मांक शास्त्र, केदार गोस्वामी | ३५ |
| सुलभ रत्नशास्त्र, केदार गोस्वामी | ६० |
| सुलभ ज्योतिषशास्त्र, कृ. वि. सोमण | ६५ |
| कुंडली संग्रह १ ते ८ विविध क्षेत्रांतील विविध व्यक्तींच्या ९६० कुंडल्या, तेंडुलकर | १२० |
| सुबोध भृगुसंहिता १-कुंडली खंड | ६० |
| २-३-४ पुरुष-स्त्री फलित खंड | १२० |
| ५-६ राजखंड व संतान उपाय खंड | ५० |
| ७ जातक खंड (भावचलित कुंडलीवरून प्रत्येक स्थानाचे विस्तृत विवेचन) | १२० |
| ३० वर्षांची ढवळे बृहत् पंचांगे (शके १८७९ ते शके १९०८) | २४० |
| ढवळे बृहत् पंचांग, शके १९१४ | १० |
| श्रीरामदास रोजनिशी (पॉकेट) | ५ |
| श्रीरामदास रोजनिशी, १९९२ | ३० |

### आरोग्य विषयक

| | |
|---|---|
| वृद्धजीवन, दत्तात्रयशास्त्री जळूकर | ३० |
| देही आरोग्य नांदते, वैद्य, गुर्जरपाध्ये | ७० |
| कायाकल्प, वैद्य गुर्जरपाध्ये | ८० |

## २०० रुपयांची पुस्तके फक्त १५० रुपयांत!!

### प्रासादिक ग्रंथ

| | |
|---|---|
| सार्थ अष्टावक्रगीता, शांताराम थत्ते | ७ |
| सार्थ पंचरत्न हरिपाठ, माडकर्णी | १० |
| श्रीभगवन्नामावलि: तारा देसाई | १२ |
| श्रीगणेशाथर्वशीर्ष विधानम्। जोशी | १५ |
| सविधानं ब्रह्मणस्पतिसूक्तम्। जोशी | २० |
| सार्थ श्रीमद्भगवद्गीता, गुणाजी | २० |
| श्रीशिवलीलामृत, सटीप-सचित्र | २० |
| वयोऽवस्थाभिधशांतिसमुच्चय:। जोशी | २५ |
| श्रीरुक्मिणी स्वयंवर, सचित्र | |
| सार्थ व्यासेश्वर माहात्म्य, पराडकर | ३० |
| श्रीशिवलीलामृत (मोठा टाइप) | ३० |
| सटीप श्रीदासबोध, शं. श्री. देव | ५० |
| श्रीगुरुचरित्र, कामत (लहान टाइप) | ५० |
| सटीप श्रीज्ञानेश्वरी, वा. अ. भिडे | ५० |
| समर्थांची बोधसुधा, दि. अ. घैसास | ६० |
| सार्थ श्रीमद् अध्यात्मरामायणम्। | ६५ |
| श्रीगुरुलीलामृत, वा. रा. वैद्य | ८० |
| श्रीगुरुचरित्र, कामत (मोठा टाइप) | ८० |
| बृहत् स्तोत्ररत्नाकर। १ व २ | |
| श्रीराम विजय, ना. रा. ताम्हे | ८० |
| मंत्रशास्त्र, गो. प्र. भावे | १०० |
| दिव्यामृतधारा १, आर्वीकर | १२० |
| श्रीगुरुचरित्रकथामृत, कामत, घैसास | १२० |
| सार्थ श्रीदासबोध, पांगारकर व नारायण महाराज | १२५ |
| श्रीसमर्थ ग्रंथ भांडार, पांगारकर | १२५ |
| सार्थ श्रीज्ञानेश्वरी, वा. अ. भिडे | १४० |
| सार्थ श्रीतुकारामाची गाथा, जोग | १६० |
| सार्थ श्रीएकनाथी भागवत, कृ. ना. आठल्ये, रा. कृ. कामत | १६० |

### शब्दकोश

| | |
|---|---|
| पॉकेट डिक्शनरी इंग्रजी-मराठी | ३० |
| मॉडेल डिक्शनरी (इं. म. इं.) रानडे | ५० |
| मॉडर्न डिक्शनरी (इं. इं. म.) | १३० |
| दि न्यू स्टॅण्डर्ड डिक्शनरी १ ते ३ सरमोकदम व खानोलकर (मराठी-इंग्रजी-मराठी) | संच ४०० |
| दि न्यू संस्कृत डिक्शनरी, देवस्थळी (संस्कृत-इंग्लिश-मराठी-गुजराती) | १०० |
| मराठी शब्दरत्नाकर, वा. गो. आपटे मराठी-मराठी शब्दकोश | ११० |
| सुलभ हिन्दी मराठी कोश, य. रा. दाते | १०० |

### डॉ. ग. शि. पाटणकर यांची शेतकऱ्यांना उपयुक्त पुस्तके

| | |
|---|---|
| शेळ्यांचे रोग व त्यांवर उपाय | १० |
| कोंबड्यांचे रोग आणि त्यावर उपाय | १० |
| शेतकऱ्यांचे जोडधंदे ३ रा | १० |
| पिकांचे रोग आणि त्यांवर उपाय १ व २ | २० |
| जनावरांचे रोग आणि उपाय १ व २ | ३० |
| भारतीय शेतीसंबंध सुधारणा, पंडितराव | १५ |

### बाल-कुमार वाङ्मय

| | |
|---|---|
| जादूची होडी, वि. वा. शिरवाडकर | ३ |
| विज्ञान कथा, | ५ |
| जाईचा कुंज, (बालगीते) कुसुमाग्रज | ५ |
| रॉबिन्सन क्रूसो सुखटणकर | ५ |
| रंगीत अक्षरे, (गोष्ट) नामजोशी | ५ |
| डॉन क्विक्झोट, मा. पं. शिखरे | ५ |
| सिंदबादच्या ७ सफरी, मराठे | ६ |
| सदाशिव शेलार, इंगळे | ६ |
| गलिव्हरचे प्रवास, गोरे | ८ |
| बालकल्पना, रम्यकथा, १ ते ३ | ९ |
| बालपंचतंत्र, १ ते ५, पोतदार | संच १० |
| बाल हितोपदेश, मनोहर | १२ |
| सिंहासन बत्तिशी, दि. अ. घैसास | १२ |
| छान गोष्टी, १ ते ७, दांडेकर | संच १४ |
| हजरजबाबी बिरबल, आशा भास्कर | १५ |
| तीन शिलेदार, सौ. उषा आपटे | १६ |
| वीस वर्षानंतर, सौ. उषा आपटे | १६ |
| नवल कथा, १ ते ९, रानडे | संच १८ |
| गणितातील गमती, कोळेकर | २० |
| रॉबिन हुड, भा. रा. भागवत | २० |
| गोष्टींचा तास, १ ते ११ वैद्य | संच २२ |
| बाल अरेबियन नाइटस्, १ ते २ | संच २४ |
| पुढे व्हा १ ते ३, यदुनाथ थत्ते | संच २४ |
| मनोरंजक नीतिपाठ, १ ते ४ वैद्य | संच ३२ |
| मनोरंजक सुबोध गोष्टी, १ ते ६ | संच ४८ |
| गोष्टी १ ते ३, चिंगी, खडकावरला अंकुर, ना. धों. ताम्हनकर | संच ६० |
| साने गुरुजींच्या गोडगोष्टी, १ ते १० | संच ८० |

### संस्कृत वाङ्मय

| | |
|---|---|
| सार्थ लघु अमरकोश, लोंढे | ३ |
| सार्थ सुवचनानि, द. वि. आपटे | १० |
| फर्स्ट बुक ऑफ संस्कृत, भांडारकर | २५ |
| सेकंड बुक ऑफ संस्कृत, भांडारकर | ३५ |
| संस्कृत पहिले पुस्तक, भांडारकर | २५ |
| संस्कृत दुसरे पुस्तक, भांडारकर | ३५ |
| रामकृष्ण (विलोम) काव्यम्। | १५ |
| प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान | ३० |

### कथा, कादंबऱ्या, प्रवास

| | |
|---|---|
| स्त्री मुक्ती स्त्री स्वातंत्र्य, पाटणकर | १० |
| मेघमल्हार, (नाटक) गोखले | १० |
| नर्मदा परिक्रमा, (प्रवास) ओगलेकर | २५ |
| हीर, (कथा संग्रह) सौ. विजया शेवडे | ३० |
| हृदयाची हांक, वि. स. खांडेकर | ४० |
| कांचनमृग, वि. स. खांडेकर | ६० |
| मोडी वाचन व लेखन, १ ते ३ वालिंबे | प्र. १५ |

### कवितासंग्रह

| | |
|---|---|
| सावरकरांची कविता, मायदेव | २५ |
| महाराष्ट्र गीता गाथा, प्रभुदेसाई | १२५ |
| नाट्यगीतांचे नोटेशन, भाग १ व २ डॉ. ग. शि. पाटणकर | प्र. २० |


## केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई-४ ■ फोन : ३५४८५३


४९ रुपयांपर्यंत कमिशन नाही. ५० ते १९९ रुपयांवर २० टक्के कमिशन. २०० पेक्षा अधिक रकमेवर २५ टक्के कमिशन. योग्य कमिशन वजा करून रक्कम पाठविल्यास टपाल खर्चाची व्ही.पी. करून पुस्तके पाठवू.

# सुख अध्यात्मात आहे; पण ते मिळेल कसे?

## कबीरांनी सांगितलेला सोपा मार्ग

–डॉ. श्रीपाद परुळेकर
लोंढा, कर्नाटक.

रहस्यवाद किंवा आत्मतत्व याचा आधार आहे सर्व शक्तिमानाची सर्वत्र अनुभूती आणि याच अनुभवावरून सर्व विषय-विकारांपासून दूर राहणे, भेदभाव मिटविणे, कर्मबंधनातून मुक्त होणे आणि अमृतत्त्वाची प्राप्ती करणे आदी गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत. सर्व सत्य परमसत्याशी जोडली गेलेली आहेत. नव्हे, तर सत्‌ची ही सर्व अंगे प्रत्यांगे आहेत. सत् आदित्यवत् व प्रकाशपूर्ण आहे. ते सूर्य-चंद्राप्रमाणे अबाधित आहे. त्याचा प्रकाश फैलावल्याने अंध:कार मिटतो.

अंध:कार म्हणजे काय? तर तो विषयजन्य विकारांचा किंवा आसक्तीचा क्लेश आहे. विकार मिटविणे म्हणजे दु:खाचा अंत करण्यासारखे आहे. दु:ख आणि सुखाचा उमाळा येण्याने परमतत्वाची अनुभूती होते. वेदांत सांगतो की निष्काम राहून कर्म करा. कर्म करणे अनिवार्य आहे. ते केलेच पाहिजे. ते कुणालाच चुकलेले नाही. पण आसक्त होऊन करण्याने ते बंधनकारक होते. तेच जर आसक्त न होता केले तर बंधनकारक न होता उद्धारकर्ते बनते. अनासक्त कर्म म्हणजे विद्या आहे. विद्या अमृतत्त्व देते.

**विद्ययाऽमृतमश्नुते –इशावास्योपनिषद**

**संत कबीर सांगतात –**

**व्यापक ब्रह्म सबनि में एकै।** किंवा

**इनमें आप आप सबहिन में**

'एकता'ची व्याख्या आमच्या पूर्वजांनी फारच उत्तम केलेली आहे. इशावास्योपनिषदात ते फारच स्पष्ट केलेले दिसून येते.

**यस्तु सर्वाणि**
**भुतान्यात्मन्येवानुपश्यति।**
**सर्व भूतेषु चात्मानं**
**ततो न विजुगुप्सते॥६॥**

जर कोणी मनुष्य सर्व प्राण्यांमध्ये आपणच आहोत, असे पाहील. म्हणजे इतरांचे सुख-दु:ख ते आपलेच सुख-दु:ख असे मानील. सर्व आपल्या शरीराचे भागच आहेत. आपले त्यांचे अतुट संबंध आहेत. आपण आणि दुसरे वेगळे नाहीतच मुळी. मग त्याला दुसऱ्यापासून संरक्षण करण्याची आवश्यकताच भासणार नाही. या एकतेमुळे आणखी एक फायदा होतो; तो म्हणजे शोक, मोह-माया यांचा जो भ्रम असतो त्याचा लोप होतो.

**यस्मिन सर्वाणि**
**भुतान्यात्मैवाभूद्विजानतः।**
**तत्र को मोहः कः शोकः**
**एकत्वमनुपश्यतः॥७॥**

जेव्हा आपल्या लक्षात येते की चराचरात 'तो' भरलेला आहे, तुमच्या माझ्यात सर्वांत 'तो' आहे, तेव्हा आपण समाधानी होतो. शोक, भ्रम यांना मग तेथे वावच नसतो.

कबीर म्हणतात:

**जब थैं आतमतत विचरा।**
**सब निर्खैरे भया सबहिन थे,**
**काम क्रोध महि डारा॥**

(३३ रामकली)

एकत्वाच्या अनुभवाने जो आत्मप्रकाश प्रकाशित होतो त्याचे फळ म्हणजे भ्रम-मोह-अंध:कार यांचा नाश आणि ही जी स्थिती ती 'हरिपद' स्थिती होय! कशी ते पहा.

**तेरा जन एक आध है कोई।**
**काम क्रोध अरु लोभ**
**विवर्जीत हरिपद चिन्हे सोई॥**

आणि हे तत्व एकदा का जाणले की व्यवहार आणि सर्वप्रकारची कर्मे पवित्र होऊन जातात. तसेच व्यक्ती निर्लिप्त होऊन कर्म करते व शोक, भ्रम, क्रोध यांचा तिच्यावर परिणाम होत नाही. यावर कबीर रामदास यांची एक मजेशीर परिभाषा आहे. ते म्हणतात:

**व्यंते तो माधो चिंतामणि**
**हरिपद रमै उदासा॥**

(३१ रामकली)

संन्यास याचा अर्थ असा नव्हे की संसार सोडून पळून जाणे किंवा पलायनवाद नव्हे. याचा स्पष्ट अर्थ असा की कर्मावर आसक्ती न राहिल्यामुळे त्याच्याशी बांधिलकी रहात नाही. बांधिलकी न राहिल्यामुळे व्यक्ती संसारात असूनसुद्धा मुक्त असते. संत एकनाथ महाराज यांचा संसार उत्तम होता. बायका-मुले आनंदी होती. मुलांचे उत्तमप्रकारे पालन-पोषण, शिक्षण झाले होते. पत्नीच्या विचाराला महत्त्व होते. इतके एकनाथ महाराज संसारात गुंतले होते. गुंतले होते, पण आसक्त झाले नव्हते. सर्व संसार करूनही ते अनासक्त होते.

उपनिषदकार सांगतात:

**आत्मा विन्वते वीर्यं विद्यया**
**विन्दतेऽमृतम्॥**

संयम, चेतना, एकता आणि अनुभव आत्म्याची शक्ती वाढवितात आणि यामुळे आत्मज्ञान प्राप्त होते. पूर्वी याला अमरत्व म्हणत असत. अमरत्व म्हणजे आत्मज्ञान प्राप्त झालेला माणूस इतक्या उंचीवर जातो की तो मृत जगात वावरत असूनही त्यापलीकडे गेलेला असतो.

जीव आणि आत्मा एकात्म करणे आणि सर्वत्र आत्म्याची उपस्थिती मानणे, ही गोष्ट संत कबीर सहजरीत्या दाखवितात, हा त्यांचा एक विशेष होय!

मैं डोरे डोरे जाऊँगा।
तो मैं बहुरि न भौ जल आऊँगा॥

किंवा

सुत बहुत कुछ थोरा।
ताथैं लाई ले कंथा डोरा॥
कंथा डोरा लागा।
तब जग मरण भौ भागा॥

आत्मज्ञानाची उपलब्धी झाल्यावर अमरतत्व कसे प्राप्त होते, हे स्पष्ट करताना संत कबीर म्हणतात:

जहाँ सुत कपास न पुनी।
तहाँ बसे एक मुनी॥
उस मूनी सूं चित्त लावुंगा।
तो मैं बहुरि न भौजल आऊँगा॥

उपनिषदांचे ते आपल्या भाषेत भाषांतर करतात:

जहाँ उगै सुर न चंदा।
तहाँ देख्या एक आनंदा॥
उस आनंद सुचित लाउँगा।
तो मैं बहुरी भोजल आउँगा॥

आणि ते मीलन कसे असेल, हे सांगताना ते म्हणतात:

तिस जोतिहि जोति मिलाऊँगा।

किंवा

तिस मूलहिं मूल मिलाउँगा॥

हरिपदाची ही अवस्था आहे. मिलनाचा हा उत्कट क्षण आहे.

तहा हेत चित्त लाउँगा।
तो मैं बहुरि न भोजल आउँगा॥

खरोखर, त्या परमज्योतीशी मिलनाची केवळ कल्पनाच काय आनंद देऊन जाते! आणि प्रत्यक्ष मिलनानंतर काय होत असेल, ते कोणत्या शब्दांत सांगू! म्हणूनच सर्व संतांनी 'याचसाठी केला होता सर्व अट्टाहास' तो उगीच नाही. आत्मज्ञानाने या गोष्टींची जाणीव करून घ्यायची असते. जीव आणि आत्मा यांची अखंडता जाणून घ्यायची असते. याचा आणखी एक दृष्टांत देताना संत कबीर म्हणतात:

सिंधव औंर कबीर मिल्यों है।

या अक्षय मिलनासाठी आत्मशुद्धीची गरज असते. मात्र विषयाकडे जर आपली गाडी वळली तर हे मिळणारच नाही आणि वाट्याला येईल ते दुःखच दुःख असेल. कर्मातून मग कधीच मुक्त होता येणार नाही. असे जर झाले तर हरिपद कुठून मिळायला! मग याला उपाय काय? संत कबीर सांगतात:

कहे कबीर मन बहु गुनी।
हरि भगति बिना दुख फुनी फुनी।

संत कबीर म्हणजे हरिभक्तीचे भांडार आहेत. विश्व आणि विश्वकर्ता एकच आहे आणि म्हणून तर पंढरपूरला राहूनसुद्धा ज्ञानेश्वर 'विश्वात्मके देवे' म्हणतात. ह्या सर्वांवर ते एकच उपाय सांगतात आणि तो म्हणजे भक्ती. त्यासाठी ते नारद, सनकादिकाला आदर्श मानतात.

सिव सनकादीक नारद ब्रह्म
लिया निज वास जी।
कहै कबीरपद पंकजा अब नेहा
चरण निवास जी॥

ह्या सर्वांचा थोडक्यात आशय सांगायचा झाला तर असे म्हणता येईल की एकाग्र होऊन प्रेम, भक्ती, श्रद्धा यांचा कुशलतापूर्वक उपयोग केल्यास या जगात काहीच अशक्य नाही.

---

## साईनामाची रांगोळी

साईनामाची रांगोळी
मी रेखीली प्रभाती
साईकृपे झाली जेव्हा
भक्तिमय जागृती॥धृ०॥

व्यथा वेदना संसाराच्या
जगण्याचे सत्व हरवले जेव्हा
शक्तितून भोळ्या भक्तिच्या
संजीवनी तत्व गवसले॥१॥

प्रारब्धाच्या चिखलातून
सत्याचे कमळ उगवले
प्रपंचाचा तेढा निवारून
साईप्रीतिचे उद्यान फुलले॥२॥

भ्रमाचा, मायेचा सारा गुंता
गेला तात्काळ निखळून
'सबका मालिक एक'चे तत्व
गेले जेव्हा प्रचिती देवून॥३॥

—श्री. दर्शन कोळी
पनवेल, रायगड.

---

# बोल अमृताचे, स्वामी स्वरूपानंदांचे

–श्री. भालचंद्र गन्दे
ठाणे (पश्चिम).

श्री अक्कलकोट स्वामी महाराजांच्या शिष्यपरंपरेतील स्वामी स्वरूपानंदांमुळे रत्नागिरीतील पावस या स्थानाला आज आगळे महत्त्व प्राप्त झाले असून ते तीर्थस्थान बनले आहे. स्वामी स्वरूपानंद यांनी पावसला वास्तव्य करून 'सोऽहं' साधनेचा पाठपुरावा केला. नाम-साधना वाढविण्याचे अवतारकार्य अखंडपणे करून ते पावसलाच समाधिस्थ झाले. त्यांचे समाधीस्थान अत्यंत प्रसन्न, शांत, भव्य-दिव्य असून जीवा-शिवाची गाठ पडणारा निवांत एकांत ही या समाधीस्थानाची भक्तांना मिळणारी अमोल देणगी आहे. स्वामी प्रकृती अस्वास्थ्यामुळे जास्त बोलत नसत. मोजके, पण नेमके बोलणे यामुळे भक्तांच्या नाना प्रश्नांना ते समर्पक उत्तरे देत. दौरे, वादविवाद, सभा, भाषण यांत त्यांनी भाग घेतला नाही. भक्तांशी थोडेफार बोलल्यावर ते पुन्हा श्री. देसाई यांच्या घरातील आपल्या खोलीत जावून निजत व अखंड 'सोऽहं' साधनेत रमत असत. आपल्या नाजुक प्रकृतीचा त्यांना साधना बळकट करायला जणू आधारच मिळाला. त्यांच्या हाताचे तळवे, पाय कापसासारखे मऊ होते. त्याप्रमाणे त्यांचा स्वभावही नम्र, निगर्वी, शांत होता. त्यांच्या नुसत्या दृष्टीक्षेपाने वा स्पर्शामुळेही समोरच्या माणसास दिव्य ज्ञान प्राप्त होई. मोजक्या, अल्प शब्दांत ते सारा भाव स्पष्ट करून आनंद देत असत. दूरवर असणाऱ्या आपल्या भक्तांना त्यांनी छोटीशीच, पण अनेक पत्रे लिहिली. त्यांची ही पत्रे, कलियुगात गुरुपादिष्ट मार्गासाठी धडपडणाऱ्या मुमुक्षूंना विचारप्रवर्तक, उद्बोधक व अमृतानुभव देणारी आहेत. म्हणून त्यानुसार आचरण करून, स्वतःच मार्गस्थ होण्यासाठी त्यातील काही निवडक पत्रे व संभाषणे मुद्दाम खाली देत आहे.

**वृथा अहंकार नको साधनेचा :**

अभ्यास हा ज्याचा त्यानेच करावयाचा असतो. अडी-अडचणींत मार्ग दाखविता येईल, पण योग्यता प्राप्त झाली नसताना उगाच घाई करून चालत नाही. एका बिंदूने जर अमरत्व लाभत असेल तर अमृताच्या कुंभांत बुडवल्यामुळे आणखी काही विशेष लाभ होण्याचा भ्रम कशाला? निदिध्यास, गुरुनिष्ठा, सतत अखंड 'सोऽहं' अनुसंधानात्मक भजन करावे. मग जसजशी प्रगती होईल तसतशी खूण पटू लागेल. गुरुरूपच होऊन भजन करावे ('सोऽहं' साधना करावी), म्हणजे कोणतेही न्यून रहाणार नाही. साधनेबद्दलही वृथा अहंकार नसावा.

**मी कोण? याचा वेध घ्या :**

ध्येय गाठण्याचे कार्य म्हणजे 'मी कोण?' हे समजून घेणे व 'मी'चा शोध करून त्यास हस्तगत करणे होय! 'मी कोण?' हे शोधण्यासाठी तळमळ, दृढनिश्चय, चिकाटी यांच्यासह मार्ग आक्रमण करणे, गुरुवर अढळ श्रद्धा ठेवणे वगैरे ध्येयपूर्तीच्या पायऱ्या आहेत. 'मी कोण?' याचा शोध लावून स्वानंद-साम्राज्याचा उपभोग घेण्याची तळमळ लागणाऱ्या प्राण्यास 'मुमुक्षू' व 'मी कोण?' याचा शोध लावून स्वानंद-साम्राज्याच्या उपभोगाच्या आनंदात रममाण होऊन मुरून जाणे यास 'मोक्षप्राप्ती' व आत्यंतिक आनंदाच्या स्थितीला 'मोक्ष' असे म्हणतात.

'मी कोण?' याचा शोध लावण्यास पुढील गोष्टींची जरूर आहे. प्रथम 'गुरुकृपा' संपादन करणे. मग आपल्या मनात कसल्याही संकल्प-विकल्पास थारा न देता, गुरुवचनावर अढळ व पूर्ण श्रद्धा ठेवून, अनन्यभक्तीने गुरुसेवा करून, आपल्या आचरणाने गुरुच्या अंतःकरणात आपल्याबद्दल प्रेमाचा ओलावा निर्माण करून त्यांच्या कृपेस आपण पात्र असल्याने सिद्ध करणे.

**सोऽहं साधना :**

गुरुचा अनुग्रह झाल्यावर, म्हणजे गुरुने मंत्रोपदेश दिल्यावर त्या मंत्राचा जप करावा. हा मंत्र म्हणजे 'मी कोण?' याचे उत्तर 'सोऽहं' हे होय! 'सोऽहं' याचा अर्थ 'तो मीच आहे', म्हणजे परमेश्वर तो मीच आहे, असा आहे. या मंत्राचा अर्थ ध्यानात घेऊन श्रद्धेने जप चालू ठेवला पाहिजे. संसारातील कोणत्याही व्यवहाराआड हा जप येणार नाही. 'सोऽहं'चे अर्थयुक्त अखंड अनुसंधान ठेवल्यामुळे विश्वाकडे साधकाला अलिप्तपणे पहाता येऊ लागते. अगदी देहपतनाच्या वेळीही कसलेही भय न बाळगता एकत्वात विलीन होता येते. वारा नसलेल्या ठिकाणचा दिवा जसा शांत तेवत असतो त्याप्रमाणे अखंड 'सोऽहं' अनुसंधानाने स्वस्वरूपाच्या ठायी बुद्धी अगदी स्थिर होऊन जाते. 'सोऽहं' अनुसंधानाने बुद्धी अगदी स्थिर होऊन वृत्तीही अगदी शांत ठेवणे शक्य होते. सर्वच कर्मांत, व्यवहारांत एकप्रकारची अलिप्तता आपोआपच येते.

**आपला अनुभव आपणच घ्यावा :**

स्वतःला पंडित समजणारे काही लोक नसती काथ्याकुट करून आपापल्यापरीने काहीही शोध-बोध लावोत. आपण आपला अनुभव घट्ट धरून अद्वैतरूप आनंदरसात डुबावे. अनुभवाशिवाय उगाच नसती बडबड आपल्याला नको. कोणताही संप्रदाय एकच सद्वस्तु दाखविणार. मग आपला 'सोऽहं' भाव काय वाईट?

''वस्तु शोधु जाता, वस्तूची झाला
मग काय पाहिजे हो त्याला॥''

स्वतः अनुभव घ्यावा. अनुभवी लोक पाठीशी असले की चुकायला होत नाही व निर्णय कायम राहून नेमक्या ठिकाणी जाता येते. जाण्याचा प्रयत्न मात्र थोडाफार जरी साधकाने सांगितलेल्या मार्गाने केला पाहिजे. मी तसा केला, तुम्हीही तसाच करा.

**भावातीत गुरुसेवा हवी :**

मी पादस्पर्श, हार घालून घेणे, पादसंवाहन करणे, पाद्यपूजा, तीर्थ देणे वगैरे गोष्टी नको म्हणतो, कारण अंतरीच्या शुद्ध भावाने हे सर्व लाभतेच. गुरुसेवा याचा अर्थ केवळ शारीरिक सेवा असाच काही नव्हे. काल तुम्ही माझ्या खडावा घेऊन पुढे आलात. असे नको. शिष्याचा भाव असावा, पण गुरुने शिष्याची सेवाही विशेष कारण नसताना घेऊ नये. ह्या सर्व भावनाच असतात. आपणाला भावातीत व्हायचे आहे. निर्गुण, निराकार उपासनेत हे कोठे बसते सांगा पाहू? माळ, जप, मृगाजीन, आसन ही साधकास साधकावस्थेत स्थिर करण्याची फक्त साधने. परतत्वावर अलक्ष लक्ष अखंड ठेवणे हे मुख्य, बाह्य गोष्टी गौणच.

**वृथा चिंता करून आत्मरूप विसरू नये :**

सतत 'सोऽहं' अनुसंधानात असता साक्षीवृत्तीने सतत आनंद भोगता येऊ लागतो. संसाराचे आघात सुलभतेने सहन होऊ लागतात. देवभक्त ऐक्यानंदातच रहातात. उगाच नसत्या चिंता करून आत्मरूपाचा विसर पडू देऊ नये. मनाची उद्विग्नता वाढवू नये. देवावर भार टाकून निष्काळजी रहावे. भक्त हा ईश्वरापासून वेगळा रहातच नाही. ज्याच्या ठायी 'सोऽहं' भाव अखंडित आहे अशा भक्ताचा तो 'सोऽहं' भावही शेवटी ईश्वराच्या ठायी तदाकार होऊन 'सोऽहं' वृत्तीही मावळते व तो आत्मरूपच होतो. ज्ञाता, ज्ञान सर्व एकरूपच होते. हीच एकनिष्ठ भक्ती होय!

**साधक-अवस्थेत गुरुसान्निध्याची गरज :**

ध्यानातून उठल्यावरही सर्व व्यवहार करतानादेखील 'सोऽहं'चे अनुसंधान राखण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे बाह्य जगाचे आघात मनावर कमी होतील. साधकाने वर्षातून एखादा महिना जरी गुरुसान्निध्यात सेवा, भजन, साधना केली तरी अकरा महिने साचलेली घाण, मळ धुवून जावून स्वस्वरूपी रहाण्यास मदत होते. गुरुसान्निध्य साधक-अवस्थेत काही काळ हवेच.

**गुरुनिष्ठा व नित्यनियमाने स्वानंदप्राप्ती :**

गुरुनिष्ठा ही कोणत्याही संप्रदायात अत्यंत महत्त्वाची मानलेली आहे. कबीराने म्हटल्याप्रमाणे हा देहरूपी वस्त्राचा शेला श्री सद्गुरुला सर्वभावे अर्पण करावा. 'सोऽहं'रूपी उभ्या व आडव्या धाग्यांनी हे वस्त्र विणले जाते. जर काही कारणाने विक्षेप येऊन भजनात खंड पडला तर या वस्त्राचे धागे तुटतात. ते परत साधून घेऊन रोज नित्यनियमाने वस्त्र विणून जीवनयात्रेने महावस्त्र गुरुस सर्वभावे अर्पण करावे. अहंकार समूळ नाहिसा झाल्यावर गुरुच शिष्य बनून हे वस्त्र विणून दाखवितो. त्याचा तोच खेळतो, हा अनुभव येऊ लागतो. त्या आनंदाची अवीट गोडी अनुभवीत जीव संसार मोक्षमय झाल्याचे पहातो. सर्वच हरिरूप दिसू लागून स्वानंदाचा उपभोग घेत जीव लिलया रमत असतो. हाच 'सोऽहं' मार्ग होय! तुम्ही अभ्यास, भजन अथवा नित्यनेम काहीही म्हणा, पण ते शेवटपर्यंत करीत राहिले पाहिजे. दररोज केव्हाही **कोठेही अल्प तरी साधना आवश्यक आहे.** दररोज कोठेही असताना कशाही परिस्थितीत असता थोडा वेळ का होईना, 'सोऽहं' ध्यान प्रसन्नचित्ते, भक्तिभावाने करून मग सांसारिक जीवनास सुरुवात करावी. 'सोऽहं' चिंतनाने मनास वाटेल तसे भटकण्यास वावच रहात नाही. 'सोऽहं' साक्षित्वाने सुखदुःखाचे हेलकावे सहन होऊन आपण संपूर्ण अलिप्त असून देहप्रारब्धानुसार वर्तत आहोत, असा खेळ लिलया पाहता येतो.

**अलिप्तपणे आसक्तिरहित संसार करा :**

मुलाबाळांनी ऐकल्यास योग्य तो सल्ला द्यावा. संसारात कोणत्याही बाबतीत अट्टाहास न ठेवता अलिप्तपणे संसार करावा. देहधर्म आहे तोपर्यंत काळ, वेळ, परिस्थितीनुसार वागूनही शांती ढळू देऊ नये. मूळ भजनात सतत रहावे, म्हणजे सर्व गोष्टी साधतात.

**गुरुवर श्रद्धा ठेवून, मायेत न रमता, सतत प्रयत्न करा :**

सर्व गोष्टी काय, घटना काय अथवा वेळा काय, नेहमी त्याच तऱ्हेच्या रहात नाहीत. शनिवारवाडा बांधण्याच्या सोहळ्याचे चित्र पाहणाऱ्यांसमोर त्याची आजची स्थिती वर्तविली असती तर त्यावेळी फारच विपरित वाटली असती. सिद्ध होऊ इच्छिणाऱ्याने, नित्यानित्य विवेकाने सर्व व्यवहार, मायेचे खेळ लीलेने जाणून आपण अज, अव्यय, अरूप कसे आहोत, हे ओळखून सर्व गोष्टी तटस्थपणे पहावयास शिकले पाहिजे. अशा विचाराने मनाला मोठी वाटणारी गोष्ट या विश्वाच्या पसाऱ्यात क्षुल्लक व क्षणभंगुर दिसेल. तुमच्या ऑफिसमधील कसली केस? त्याची कसली चिंता? काय भय? जे जे होते तो त्याचाच खेळ. जीवास बोध देण्यासाठी ते घडते, असे समजावे. सर्व गोष्टींतील व्यावहारिक व पारमार्थिक अर्थ जाणून, 'मी कोण?' 'मी कसे वागावयाचे?' 'मला कसले बंधन?' 'कसली मुक्ती?' 'कल्पनांचा पसारा मांडून कोडी उलगडण्याचे प्रयत्न तरी कशाला करावयाचे?' एकच ध्येय, सद्गुरुंनी सांगितलेल्या महावाक्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून सतत मार्ग आक्रमित आनंदधाम गाठावे. प्रयत्न

सातत्याने असावा व त्यामुळेच कार्यभाग होईल, अशी पूर्ण खात्री बाळगा.

**रोज पहाटे अनुसंधान साधावे :**

तुम्ही पहाटे एकदोन तास 'सोऽहं' भजन करा. मनाच्या वृत्ती कशा उठतात, कशा मावळतात, कोठून उद्‌भवतात, ते 'सोऽहं' अनुसंधान करीत असता पहा. त्याचा उगम, लय यांचे साक्षित्व करीत करीत पुन्हा साक्षी ते स्फुरण, आपणावाचून दुसरे कोण, तेच आपण, तेथेच स्थिर व्हावयाचे, असा ज्ञानदृष्टीने अभ्यास करता करता सर्वच गोष्टींचा उमज पडेल.

**श्रद्धायुक्त प्रार्थनेने संकटनिरसन :**

देवाच्या अनन्य प्रार्थनेवाचून दुसरा काय उपाय असणार? साधक मात्र एकनिष्ठ असावा. उडी टाक म्हटले की त्याने उडी टाकली पाहिजे. असे असेल तर देवसुद्धा त्यास झेलण्यास तयार असतो. अनन्यभावाने भक्ती करावी, म्हणजे देव रक्षण करतो. काळजी, संकटे सर्व त्याच्याच कृपेने दूर होतात.

**सर्व क्रिया वासुदेवमय करा :**

याज्ञवल्क्य, जनक, एकनाथ वगैरेंनी राज्य, संसार करूनही समत्वाने, अकर्तेपणाने, अहंकारविरहित सर्व गोष्टी केल्या. ते लोक खरेखुरे त्यागी, संन्यासी. करून अकर्ते होते. मूळ गोष्ट ईश्वराबद्दल दृढभाव व सर्वार्पण शुद्ध व स्थिर बुद्धी झाली की संकल्प, विकल्पात्मकवृत्ती उठतच नाहीत. अशामुळे सर्वच क्रिया कर्मे वासुदेवमयच होतात. अशा भक्तांवर संकटे, दुःखे वगैरे आघात आले तर त्याची काळजी नारायणालाच लागते. तोच त्या भक्ताच्या पाठीशी राहून त्याचे संरक्षण करतो, ही गोष्ट त्रिकालाबाधीत सत्य समजा.

**सद्‌गुरुशक्ती पाठीशी असतात :**

आदिनाथ, मत्स्येंद्र इत्यादी गुरुपरंपरेतील सर्व महान शक्ती, साधकाच्या पाठीशी अहर्निशी वास करीत असतात. 'सोऽहं'च्या साधनेत काही न्यून रहात असले तर सद्‌गुरुच सर्व पूर्ण करतो व हळूहळू साधकास पुढे नेतो. आत्मबोधाच्या वारंवार अनुसंधानात्मक अभ्यासाने प्रयाणकाळीही सद्‌गुरु स्वस्वरुपाची आठवण देऊन त्यावेळीही काही अडचण निर्माण होऊ देत नाही.

## साईसेवेचे फळ

सेवेचे प्रकार अनेक, भाई, सेवेचे प्रकार अनेक।
कुणी करिती जनसेवा, कुणी करिती रुग्णसेवा॥
कुणी करिती देशसेवा, कुणी करिती कुटुंबसेवा।
मला आवडे साईसेवा, तोच मम एक देव खरा॥१॥

साईसेवेचे नसे अवडंबर, म्हणा वाचे साईराम साईशिव।
साई निवारिल दुःख, येईल भक्ताची त्यास कीव॥
व्हा सावध सज्जन हो, लुटा सोने साईनामाचे।
होईल नष्ट दुःख भवाचे, अन् उघडेल दार मुक्तिधामाचे॥२॥

सुचतील तैसे बोल बोबडे, साईसेवेत व्हावे अर्पण।
बोलविता धनी साई, त्याच्या चरणी लीन झाले मीपण॥
आणिक काय मागायचे साई, जगाचे तुम्ही हो स्वामी।
उरलो कुठे मी म्हणता साई, तूच असे जगी नुरलो मी॥३॥

–श्री. बापूराव पोवार 'विठाईसुत'
कोल्हापूर.

प्रेमें घेईल जो मन्नामा। तयाच्या मी सकल कामा। पुरवीं प्रेमा वाढवीं॥११॥ मग जो गाई वाडेंकोडें। माझें चरित्र माझे पवाडे। तयाचिया मी मागें पुढें। चोहींकडे उभाचि॥१२॥ जे जे भक्त मजकारणें। असतील विनटले जीवें प्राणें। तयांसी या कथाश्रवणें। आनंद होणें सहजीच॥१३॥ कोणींही केल्या माझें कीर्तन। तयासी देईन आनंदघन। नित्य सौख्य समाधान। सत्य वचन मानावें॥१४॥ जो मजलागीं अनन्य शरण। विश्वासयुक्त करी मद्भजन। माझें चिंतन माझें स्मरण। तयाचें उद्धरण ब्रीद माझें॥१५॥ माझें नाम माझी भक्ती। माझें दफ्तर माझी पोथी। माझें ध्यान अक्षय चित्तीं। विषयस्फूर्ती कैंची त्या॥१६॥ कृतांताच्या दाढेंतून। काढीन मी निजभक्त ओढून। करितां केवळ मत्कथा श्रवण। रोगनिरसन होईल॥१७॥ कथा करा सादर श्रवण। त्यावरी करा पूर्ण मनन। मननावरी निदिध्यासन। समाधान पावाल॥१८॥ 'अहं सोहं' जाईल विरोन। उन्मन होईल श्रोतियांचें मन। चित्त होईल चैतन्यघन। अनन्य परिपूर्ण श्रद्धेनें॥१९॥ 'साई साईति' नामस्मरण। करील सकल कलिमल दहन। वाणीश्रवणगतपापभंजन। एक लोटांगण घालितां॥२०॥

–अध्याय ३, श्री साईसत्‌चरित

# योगेश्वर याज्ञवल्क्य

-श्री. ग. रा. दण्डे
लातूर.

**"हा वेदार्थ सागरु। जया निद्रिताचा घोरू"**

असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. याचा अर्थ असा की अनादि भगवंत निद्रिस्त असताना त्याच्या उच्छ्वासाचा जो नाद प्रगट झाला तो म्हणजे वेद. म्हणूनच वेद अपौरुषेय आहेत, असे म्हटले जाते. या वेदसागरातील शब्द त्याच्या प्रतिष्ठेला, अर्थाला, नादाला आणि त्यातून होणाऱ्या अनुभूतीला यथायोग्य स्थान देवूनच उच्चारावे लागतात. हे शब्द श्रवण केल्याशिवाय उच्चारता येत नाहीत. म्हणूनच वेदांना 'श्रुति' असेही म्हणतात. प्रथम हे नादब्रह्म कोट्यावधी वर्षे विश्वात घुमत राहिले. प्रज्ञावंत ऋषींनी या नादाला अक्षरबद्ध, अर्थबद्ध व मंत्रबद्ध केले. त्या नादाला त्यांनी शुद्धोचाराची साथ दिली. त्यामुळे या अक्षर वाङ्‌मयाचे ताजेपण अविरत टिकून आहे. ते कधीच शिळे होत नाही. महर्षि व्यासांनी वेदज्ञान सागराचे चार विभाग केले व ते आपल्या चार समर्थ शिष्यांना अध्ययन, मनन व आचार करण्यासाठी दिले. ते याप्रमाणे :

| वेदाचे नाव | व्यास-शिष्य |
|---|---|
| १. ऋग्वेद | पैल+सांख्यायन |
| २. यजुर्वेद | वैशंपायन+शुक्लयजुर्वेद माध्यंदिनशाखा व कृपणयजुर्वेद कण्वशाखा |
| ३. सामवेद | जैमिनी+सामश्रवण कौस्तुभ |
| ४. अथर्ववेद | सुमन्तु+शौनक |

वरीलप्रमाणे यजुर्वेदाच्या विद्यापीठाचे आचार्य वैशंपायन मुनि होते. याज्ञवल्क्य हा त्यांचा भाचा. बालपणापासूनच तो अत्यंत प्रखर बुद्धिमत्तेचा होता. त्यामुळे तो आपले गुरु वैशंपायन यांना नाना शंका उपस्थित करी. त्याचा आत्मविश्वास व स्वाभिमान वाखाणण्यासारखा होता. आपल्या गुरुंनी त्याला समाधानकारक उत्तरे न दिल्याने त्यांच्याशी त्याचे वारंवार खटके उडू लागले. त्याला यजुर्वेदाचे संपूर्ण ज्ञान होणे अशक्य आहे, असे वाटले म्हणून दुसऱ्या गुरुकडून याचे अध्ययन करण्याचे त्याने ठरविले, पण तत्पूर्वी आपणाकडून मिळविलेली विद्या त्याने परत करावी, असे वैशंपायन गुरुजींनी आज्ञा दिल्यामुळे त्याने त्याचे पालन केले व आश्रमाबाहेर तो वेदज्ञानरहित बाहेर पडला. वरील कटु अनुभवामुळे इतर कुणा ऋषीकडे न जाता यजुर्वेदाचे अथपासून पूर्ण ज्ञान प्रत्यक्ष सूर्यदेवाकडूनच आत्मसात करण्यासाठी याज्ञवल्क्यांनी घोर तपश्चर्या केली व प्रत्यक्ष सूर्यमुखातून यजुर्वेद त्याने मिळविला. तो अत्यंत शुद्ध स्वरुपात असल्याने त्यास शुक्लयजुर्वेद असे म्हणतात. वैशंपायन प्रणित आधीच्या यजुर्वेदाला त्यामुळे कृष्णयजुर्वेद हे नाम प्राप्त झाले. ही विद्या वैशंपायनशिष्य कण्व ऋषींना प्राप्त झाली. याज्ञवल्क्यांनी शुक्लयजुर्वेद सर्वप्रथम मिळविला व एक नवा संप्रदाय निर्माण केला. त्यांनी अनेक मौलिक ग्रंथ संस्कृत भाषेत रचिले. त्यांचा स्मृतिग्रंथ अतिशय प्रसिद्ध आहे. मनुस्मृतिनंतर याज्ञवल्क्यस्मृति हा ग्रंथ तितकाच शिरोधार्य मानला जातो. त्यांनीच ईशावास्योपनिषद, ब्रहदारण्यकोपनिषद इत्यादी उपनिषदे रचली. यांना भारतीय संस्कृतीचा अमोल ठेवा मानले जाते.

मिथिला नरेश राजर्षि जनक हा याज्ञवल्क्यांचा शिष्य होता. त्यांच्या उपदेशानेच विदेही जनक अशा योग्यतेस तो प्राप्त झाला. जनकाबद्दल असे म्हटले जाते की त्याचा एक पाय गंधलेपनासाठी त्याच्या पत्नीच्या मांडीवर व दुसरा पाय विस्तवावर ठेवलेला असे. दोहोंचे सुख-दुःख त्याला समान होते.

महर्षि याज्ञवल्क्यांच्या थोर कर्तृत्वामुळे पुढे त्यांना योगीश्वर हे सार्थ नामाभिधान श्रीकृष्णाप्रमाणे प्राप्त होऊन त्यांनी स्वतंत्र शुक्लयजुर्वेद ही नवशाखा निर्माण केली. याच उज्ज्वल शाखेत श्री दत्त, श्री नृसिंह सरस्वती, श्री ज्ञानेश्वर माऊली, पूर्वाश्रमीचे साईबाबा (मराठवाड्यातील पाथरीचे कुलकर्णी यांचा मुलगा) व ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज इत्यादी अनेक विभूती अवतरित झाल्या.

महर्षि याज्ञवल्क्यांनी ब्रह्मवेत्तेपद व योगीश्वरपद मिळविण्यासाठी सर्वसंग परित्याग केला नाही की सांसारिक जीवनाला ते पराङ्‌मुख झाले नाहीत. उलट **"प्रपंच करावा नेटका। मग परमार्थ पहावे विवेका"** ही श्री समर्थोक्ती त्यांनी हजारो वर्षांपूर्वी खरी करून दाखविली. याज्ञवल्क्यांना कात्यायनी व मैत्रेयी अशा दोन भार्या होत्या. कात्यायनी प्रपंचवादी होती तर मैत्रेयी अध्यात्मवादी होती. ह्या दोघींशी आदर्श संसार करून महर्षि याज्ञवल्क्यांनी चिरंतन स्वरूपाचे कार्य केले व प्रपंच साधून मोक्षाची प्राप्ती करून घेतली. प्रपंचात व्यवहार व ध्येयवादाचा यशस्वी समन्वय घडवून आणला.

ब्रह्मज्ञानी गार्गी ही महर्षि याज्ञवल्क्यांची शिष्या होती. केवळ अठरा वर्षांची असतानाच गार्गीने ब्रह्मज्ञान प्राप्त केले. राजा जनकाच्या दरबारात याज्ञवल्क्यांनी भारतातील त्या काळातील सर्व थोर विद्वानांना पराभूत केले व सर्वश्रेष्ठ ब्रह्मवेत्तेपद मिळविले. या सभेत गार्गी होती. सर्वांच्या शेवटी तिने जो संवाद याज्ञवल्क्यांशी केला तो अपूर्व असून प्रत्येकाने वाचण्यास योग्य आहे. शेवटी तिनेही मान्य केले की याज्ञवल्क्य हे पूर्ण ब्रह्मज्ञानी असून त्यांच्याशी ईर्षायुक्त वादविवाद करून सर्वनाश ओढवून घेऊ नये. तिच्या या समारोपाने सभेतील सर्व आचार्यांनी मौन धारण केले व पराभव मान्य केला. प्राचीन काळात भारतात स्त्री-पुरुष सर्वांना ज्ञानाची कवाडे मोकळी होती. कात्यायनी, मैत्रेयी व गार्गी ह्या ज्ञानाच्या तेजोराशींचे स्फूर्तीस्थान योगीश्वर श्री याज्ञवल्क्यच होते.

# क्षमाशीलता एक महत्त्वाची पायरी

-श्री. अनिल रसाळ
वडाळा (पूर्व), मुंबई.

सध्याच्या जीवनात मनुष्यस्वभाव अतिशय स्वार्थी, मतलबी व आत्मकेंद्रित झाला आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनात समन्वय घडविणारी माणसं खरोखरच दुर्मिळ झाली आहेत. तशात कपटीपणाने आपआपसात कलह निर्माण होऊन तो दीर्घकाळ रहावा, असा प्रयत्न गुप्तपणे करणारी माणसं फारच मोठ्या संख्येने वावरत आहेत. यांचा परिणाम म्हणजे साध्या साध्या प्रसंगांनी माणसामाणसातील गैरसमज वाढत जातो व अशाप्रकारच्या क्लेशकारक अनुभवांनी मन:शांती ढासळते. असे प्रसंग नित्य घडत असतात. असे वारंवार घडत असल्यामुळे साधकाची साधना एकाग्रतेने न होता ती अव्यवस्थित होते व यामुळे त्याची या मार्गावरची चाल मंदगतीने होऊ लागते. साधक जर 'पक्का' नसेल तर त्याच्या श्रींवरील श्रद्धेला ह्या नित्य घडणाऱ्या घटनांनी तडे जाण्याचा दाट संभव असतो.

माझ्या स्वत:च्या वैयक्तिक जीवनात व माझ्या माहितीतील माणसांच्या जीवनात अशा नित्य घडणाऱ्या घटनांचा मनस्ताप मी स्वत: अनुभवला व इतरांना होत असलेला पाहिला आहे.

या संदर्भात इथे हे नमूद केले पाहिजे की आपण आपली साधना व नित्यक्रम जास्तीत जास्त निष्काम ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याचा परिणाम फारच चांगला होतो. तो म्हणजे असे नित्य घडणारे प्रसंग आपण एका वेगळ्या दृष्टीतून पाहू लागतो. ही दृष्टी म्हणजे श्रींच्या अभ्यासक्रमातील फारच मोठा गुण 'क्षमाशीलता' आपल्या व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य भाग बनविण्यासाठी ही श्रींची योजना आहे, असे आपल्याला मनोमन पटणं!

आपल्या समर्थांच्या जीवनातही त्यांना त्रास देणारी माणसं फार मोठ्या संख्येने त्यांच्या सुरुवातीच्या काळात आली. सुरुवातीची अनेक वर्ष त्यांना बहुसंख्य शिरडीकर एक वेडा फकीर समजत असत. परंतु त्यांच्या दैवीगुणांतील सर्वात मोठा गुण 'क्षमाशीलता' हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग असल्याने त्यांची मन:शांती कधीही ढळली नाही. त्यांचे निंदक त्यांचे स्तुतिपाठक व समर्थक झाले. हा कायापालट श्रींच्या क्षमाशीलतेनेच केला. असाच बदल श्री ज्ञानेश्वर माउलीने, तुकाराम महाराजांनी व अनेक संतांनी आपल्या क्षमाशील स्वभावाने केला. आपल्या स्वत:च्या जीवनात आपण योग्य ठिकाणी व योग्य प्रसंगी क्षमाशील राहिल्यास नंतर येणारी उद्विग्नजन्य सल आपल्या जीवनात येत नाही.

हे निश्चितच खरे की प्रत्येक कटु व गोड घटना श्री बाबांच्या सत्‌चरिताचा सुगंधच घेऊन येत असते. फक्त आपण ती योग्यप्रकारे वाचत नाही. त्यामुळे प्रत्येक घटनेच्या छिद्रीने आपल्या हृदयातील साईराम प्रगट होणार आहे, हे आपल्याला कळत नाही. त्यामुळेच आपण निष्कारण श्री बाबांवरील श्रद्धेला तडे जाऊ देतो व साधना सोडून देतो.

खरा साधक खडकासारखी निश्चल श्रद्धा ठेवून असतो. तो अशा प्रसंगात डगमगत नाही. त्याची साधना तो अशाही परिस्थितीत नियमित व निष्कामपणे चालूच ठेवतो. त्यामुळे त्याची चित्तशुद्धी इतकी चांगली होते की त्यामुळे प्रत्येक कटु घटना ही श्रींनी आपण किती पक्के आहोत, हे जोखण्यासाठी पाठविली आहे, हे त्याला झटकन् कळते. त्यामुळे साधनेचा कस जोखला जात आहे, हेही त्याला पटते. त्याच्या मनाची जर त्या प्रसंगांनी घालमेल झाली असेल तर न्यायाधिशाच्या नि:पक्षपाती व न्यायनिष्ठूर अलिप्त वृत्तीने स्वत:च त्याचे कारण, आपल्यात क्षमाशीलतेचा अभाव आहे, असे ओळखून त्याने तो गुण आत्मसात करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. जसजसा हा गुण आपल्यात येतो तसतसे आपण जास्तीत जास्त शांत होतो. साधना नियमित तर होतेच, पण त्याच्याही पुढे त्याला ज्ञानानुभूती होते. त्याच्यापुरता तरी तो सतत आनंदात रहातो, कारण त्याची वृत्ती ज्ञानेश्वरीतील खालील ओव्यांतील क्षमाशीलतेची होते.

**आंगा जें पातलें। तें करून घालीं आपुलें।**
**तेथ साहतेनि नवलें। घेणिजेना।।३५२।।**
**हे अनाक्रोश क्षमा। जयापाशीं प्रियोत्तमा।**
**जाण तेणें महिमा। ज्ञानासि गा।।३५३।।**

-अध्याय १३

वरील अनुभवाने तो क्षमाशीलता ही आपल्या आध्यात्मिक शिडीची फारच महत्त्वाची पायरी समजतो व प्रत्येक योग्य ठिकाणी तो थोर गुणांचे वंगण वापरून आपल्या जीवनाची चक्र न कुरकुरता चालू ठेवतो.

# पूर्णब्रह्म ॐ श्री शिरडी साई

– डॉ. भा. पं. जोशी
निगडी, पुणे.

दत्तावतार मालिकेतील ॐ श्री शिरडी साई या पूर्णब्रह्माविषयी संपूर्ण जगाच्या पाठीवर ''हे दैवत माझे आहे'' अशाप्रकारचे एक विलक्षण विलोभनीय वलय आहे. श्री साईबाबांनी अध्यात्माच्या माध्यमातून जनजागरण करून सश्रद्ध, क्रियाशील, डोळस, सद्‌विचारी, सदाचारी, सुसंस्कृत, भेदाभेद न मानणारा असा मानव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय अस्मिता त्यांच्या संदेशातून बहरली, फुलली. 'अनेकातून एकता' ही त्यांची शिकवण आहे. साईबाबा सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान आहे. ते अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज पूर्णब्रह्म चैतन्य अवतार आहेत. ते पूर्णब्रह्म सद्‌गुरु गुरुदत्त, पूर्णब्रह्म शंकर व स्वामी समर्थ यांचे अवतार आहेत. त्यांचे कार्य संपूर्ण मानवसमाजासाठी व धर्म-जातीभेदविरहित मानवी मूल्यांवर आधारित होते. त्यांना जाती-धर्माप्रमाणेच श्रीमंत-गरीब हा भेदभावही मंजूर नव्हता: गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्व थरांतील लोकांना त्यांच्या भक्तांत समावेश होता. आजही शिरडीला गरीब-श्रीमंत, हिंदू-मुसलमान-ख्रिश्चन असे सर्वच लोक मोठ्या संख्येने, भावुकतेने, आशेने साईबाबांकडे आलेले आपल्याला वघावयास मिळतात. असा हा भेदाभेद विरहित एकत्रित परिवार जगाच्या पाठीवर कोठेही दिसणार नाही. यातच साईबाबांच्या शिकवणुकीचे यश दिसून येते आणि म्हणूनच ते पूर्णब्रह्म आहेत. 'सबका मालिक एक' हे वाक्य एकदम यथार्थ वाटते. अखंड भारताचे एकात्मिक छोटे स्वरूप म्हणजेच 'साईंची शिरडी' होय!

यावरून आपल्या लक्षात येईल की साईबाबा ही केवढी मोठी शक्ती आहे! त्यांच्या नुसत्या नामस्मरणाने मनुष्य सुखी होतो. साईबाबा सर्वज्ञ, सर्व चराचरात व्यापून राहिलेला विश्वचालक ॐकारमय पूर्णब्रह्म आहे. आजही भक्तांना ते दर्शन देतात, त्यांचा योगक्षेम चालवितात.

कोणत्याही धार्मिक कृत्यात ढोंगीपणासारख्या वाईट गोष्टी असू नयेत. प्रत्येक धार्मिक कृत्य वाईट आहे, असे म्हणून ढोंगी, नास्तिक बनण्यापेक्षा डोळस श्रद्धाळू बनणे व्यक्तीच्या व देशाच्या हिताचे आहे. अशी डोळस श्रद्धाळू माणसे आपल्या देशात निर्माण व्हावीत, त्यांनी समाजाला, देशाला सामर्थ्यशाली बनवावे, दुष्टपणा नाहीसा व्हावा, आपापसातील प्रेम वाढावे, दुसऱ्याच्या सुखासाठी धडपडण्याची वृत्ती निर्माण व्हावी, ही शिकवण बाबांनी दिली.

समाजात अंधश्रद्धा नसावी, परंतु तो समाज श्रद्धाहीनही नसावा. दुर्दैवाने समाजातील श्रद्धा आज नष्ट होऊ पहात आहे.

**तुम्ही जर माझ्याकडे पहाल तर मी तुमच्याकडे पाहीन!**

बाबा म्हणतात, तुम्ही माझ्यावर श्रद्धा ठेवा, भक्ती करा व चांगल्या मार्गाने कर्म करीत जा. मी तुमच्या पाठीशी आहे. तुम्हाला कधीही एकटा पडू देणार नाही.

**नुसते कर्मकांड नको!**

बाबांना नुसते कर्मकांड मान्य नव्हते. निव्वळ गप्पा मारणारी माणसे त्यांना आवडत नसत. त्यांना स्वतःच्या पायावर व हिमतीवर उभ्या राहणाऱ्या लोकांबद्दल आदर होता.

आज कोणत्याही देवतेची उपासना म्हणजे त्या देवतेचे दर्शन, तिचे उपवास, तिचा मंत्रजप आणि तिच्यावरील एखाद्या पोथीचे पारायण असाच अर्थ होऊन बसला आहे.

**विज्ञानाला अध्यात्माची जोड हवी!**

जप, तप, ध्यान, प्रार्थना ही अत्यंत प्रभावी अस्त्रे परमेश्वराने मानवाला बहाल केली आहेत. परंतु त्यांचा उपयोग आम्ही जवळजवळ विसरूनच गेलो आहोत.

समाज भौतिकदृष्ट्या जरी प्रगत झाला तरी तो दिशाहीन, संस्कृतीहीन असेल तर खऱ्या सुखापासून वंचितच असतो.

जप, तप, ध्यान वगैरे गोष्टी मनाला दिलासा द्यायला उपयोगी ठरत असल्या तरी खरी भक्ती संत-महंतांच्या उपदेशांचे प्रत्यक्ष पालन करण्यात आहे.

विज्ञानाने आज प्रगती केली आहे. परंतु त्याला अध्यात्माची जोड नसल्यामुळे सर्वत्र आतंकवाद, फुटीरतावाद वळावू लागला आहे. एकमेकांवर कुरघोडी करण्याची जीवघेणी स्पर्धा चालू आहे. हे सारे जर संपवायचे असेल तर विज्ञानाला अध्यात्माची जोड दिली पाहिजे.

जीवनातल्या सर्व समस्या विज्ञान सोडवू शकलेले नाही. अनेक वेळा डॉक्टरच निर्णय देतात, ''आमचे उपाय हरले. आता देवावर विश्वास ठेवा!'' हे लक्षात घेऊन अमेरिकेतील एका डॉक्टरने चक्क प्रार्थना-चिकित्सेचा उपयोग केला; तो असा:

'ल्युकेमिया' नावाचा आजार झालेल्या १८ मुलांपैकी १० मुलांची नावे त्याने त्या कुटुंबांना कळवून त्या मुलांसाठी रोज प्रार्थना करण्याची विनंती केली व उरलेल्या आठ मुलांसाठी अशी प्रार्थनेची व्यवस्था केली नाही. नंतर सर्व १८ मुलांवर योग्य ते औषधोपचार सुरु केले. १५ महिन्यांनंतर त्या पहिल्या प्रार्थना करायला सांगितलेल्या १० मुलांपैकी सात मुले ठणठणीत बरी झाली व दुसऱ्या आठ मुलांपैकी, म्हणजे ज्यांच्यासाठी प्रार्थनेची व्यवस्था केली नव्हती त्यांपैकी दोनच मुले बरी झाली. यावरून त्या डॉक्टरने असे अनुमान काढले की आजारावर प्रार्थनेचा उतारा पडतो.

म्हणूनच आयुष्यात संकटांना सामोरे जाण्यासाठी, कळत नकळत झालेल्या चुकांच्या पश्चात्तापासाठी परमेश्वराची प्रार्थना उपयुक्त ठरते. ती केवळ प्रार्थना असून उपयोगी नाही, तर त्यात आर्त आळवणी, अढळ निष्ठा, दृढ भक्ती असायला हवी.

ग्रंथ परिचय

# 'संतांची हे भेटी'

–प्रा. सुहास जोशी
शिरूर, पुणे.

'संतांची हे भेटी' हे प्रा. डॉ. मु. श्री. कानडे यांनी लिहिलेले पुस्तक म्हणजे मराठी भाषेला मिळालेले एक सुंदर लेणेच आहे. श्री. कानडे यांनी संतसाहित्यावर विपुल व अभ्यासपूर्ण असे लेखन केलेले आहे. त्यातील विविधतापूर्ण असे पंधरा लेख या संग्रहात समाविष्ट आहेत. यातील संत नामदेव व समर्थ रामदास हे लेख जितके महत्त्वपूर्ण आहेत तितकेच ते उत्कृष्ट उतरले आहेत. प्रा. डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात त्याप्रमाणे डॉ. कानडे यांच्या सर्व लेखांत समन्वयाचे सूत्र दिसून येते. प्रचंड अभ्यास, सूक्ष्म निरीक्षणशक्ती हे त्यांचे वैशिष्ट्य होय! ह्या लेखांत संशोधनही आहे, पण पांडित्याचे आवरण नाही. त्यादृष्टीने सोपानदेवी, दासबोध व तुकारामांचा महिमा गाणारे श्री आत्मारामबुवा रामदासी हे तीन लेख अभ्यासावे.

अनेक वर्षांच्या आपल्या अभ्यासाचे सार या ग्रंथाच्या रूपाने डॉ. कानडे यांनी वाचकांच्या हाती दिले आहे. त्यात त्यांनी घेतलेले परिश्रम पदोपदी जाणवतात. त्यामागे केवळ त्यांचा दीर्घ अभ्यासच नाही तर संतवाङ्मयावरील त्यांची नितान्त निष्ठाही दिसून येते.

ज्ञानदेवांसंबंधी या संग्रहात पाच लेख आहेत. त्यावरून कळते की ज्ञानेश्वरीच्या सार्थ आवृत्त्या पुनः पुनः प्रकाशित होत आहेत. अर्वाचीन काळाचा विचार केला तरी ज्ञानेश्वरीइतकी लोकप्रियता आणि ती विकत घेऊन वाचण्याची प्रवृत्ती याबाबतीत अन्य कोणताही पद्य वा गद्य ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या आसपासही फिरकू शकणार नाही. तत्त्वज्ञानाची गहन चर्चा करणारा ग्रंथही किती अमृतमधुर होऊ शकतो, याचे 'ज्ञानेश्वरी' हे मूर्तिमंत प्रात्यक्षिक आहे. गीतार्थाने विश्व भरण्यासाठी, आनंदाने आवार मांडण्यासाठी आणि आर्त दुःखीजनांसाठी त्यांनी गीताटीका लिहिली. यासंबंधीचे डॉ. कानडे यांचे विवेचन संशोधनपूर्ण तथा वाचनीय झालेले आहे.

आपल्या अभंगातून विठ्ठल वा पंढरीनाथाचा महिमा गाणारे ज्ञानेश्वर, पण त्यांच्या ज्ञानेश्वरीत मात्र विठ्ठलाचा उल्लेख नाही. हा एक चमत्कारच आहे. त्याचे उत्तर देण्याचा उत्कृष्ट प्रयत्न डॉ. कानडे यांनी 'ज्ञानदेवांची शिवभक्ती' या लेखात केला आहे. जेव्हा ज्ञानेश्वरी लिहिली गेली तेव्हा ज्ञानेश्वर महाराज नाथसंप्रदायाच्या छायेतच अधिक होते, असे दिसते. ज्ञानदेवांच्या मनोभूमिकेत शिवाच्या प्रतिमेने शाश्वत असा ठसा उमटलेला होता. पुढचेही लेख अत्यंत वाचनीय आहेत. श्री ज्ञानदेव, श्री नामदेव यांच्या तीर्थयात्रेसंबंधी अत्यंत सखोल, साधार, सविस्तर चर्चा त्यांनी केलेली आहे. श्री सोपानदेवांनी लिहिलेल्या 'सोपानदेवी'संबंधी फार कमी चर्चा ऐकावयास मिळते. येथे ती विस्ताराने वाचावयास मिळाल्यामुळे वाचकांचे समाधान होईल. संत श्री नामदेवांचे कुटुंब व श्री संत चोखामेळा यांचे कौटुंबिक जीवन यांच्याविषयी विस्ताराने लिहिण्याची खूप आवश्यकता होती. हे दोन्ही लेख सुंदर वठले आहेत, मननीय झाले आहेत. चोखोबांच्या पत्नी संत सोयरा, पुत्र संत कर्ममेळा, चोखोबांची बहीण संत निर्मळा आणि चोखोबांचे मेहुणे संत बंका यांच्या अभंगांचा डॉ. कानडे यांनी घेतलेला मागोवा अत्यंत हृद्य असा उतरला आहे. चोखोबा व त्यांचे कुटुंबीय यांच्या जीवनात दुःख आहेच, पण तेच एक शल्य मनाशी न कवटाळता ज्ञानदेव-नामदेवांच्या नेतृत्त्वाखाली जी पारमार्थिक लोकशाही उदयाला आली तिचे हे सारेजण निष्ठावंत पाईक बनले आणि वारकरी संप्रदायाने प्रवर्तित केलेल्या प्रेम-स्वरूपिणी भक्तिमध्ये आनंदमग्न झाले.

'संत तुकाराम महाराजांचा महिमा गाणारे एक रामदासी काव्य' हा संशोधित लेख फारच उपयुक्त, समन्वय दृष्टीचा तथा वाचनीय आहे. महाराष्ट्र धर्म आणि भागवत धर्म यांतील गुरुसंस्था तसेच समर्थांची अभंगवाणी, श्री समर्थ रामदासांचे वाङ्मयीन कार्य हे लेख मुळातून वाचावेत.

'वारकरी आणि रामदासी' हा लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. दोहोंतील द्वैत नाहीसे करून दोहोंतील साम्य दाखवून उत्कृष्ट समन्वय साधला आहे. भीमस्वामी, महिपतीबुवा, हरिबुवा भोंडवे आदींनी दोन्ही संतांची चरित्रे वर्णून हा दुजाभाव नष्ट केला आहे. थोडक्यात, पूर्वी वारकरी व रामदासी ह्या संप्रदायांत कोणत्याही प्रकारचा परकेपणा नव्हता. म्हणूनच **'साधू दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले।'** ही समर्थोक्ती योग्य, बरोबर, अचूक आहे. 'संतसाहित्याची उपयुक्तता' या लेखात आजच्या विज्ञानयुगातही संतांचे साहित्य कसे मोलाचे आहे, ते उत्तमरीतीने पटवून दिले आहे. हा ग्रंथ वाचनीय, मननीय, चिंतनीय असाच झाला आहे.

पुस्तकाचे नाव : **संतांची हे भेटी** पृष्ठे : ३० मूल्य : ९५ रु.
प्रकाशक : **स्नेहवर्धन प्रकाशन, पाषाण रस्ता, पुणे – ४११ ००८.**

—चकोर आजगांवकर

# "आवो साईबाबा"

## म्हाळसापतीकडून बाबांचे स्वागत

मागील कथेत मी आपल्याला बाबांचा जन्म १८३५ मधील पाथरी येथील असे स्पष्ट केले. १८३५ ते १८५० पर्यंत ते गुरुगृही गुरुसेवा करीत होते. १८५१ मध्ये ते प्रथम निंबातळी प्रगटले. त्यानंतर पुन्हा त्यांनी पाच वर्षे देशाटन केले व १८५८ ते १९१८ ही साठ वर्षे त्यांनी शिरडीच्या भूमीत आपल्या चरित्रलीला दाखविल्या. या कथेत बाबांचे गांवकुसावरील खंडोबाच्या मंदिराच्या दारात पुनरागमन कसे घडले, हे मी सांगणार आहे. तत्पूर्वी काही अपूर्व पूर्ववृत्ताचा ओझरता उल्लेख करतो.

श्री साईबाबांच्या पाथरीमधील कुटुंबाचे आडनाव भुसारी असे होते व या घराण्याचा शुक्ल यर्जुर्वेदी देशस्थ ब्राह्मणात समावेश होतो. भुसारी कुटुंबाचे कुलदैवत हनुमान हे असून त्यांच्या घरामागील ओढ्यास 'लेंडी ओहोळ' असे नाव होते. पाथरी येथे बाबांच्या स्मरणार्थ पंचायत समितीने सभागृह बांधले असून भुसारी कुटुंबातील प्राध्यापक भुसारी हे काही काळापूर्वी हयात होते. सत्यसाईबाबांनी बाबांचे वडील गंगाभव व आई देवगिरअम्मा असून हे कुटुंब वैदिक समाजातील होते, असे प्रगट केले आहे. उत्तरेत बाबांना कबीरावतार मानतात, तर सत्यसाईबाबा त्यांना शिवाच्या आशीर्वादाने जन्मलेला शिवाचा अंशावतार समजतात. यातील तफावतीवर टीकाटिप्पणी करण्याची जरूर नाही. कारण बाबा ब्राह्मण असल्याचा व त्यांची सुंता झाली नव्हती व कान टोचलेले नव्हते, "हा ब्राह्मण सर्वांना शुभ्रमार्गाने नेईल", "ही मशीद ब्राह्मण-मशीद आहे", असे बाबांच्या चरित्रात इतर चरित्रकारांनी स्पष्ट नमूद केले आहे. पाथरी येथे मिळालेल्या एका शिळेवर माता अवंतिका व पिता गंगाधर असा उल्लेख असल्याचे मला बाबांचे एक नातेवाईक श्री. द. र. भुसारी यांनी काही वर्षांपूर्वी पत्राद्वारे कळविले होते. ह्या सर्व कथांमधून श्री बाबा कोण होते, याची स्पष्ट कल्पना आली नाही तरी एक दिशा मात्र प्रकाशित होते, एवढे ध्यानात ठेवले तरी खूप झाले. बाबांच्या गुरुबद्दल वा गुरुदीक्षेबद्दल मात्र अद्याप कोणीही फारसा प्रकाश पाडलेला नाही. "श्री बाबा अयोनिज होते. ते शिवावतार असल्याने त्यांना गुरुची जरूरी नव्हती", असे मात्र म्हणणे अयोग्य व संपूर्ण अंधश्रद्धेस उत्तेजन देणारे ठरेल. बाबा ईश्वरी अंश असले, तरी त्यांच्या सामर्थ्यशाली आत्म्याच्या देहरूपी वाहनाला मानवी मर्यादांची व देहसीमांची बंधने पाळावी लागली, यात शंका बाळगण्याचे कारण नाही. त्यामुळे त्यांच्या अफाट व अमर्याद आत्मिक शक्तिसामर्थ्याला मुळीच उणेपणा येत नाही.

स्वामीसमर्थांचे मंगळवेढा येथील १८३८-५० मधील लीलामय वास्तव्य व बाबांचे गुरुगृही (१८३९-५१) वास्तव्य समांतर आहे. बाबांचे १८५१ ते १८५८ पर्यंतचे देशाटन व स्वामींचे १८५० ते १८५६ पर्यंतचे मोहोळ येथील वास्तव्य दोघांच्या भेटीची शक्यता दर्शविते. एक मुस्लिमसदृश्य तरुण स्वामींची सेवा करीत असता निंबातळी स्वामींनी त्याला मस्तकी हात ठेवून साक्षात्कार दिला, ही समर्थ स्वामीचरित्रातील कथा व बाबांची गुरुस्थानी स्वामीपादुका स्थापण्यास संमती ही फार बोलकी व सूचक आहे. व्यंकुशाची गुरुदीक्षा आणि स्वामी सरकारांची (दत्तगुरु) कृपा यांमुळे बाबा घडले असतील काय?

बाबा १८५१ ते १८५८ पर्यंत अनेक प्रदेश व तीर्थे पावन करीत हिंडले. चांद पाटलाला ते औरंगाबादच्या जंगलात भेटले. त्यानंतर त्याच्या धूपखेड्याला यथावकाश भेट देऊन त्याच्या मेहुण्याच्या लग्नानिमित्त वरातीसमवेत शिरडीच्या गांवकुसावर गाडीतळाजवळ प्रगट झाले. तेथून ते हळूहळू खंडोबाच्या मंदिराच्या दिशेने चालत निघाले. त्या मंदिराजवळची निवांत जागा पाहून बाबांचे मन सुखावले. खंडोबाचे पुजारी म्हाळसापती सोनार यांची व बाबांची भेट खंडोबाच्या मंदिराच्या दारात झाली. त्या कबीरपंथी भटक्या साधूला पाहून म्हाळसापतींनी त्यांना 'साई' या नावाने हाक मारली. ती अजरामर हाक **"आवो, साईबाबा"** या शब्दात वज्रलेप झाली. नामरूपहीन प्रभूला श्री साईबाबा हे नाव व फकिराचे रूप नव्याने लाभले. म्हाळसापती व साईबाबा यांच्या या खंडोबाच्या द्वारातील अलौकिक भेटीच्या संदर्भात 'श्री साईगीतायन' गीतकाव्यात असे म्हटले आहे की आज पृथ्वीच्या क्षितिजावर अध्यात्मजागृतीचे नवे युग उगवलेले आहे व त्याची कोमल किरणे शिरडीच्या द्वारी प्रकाशशलाका उधळीत आहेत.

### शिरडीस साई आले!

(स्थळ: खंडोबाचे मंदिर काळ: १८५८ चा सुमार)

(शिरडीच्या गांवकुसावर चांदभाईच्या मेहुण्याच्या लग्नाची वरात बैलगाड्यांसह उतरली होती. तेथून एक तरुण साधू हळूहळू गावाच्या दिशेने पावले टाकीत खंडोबाच्या मंदिरापाशी येतो. म्हाळसापती दैनिक पूजा करीत आहेत. त्या तरुण साधूची

छाया मंदिरात मूर्तीवर पडते. म्हाळसापती वळून मागे पाहतात. अप्पा जागले व काशिराम देवळाच्या पायरीवर बसले आहेत. तो तेजस्वी तरुण साधू सुमारे २३ वर्षांचा आहे. तो हळूहळू पायऱ्या चढतो.)

**म्हाळसापती :** (मागे बघत) तरुण साधू महाराज इकडेच येत आहेत. हे कुणी उत्तरेतील कबीरपंथी साधू असावेत. (दरवाजाकडे येतात.) या साई या. "आवो साईबाबा!"

**बाबा :** अल्ला मालिक है! वा, काय सुंदर निवांत जागा आहे. गावच्या कटकटीपासून अगदी दूर. माझ्यासारख्या फकिराला रहावयाला ही जागा योग्य वाटते. (देवळाच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवतात.)

**म्हाळसापती :** थांबा साई! देवळात आत येऊ नका. हे हिंदूंचे प्रार्थनास्थळ आहे. येथे आत यावयास यवनांना परवानगी नाही.

**बाबा :** (थांबतात. पायरीवर स्थिरावतात.) शांत हो! खंडोबाच्या भगता, मी आत येणार नाही. भिण्याचे काही कारण नाही. मी मूर्ती फोडणारा यवन नाही. ही जागा शांत निवांत असली तरी मी येथे रहाणार नाही. गावातील त्या पडक्या मशिदीत मी वास्तव्य करावयाचे ठरविले आहे. माझ्यासारख्या फकिराला ती अधिक चांगली जागा होईल. अरे भगता, अल्लामिया केवळ येथे नाही, तो त्या मशिदीतही आहे.

**म्हाळसापती :** साईबाबा, मी चुकलो. मला आपल्याबद्दल भयशंका वाटली, हे खरं आहे.

**बाबा :** भगता, देव सर्वत्र आहे. तो केवळ मशिदीत नाही की मंदिरात नाही. तो एकच अल्ला मालिक सगळीकडे रहातो. त्याला राम म्हणा अगर रहीम म्हणा, खंडोबा म्हणा वा अल्ला म्हणा. सारे विश्व त्याचेच राऊळ आहे. माझ्या फकिराच्या स्पर्शाने परमेश्वर बाटणार नाही. ज्या पतितपावनाच्या स्पर्शाने सारे जग पवित्र होते, तो देव कधीही विटाळणार नाही.

**म्हाळसापती :** बाबा, मी अडाणी पुजारी आहे. मला सत्य असत्य काही समजत नाही. मी चुकलो. क्षमा करा.

**बाबा :** हे अज्ञानी भगता, मी माझ्या पूर्वजन्मीही जगाला ओरडून सांगितले आहे की तो परवरदिगार अल्ला ना कैलासात राहतो ना की काबा येथे! तो साऱ्या विश्वात वसतो. तो प्रेमळ आणि आर्त भक्ताच्या हृदयात कायमचा वस्ती करतो बरे! ही शिकवण पूर्वी मी शब्दांतून, गीतांतून दिली. आता या शिरडीतून मी माझ्या कृतीतून व चरित्रलीलातून हाच दिव्य संदेश जगाला सांगणार आहे. यासाठी या भगवंताच्या राऊळात मी पाय ठेवला आहे. मी प्रथम निंबातळी श्री गुरुमाऊलीला वंदन करून मग त्या पडक्या मशिदीकडे वळणार आहे. ती माझ्या अल्लामियाची द्वारकापुरी आहे. (म्हाळसापती नमस्कार करतात.)

(श्री बाबा काशिराम व अप्पा जागले यांच्यासमवेत गावाच्या दिशेने जातात.)

**मार्तंड मंदिराच्या। दारात ब्रह्म आले।**
**सौभाग्यरूप ल्याले। शिरडीस साई आले॥**
**श्रीचरण दिव्यतेचे। विश्वाकडे वळाले।**
**अध्यात्मजागृतीचे। सामर्थ्य सिद्ध झाले॥**
**सौभाग्य दारी आले। शतजन्म सफल झाले।**
**शिरडीस साई आले। शिरडीस साई आले॥**

– श्री साईगीतायन

## ही शिरडी द्वारावती द्वारका हरीची
## दिव्य पुरी कांचनमय श्यामसुंदराची

**– श्री साईगीतायन**

बाबांच्या मागील जीवनकथेत मी बाबांच्या १८५१ ते १८५८ या काळातील भ्रमंतीचा व १८५८ मध्ये शिरडी येथे कायम स्वरूपात स्थिर होण्याचा परामर्ष घेतला. १८५८ ते १८७० या एक तपाच्या काळात शिरडीकरांनी बाबांना सामान्यांच्या डोळ्यांनीच पाहिले. या खेडूत जनतेत अद्याप जसा विद्वान अधिकारी मंडळींचा समावेश नव्हता, त्याचप्रमाणे आध्यात्मिकदृष्ट्या त्यांना जाणू शकणाऱ्या थोर महात्म्यांचाही अंतर्भाव नव्हता. त्यांना १८७० मध्ये स्वामीसमर्थांचे एक शिष्य, कवी, साधक व योगी श्री आनंदनाथ महाराज यांनी पाहिले. या आनंदनाथांनी कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्वामीसमर्थांचे मठ स्थापन केले आहेत.

आनंदनाथांना बाबांची माहिती अक्कलकोटातील स्वामींच्या परिवारातील सेवक मंडळींकडून मिळाली असावी. त्यांनी बाबांना पाहून ते परमेश्वराचे अंश असल्याचे व ते शिरडीच्या उकिरड्यावर पडलेला हिरा असल्याचे मूल्यमापन केले. एका सत्पुरुषाने दुसऱ्याची पारख करण्याचा हा मोठा सुयोगच म्हणावा लागेल.

अवतार मेहरबाबा हे पारशी संत बाबांचे शिष्य उपासनी महाराज व प्रत्यक्ष बाबा यांच्या सहवासात आलेले होते. मेहरबाबांनी कथन केल्याप्रमाणे पहाता, बाबा १८५१ नंतर अजंठा-वेरूळच्या पर्वतराजीत तपश्चर्या करण्यासाठी गिरिकंदरात वसत होते. ते खुल्दाबाद येथे सुफी संत (झर-झरी) झरबक्ष यांच्या समाधीजवळ राहिले होते. हे संत बाबांच्या एका जन्मात त्यांचे गुरु होते. त्यानंतर दौलताबादेस एकनाथांचे गुरु जनार्दन स्वामी यांच्या समाधीपाशी बाबा राहिले. त्यानंतर धुंद आत्मानंदाच्या देहातीत अवस्थेत ते अक्कलकोटकर स्वामीसमर्थ यांच्या मोहोळच्या वास्तव्यकाळात (१८५१-१८५६) काही काळ त्यांच्याजवळ

राहिले. स्वामीसमर्थांनी कृपादृष्टीने व कृपास्पर्शाने त्यांना देहभानास आणले व सहजसमाधीस्थितीत स्थिर के. . तेथून ते पुन्हा देशाटनास दोन वर्षे (१८५६-१८५८) गेले. याच काळात १८५७ चे बंड उद्भवले, वाढले आणि शमले. या २१-२३ वर्षाच्या युवकाची सत्तावनच्या क्रांतिकारकांशी गाठ पडली असावी. पण त्याची निश्चित माहिती उपलब्ध नाही. हा भाग अत्यंत रहस्यमय असावा. इतिहास याचा उलगडा करीपर्यंत आपल्याला त्याची वाटच पहावी लागेल!

आनंदनाथांनी स्वामीसमर्थांची कृपा आपल्या तपस्येच्या, भक्तीच्या व काव्यप्रतिभेच्या बळावर मिळविली. आनंदनाथांनी शिरडी येथे प्रत्यक्ष येऊन गुरुस्थानाजवळील झेंडू-गुलाबाच्या बागेस कच्च्या घड्याने पाणी घालणाऱ्या बाबांना पाहिले. याच ठायी बाबांनी १९१२ मध्ये स्वामीपादुका स्थापन करावयास स्वामीभक्तांना अनुज्ञाही दिली. या गुरुस्थानामागे पूर्वी बाबा निंबदुंगांच्या बेटात असलेल्या एका धुळीच्या खड्ड्यात झोपत. हीच जागा नंतर बाबांनी स्वत:च्या समाधीसाठी निश्चित केली.

साईबाबा गुरुपरंपरा मानीत आणि दत्त व नाथ संतांना गुरुस्थानी मानीत. महाराष्ट्र तर दत्तपंथीय व नाथपंथीय संतांचे मोहोळच आहे! बाबांच्या नाथ व दत्तपंथी गुरुंची तेजस्वी व उज्ज्वल परंपरा अत्यंत दिव्य आहे.

श्री साईबाबा व स्वामी हे शुद्ध अध्यात्मवादी, धन-मान-सत्तानिरपेक्ष, विरक्त, श्रेष्ठ संतशिरोमणी होते. त्यांनी उच्चपदस्थांना, सत्ता-धन-लौकिक-केंद्रांना आपल्या विरक्त जीवनापासून शतयोजने दूर ठेविले. दंभ, मद, अनीतीचा मुखभंग करावयास मागे-पुढे पाहिले नाही.

**स्वामी आनंदनाथ आणि साईबाबांची भेट**

(स्थळ: गुरुस्थानाजवळचा परिसर वर्ष: १८७०)

(स्वामीसमर्थ, अक्कलकोट यांचे शिष्य श्री आनंदनाथ महाराज हे एकदा सावरगाव येथे आले असताना त्यांना शिरडी येथे आणण्यासाठी तेथील गावकरी दगडू गायके, नंदराम, भागचंद मारवाडी व शामा हे सावरगावला गेले. ही सारी मंडळी आनंदनाथांना घेऊन बैलगाडीने शिरडी येथे आली. तेव्हा आनंदनाथ हे गुरुस्थानाजवळ कच्च्या मडक्यातून झेंडू-गुलाबाच्या बागेला पाणी घालणाऱ्या श्री साईबाबांना पाहून गुरुस्थानाजवळ उतरले. ह्या दोन संतांची समोरासमोर दृष्टभेट झाली. नंतर गुरुस्थानाजवळ सर्व मंडळी जमा होऊन चर्चा करू लागली.)

**शामा :** महाराज, आपल्या पवित्र पावलांचा स्पर्श आमच्या शिरडी गावाला आज झाला. आम्ही धन्य झालो! संताच्या मंगल चरणाचा असा योग केवळ भाग्यानेच येत असतो.

**दगडू गायके:** होय, नाथजी, "साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा।" असे तुकोबांनीच म्हटले आहे.

**आनंदनाथ :** माधवराव, तुमच्या शिरडी गावाला आता माझ्या आशीर्वादाची आवश्यकता नाही. त्या तरुण साधूने आपल्या वास्तव्याने ही भूमी पावन केली आहे. खरं तर मी अक्कलकोटात स्वामींकडून मिळालेल्या सूचनेवरूनच येथे पाऊल ठेवले आणि दर्शनाने पावन झालो!

**शामा :** महाराज, तुम्ही आमच्या तरुण बाबांबद्दल बोलता ना! त्यांचा आम्ही आदर करतोच. पण प्रत्यक्ष दत्तावतारी स्वामींच्या परिवारातले आपण! म्हणूनच आपली पावले आम्हाला त्या समर्थांची पावलेच वाटतात! (नंदराम आणि भागचंद माना डोलावतात.)

**आनंदनाथ :** साईबाबांबद्दल इतकी सामान्य भूमिका घेऊ नका. साई ही स्वामीसमर्थांची चालती-बोलती छबी आहे. त्यांच्या शिरडीतील वास्तव्यामुळे या गावाला नवे चैतन्य आणि वैभव मिळेल!

**दगडू, शामा :** महाराज, आम्हाला या तरुण फकिराची नीट ओळख झालेली नाही. तो हिंदू की मुसलमान, वेडा की शहाणा, संत की पीर, हे काही ध्यानात येत नाही.

**आनंदनाथ :** शिरडीच्या गावकऱ्यांनो, तो फकीर म्हणजे उकिरड्यावरील एक अनमोल हिरा आहे. तो केवळ साधू वा संत नाही. तो सिद्धांचा, साधूंचा मुकुटमणी आहे. माधवराव, प्रत्यक्ष भगवंताचा एक महान् अंश शिरडीच्या क्षितिजावर अवतरला आहे!

**शामा :** नाथमहाराज, इथले लोक अज्ञानी आहेत. बाबांना ते वेडा फकीर मानून त्यांची चेष्टा करतात.

**आनंदनाथ :** हा तरुण सिद्धपुरुष म्हणजे कुणी वेडा वा भिकारी नाही. या गावाचेच नव्हे, तर या देशाचे आणि या जगाचे परिवर्तन घडविणारा तो परिसमणी आहे. तो भक्तांच्या पिढ्यांचा उद्धार करील! त्याच्या दर्शनाने माझे मन आणि बुद्धी शुद्ध झाली. हा योग मला स्वामीसमर्थांच्या कृपेनेच घडला आहे.

**शामा व इतर :** तर मग नाथमहाराज, आपला आम्हा शिरडीकरांना कोणता आदेश आहे?

**आनंदनाथ :** स्वत: स्वामींनीच मला आपण स्वत: शिरडीला वास्तव्याला येऊ, असे गुह्य प्रगट केले आहे. स्वामींचे अस्तित्व या महात्म्याच्या मागे-पुढे राहील. स्वामींची शक्ती या परम पवित्र देहातून कार्य करील. काही वर्षांनंतर आम्ही स्वामींना या महात्म्याच्या रूपातच पाहू व त्यांच्या चरणी लीन होऊ. तुम्ही साईबाबांची नित्य सेवा करा. (सर्व जातात).

(पृष्ठ क्र. ४९ वर)

# तर्खड कुटुंब

–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)

श्री साईसच्चरिताच्या ९व्या अध्यायात तर्खड कुटुंबाचा उल्लेख आहे ; तो थोडक्यात असा :

"भक्तश्रेष्ठ रामचंद्र नाम। वडील जयांचे आत्माराम।
तर्खड जयांसी उपनाम। विश्रामधाम साई जयां ।।७०।।
साईप्रेमें उचंबळून। तर्खड जैं जात ओथंबून।
करूं लागती अनुभवकथन।
काय तें श्रवण सुखकारक ।।७२।।
काय तयांचें भक्तिविभव। पदोपदीं साईंचे अनुभव।
एकामागूनि एक अभिनव।
सरसाविर्भाव जैं कथिती ।।७३।।
तर्खड मोठे पुण्यवान। पुत्रही पोटीं भक्तिमान।
साईंस नैवेद्य समर्पिल्यावीण।
करीना अन्नग्रहण तो ।।७५।।
माताही साईंची परम भक्त।
शिरडीस जाऊं झाली उत्सुक।"

तर्खड (बाबासाहेब) स्वत: प्रार्थनासमाजिष्ट होते व त्यांचा मूर्तिपूजेत किंवा साधुसंतांच्या दर्शनात मुळीच विश्वास नव्हता. तर्खड कुटुंब मूळचेच गर्भश्रीमंत. चिमाजीअप्पा पेशव्यांच्या वसईवरील मोहिमेत या कुटुंबाने अत्यंत शौर्य गाजविल्याने वसईजवळील तर्खड गावाची जहागिरी त्यांना बक्षिस मिळालेली. १९व्या शतकाच्या शेवटी बाबासाहेबांचे वडील आत्माराम व काका राघोबा हे मुंबईला येऊन स्थायिक झाले. या कुटुंबाकडे त्याकाळी प्रत्येकी दोन दोन मोठ्या (Studebaker) मोटारगाड्या असावयाच्या आणि इंग्रज गव्हर्नरांकडे उठणे-बसणे असावयाचे. बाबासाहेब स्वत: प्रसिद्ध खटाव मिल समूहाचे सेक्रेटरी होते व त्यांचा पगारही हजारोंनी होता. साहजिकच सनातनी हिंदूधर्मातील पूजाअर्चा, साधुसंतांची दर्शने, तीर्थयात्रेला जाणे वगैरे गोष्टी त्यांना पटत नव्हत्या. परंतु हेच बाबासाहेब पुढे साईबाबांचे एकनिष्ठ भक्त बनले. एवढेच काय साईबाबांच्या निर्वाणानंतर शिरडी संस्थानच्या स्थापनेत व त्याच्या व्यवस्थित कारभारात त्यांनी मोठा वाटा उचलला. त्यांच्यात हा जो बदल झाला तो त्यांची पत्नी सौ. तर्खड व सर्वात धाकटा मुलगा चि. ज्योतिंद्र यांच्यामुळे.

सौ. तर्खड यांना कित्येक वर्षापासून सतत डोके दुखण्याचा (अर्धशिशीचा) आजार होता. तर्खड कुटुंबातच बरेच डॉक्टर होते. सर्वांकडून उपाय झाले, परंतु गुण काही येईना. मग कोणीतरी त्यांना बांद्रे येथील प्रसिद्ध मुसलमान संत पीर मौलाना (पहा श्री साईसच्चरित, अ. २१, ओ. ७) यांजकडे जाण्यास सुचविले. सौ. तर्खड आपला सर्वात धाकटा मुलगा ज्योतिंद्र याला घेऊन मौलानाकडे गेल्या व आपली व्यथा त्यांना सांगितली. त्यावर मौलाना साब म्हणाले, "बाई! तुझ्या दुखण्याला माझ्याकडे औषध नाही. अहमदनगर जिल्ह्यात शिरडी येथे माझा भाऊ राहतो. तो तुझे दुखणे बरे करील." हे ऐकून बाईंनी व मुलाने शिरडीला जाण्याचे ठरविले व योग्य वेळी शिरडी येथे साईबाबांकडे जाऊन पोहोचले. बाबांच्या दर्शनाला मशिदीत जाताच बाबा म्हणाले, "आये! आलीस, ये" आणि ज्योतिंद्रांकडे बोट दाखवून आणखी म्हणाले, "तू माझी आई म्हणजे हा माझा भाऊ." नंतर बाईंनी बाबांच्या पायांवर नमस्कार करण्यासाठी मस्तक ठेवल्यावर बाबांनी जवळच्या पात्रातून उदी घेतली व बाईंच्या मस्तकावर थापीत म्हणाले, "आये! तुझे डोस्के लई दुखते ना? आता पुन्हा नाही दुखणार" आणि खरोखरीच त्या क्षणापासून बाईंचे डोक्याचे दुखणे थांबले ते कायमचेच. असो. या चमत्कारामुळे सौ. तर्खड यांची बाबांच्या चरणी अनन्य भक्ती जडलीच, परंतु लहानग्या ज्योतिंद्रांचे तर आयुष्यच बदलून गेले. प्रापंचिक गोष्टींपेक्षा पारमार्थिक गोष्टींकडे तो वळला तो कायमचाच.

यानंतर एकदा सौ. तर्खड यांनी एका भुकेल्या कुत्र्याला चतकुर भाकर खाऊ घातल्यावरून प्रसन्न होऊन साईबाबांनी त्यांना केलेला उपदेश :

"कधीं मी श्वान कधीं सूकर।
कधीं मी गाई कधीं मांजर।
कधीं मुंगी माशी जलचर।
ऐसिया विचरत रूपें मी ।।१२९।।
पाही भूतमात्रीं जो मज।
तोचि माझिया प्रीतीचा समज।
तरी तूं भेदबुद्धीतें त्यज।
ऐसीच भज मजलागीं" ।।१३०।।

आणि पुरंदरे कुटुंबाबरोबर बाबांसाठी भरीत करून व काचऱ्या तळून खाऊ घालण्यासाठी पाठविलेल्या वृत्ताकफळांची (वांग्यांची) कथा व त्यावरून बाईंच्या प्रेमरसाची आणि समर्थ साईंच्या भक्तैक्यतेची निजखूण आणि बाईंनी एक उच्छिष्ट शिलकी पेढा आणि तोही एका सुतकी मुलाबरोबर पाठविला असूनही बाबांनी स्वत: होऊन तो मागून घेतला आणि **"हातीं पडतांच मुखीं समर्पिला। भाव संतर्पिला आईचा।।"** हे सर्व श्री साईसच्चरिताच्या ९व्या अध्यायात आपण वाचलेच आहे. तसेच बांद्र्याला आपल्या छबीला नैवेद्य दाखविण्याचे बाबासाहेब विसरल्याचे त्यांच्या पत्नीला व मुलाला शिरडी येथे जाणवून साईबाबांनी आपले **"भूत-भविष्य-वर्तमान देशकालाद्यनवच्छिन्न त्रिकालज्ञान"** दर्शवून सर्वांनाच चकित केल्याचेही आपण वाचले आहे. परंतु त्याशिवाय सौ. तर्खड

यांचे व विशेषेकरून ज्योतिंद्रांचे बरेच अनुभव आहेत. त्यातले काही साईकृपेने बाबासाहेबांचे नातू म्हणजे ज्योतिंद्रांचे चिरंजीव श्री. विरेन्द्र यांजकडून मला नुकतेच ऐकावयास मिळाले, ते वाचकांना मनोरंजक व बोधप्रद वाटतील म्हणून खाली देत आहे.

सौ. तर्खड यांची पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेण्याची फार इच्छा होती. त्याकाळी मराठी माणसाला एकदा तरी पंढरपूरला जाऊन विठोबाच्या चरणी मस्तक ठेवल्याशिवाय जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटत नसे. बाईंनी बाबांना पंढरपूरला जाण्याची आपली इच्छा सांगितली आणि म्हणाल्या, "बाबा! आपण परवानगी दिली तरच मी जाईन, नाहीतर आपल्या पायीच माझे पंढरपूर." त्यावर बाबांनी परवानगी दिली आणि म्हणाले, "आये! जा आणि तुझ्या मनाप्रमाणे दर्शन, पूजा करून ये." बरोबर ज्योतिंद्र होताच. त्याला बरोबर घेऊन बाई पंढरपूरास गेल्या. विठोबाचे मनसोक्त दर्शन घेतले व पूजा करू लागल्या. पूजा-अर्चनेच्या बाबतीत बाईंना कोणाची मदत घेणे आवडत नसे. कितीही कष्ट पडले तरी सर्व गोष्टी स्वतःच करण्याची त्यांची सवय होती. पूजा करताना विठोबाच्या मूर्तीला हार घालण्याची वेळ आली. पण बाई पडल्या ठेंगण्या. त्यांचे हात काही वर पोहोचेनात. जवळ बडवा (पुजारी) होता. तो म्हणाला, "आणा माझ्याकडे. मी तो घालतो."पण बाई काही तो देईनात. बडवाही त्यांना वर चढून हार घालण्याची परवानगी देईना. मग बाईंनी ज्योतिंद्राला विचारले, "आता रे काय करायचे? साईबाबांनी तर दर्शन, पूजा मनाप्रमाणे होईल म्हटले होते!" त्यावर ज्योतिंद्र म्हणाला, "तुझा स्वतःच हार घालण्याचा आग्रह असेल तर तूच विठ्ठलाला आळव. तुझी पूजा घ्यावयाची इच्छा असेल तर तोच काही मार्ग काढील." त्यावर मग बाईंने अनन्यभावे विठ्ठलाची प्रार्थना चालविली आणि काय आश्चर्य! विठोबाची ती दगडाची मूर्ती हळूहळू खाली सरकली आणि बाईंनी लगेच गंध लावून विठोबाच्या गळ्यात हार घातला. मग मायलेकांनी सद्गदित होऊन साष्टांग नमस्कार घातला. इकडे विठोबाची मूर्ती खाली सरकताना पाहून त्या बडव्याचे डोळेच विस्फारले आणि चक्कर येऊन तो खाली पडला. नंतर सावध झाल्यावर त्याने या मायलेकांच्या पायांवर डोके ठेवले आणि म्हणाला, "इतकी वर्षे आम्ही पूजा करीत आहोत, पण या मूर्तीला आम्ही दगडच समजत होतो. आज मात्र आमचे डोळे उघडले. खरोखरीच आम्हाला तुम्हीच विठ्ठल-रखुमाई आहात. आता तुम्ही येथेच आमच्याजवळ राहा." परंतु सौ. तर्खड यांनी व ज्योतिंद्राने त्याला आपण साधी, सामान्य माणसे असल्याचे सांगून तेथून ते परतले. शिरडीला गेल्यावर बाबांनी विचारले, "आये! दर्शन व पूजा नीट झाली ना?" त्यावर बाई म्हणाल्या, "तुमची कृपा असल्यावर का नाही होणार! आता तुम्हीच माझे विठ्ठल आणि शिरडीच माझे पंढरपूर."

साईसमर्थांच्या कृपेने ह. भ. प. दासगणू संतांची आख्याने स्वतः रचून काही बिदागी न घेता कीर्तने करीत असत, हे आपणास ठाऊकच आहे. एकदा शिरडीजवळच एका खेडवळ वस्तीत कीर्तन करायला जाण्यासाठी साईबाबांची आज्ञा घेण्यासाठी ते मशिदीत आले. बाबा त्यांना म्हणाले, "आईला व भाऊला बरोबर घेऊन जा." त्याप्रमाणे त्या दोघांना बरोबर घेऊन दासगणूंनी त्या वस्तीत जाऊन कीर्तनाला सुरुवात केली. कीर्तन चालले असताना काही आदिवासी लोक तिकडून एका मेलेल्या माणसाचा देह स्मशानाकडे घेऊन चालले होते. त्यांना काय वाटले कुणास ठाऊक. ते लोक कीर्तनाच्या जागी थांबले. त्या मृत माणसाची ताटी समोर ठेवली आणि दासगणूंना म्हणाले, "तुम्ही संतांचे एवढे सामर्थ्य कौतुकाने सांगता, तर तुमच्या संतांना सांगा की आमचा मेलेला माणूस जिवंत करून दाखवा. नाहीतर ही तुमची बडबड बंद करा आणि मुकाट्याने येथून चालते व्हा." दासगणूंनी हे ऐकले आणि त्यांचे धाबेच दणाणले. ज्योतिंद्रांकडे वळून ते म्हणाले, "रावसाहेब! आता हो काय करायचे?" मग दोघांनीही ठरविले की कीर्तन चालूच ठेवायचे, बाबा काय ते पाहून घेतील. त्याप्रमाणे कीर्तन चालू केले आणि साईनामाचा गजरही सुरू केला. कीर्तन फारच रंगले व श्रोतेही तन्मयतेने ऐकू लागले. मग मोठा चमत्कार घडला. ताटीवरचा तो माणूस हलू लागला. त्याने हिसडे देऊन ताटीच्या दोऱ्या तोडल्या व तो ताटीवर उठून बसून कीर्तन ऐकू लागला आणि साईनामाच्या गजरात हातांनी ताल धरून तो सामीलही झाला. हे पाहून सर्व मंडळी आश्चर्याने थक्कच झाली आणि सर्वांनी साईबाबांचा मोठ्याने जयजयकार केला. अशाप्रकारे दासगणूंची अब्रू बाबांनी राखली, एवढेच नव्हे तर त्यांना व त्यांच्याबरोबर गेलेल्या सर्वांना मोठ्या संकटातून वाचविले. आदिवासीच ते! चिडले असते तर या मंडळींना भरपूर चोप देण्यास किंवा प्रसंगी ठार मारण्यासही ते चुकले नसते.

एकदा साईबाबा ज्योतिंद्राला घेऊन उजाड जागी गेले. तेथे थोडी माती उकरून लहानसा खड्डा केला व ज्योतिंद्राला त्यात काय दिसते ते पहावयास सांगितले. ज्योतिंद्राने वाकून पाहिले तर त्यात चकचकीत सोनेच सोने. बाबा म्हणाले, "हे तू घे." त्यावर ज्योतिंद्र म्हणाला, "मला ते नको." बाबा म्हणाले, "अरे, मी तुला देतो ना?" ज्योतिंद्र म्हणाला, "मी त्यासाठी शिरडीला येत नाही. ते विष आहे." त्यावर बाबा पुन्हा म्हणाले, "आलेल्या लक्ष्मीला लाथाडू नये. ती रागावते व पुन्हा कधी ती येत नाही." ज्योतिंद्र म्हणाला, "चालेल. पण मला हे विष नको." त्यानंतर बाबांनी तो खड्डा पुन्हा बुजवून टाकला आणि ज्योतिंद्रांसह ते मशिदीत परत आले.

वरील गोष्ट एका गावकऱ्याने पाहिली होती. त्याच्या लक्षात आले की बाबा त्या खड्ड्यातील काही मौल्यवान वस्तु ज्योतिंद्राला देऊ करीत होते. अंधार झाल्यावर रात्री तो कुदळ घेऊन त्या जागी गुपचूप गेला व खड्डा पुन्हा उकरून त्यात हात घालून पाहू लागला, तो काय आश्चर्य! त्याला विंचवानेच

डंख मारला व ओरडतच कुदळ टाकून तेथून तो पळाला. रात्री विष अंगात फारच भिनले म्हणून सकाळी तो बाबांकडे रडत ओरडत आला आणि पाया पडून काकुळतीने विष उतरविण्याची विनंती करू लागला. बाबांनी डंखिलेल्या जागी उदी लावताच त्याचा दाह थांबला. मग त्याने रात्री घडलेली गोष्ट सांगितली. तेव्हा बाबा म्हणाले, "अरे वेड्या! लक्ष्मी ज्याच्या नशिबात असते त्यालाच मिळत असते." असो.

साईबाबांच्या हयातीत ज्योतिंद्रांचे शिरडीला सारखे येणेजाणे असावयाचे. श्री साईसच्चरितात वर्णिलेले दोन प्रसंग त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहेत व त्याबद्दलचे त्यांचे अनुभव ऐकण्यासारखे आहेत. अकराव्या अध्यायात शिरडीत वावटळ उठून मेघांचा गडगडाट व विद्युल्लतांचा कडकडाट होऊन मुसळधार पाऊस पडला व गावकऱ्यांवर भयंकर प्रसंग गुजरला तेव्हा ज्योतिंद्र तेथे हजर होते. त्यावेळी गावकऱ्यांच्या व गुराढोरांच्या रक्षणासाठी बाबांनी मशिदीच्या धारेवर उभे राहून मेघाला उद्देशून पाऊस आवरण्यासाठी मारलेल्या आरोळ्या त्यांनी ऐकल्या होत्या. ते म्हणतात, "मेघांच्या गर्जनांपेक्षा व विजेच्या कडकडाटांपेक्षा बाबांच्या आरोळ्या महा उदंड होत्या. जणूकाय दोन महान् शक्तींची झुंजच. शेवटी बाबांच्या शक्तीचा जय झाला आणि **'झाले वर्षावा आकर्षण। वायूही आवरला तत्क्षण॥'**

दुसरा प्रसंग अध्याय ३१ मधील वाघाचा. ज्योतिंद्र म्हणतात, बाबांनी नंतर एकदा त्यांना विचारले होते, "अरे भाऊ! तो वाघ माझ्याकडे पाहून माझ्याजवळ काय मागत होता हे तुला ठाऊक आहे का?" त्यावर ज्योतिंद्र म्हणाले, "मला काय ठाऊक? तुम्ही दोघे एकमेकांकडे बऱ्याच वेळ बघत होता हे मी पाहिले. परंतु तुमच्यात काय संवाद झाला हे मला कसे कळणार?" त्यावर बाबा म्हणाले, "तो वाघ माझ्याजवळ मुक्ती मागत होता व मी त्याला ती लगेच देऊन टाकली." असो. यावरून हेमाडपंतांनी पुढे केलेले वाघाचे वर्णन अगदी यथार्थच वाटते :

**"पाहूं जातां पूर्वविधान। कोणी तरी हा पुण्यवान।**
**मिरवूं जातां विद्याभिमान।**
**पावला अवमान हरिभक्त॥१५२॥**
**तयाचिया शापापासुनी। पावला ही क्रूर योनी।**
**उःशापयोगें लागला चरणीं।**
**अभिनव करणी भक्तांची॥१५३॥**
**वाटे जाहला त्या उःशाप। साईदर्शनें जळलें पाप।**
**तुटले बंध सरले ताप।**
**झाला आपाप उद्धार"॥१५४॥**

इ.स. १९१७ अखेर किंवा १९१८च्या सुरुवातीची गोष्ट असेल. अवतीभोवती बसलेल्या भक्तांना बाबा विचारीत होते की कोणाला काय पाहिजे. कोणी मुलगा मागितला, कोणी धन मागितले तर कोणी रोगापासून निवृत्ती मागितली. ज्योतिंद्रांनी म्हटले, "मला काही नको." बाबा म्हणाले, "अरे भाऊ! ही आपली अखेरची भेट आहे. मागशील ते तुला देतो. माग, माग!" पण ज्योतिंद्रांनी काहीच नको म्हटले. नंतर बाबांनी खूपच आग्रह धरला तेव्हा ते म्हणाले, "बाबा, मी मागतो, पण मग मात्र तुम्ही नाही म्हणू नका. तुम्हाला ते द्यावेच लागेल." बाबा 'बरं' म्हणाले तेव्हा ज्योतिंद्र म्हणाले, "बाबा! पुढचा जन्म मला कोठेही व कोणत्याही योनीत द्या, पण तेथे मला तुमचे पुन्हा दर्शन घडले पाहिजे." मग मात्र बाबाच थबकले व म्हणाले, "ते शक्य नाही. तू मला आणखी जन्मासाठी बांधून घेतोस." त्यावर ज्योतिंद्र म्हणाले, "मग तुम्ही मला कबूल का केलेत? आता ते तुम्ही द्यायलाच हवे." शेवटी बाबांनी उत्तर दिले, "भाऊ, जा तुझी इच्छा पुरी होईल. पुढील जन्मी आपण एका ताटात जेवू."

वरील बाबांच्या पुन्हा जन्म घेण्याच्या आश्वासनाबद्दल आपण शंका घेण्याचे कारण नाही. श्री साईसच्चरितासाठी लिहिलेल्या उपोद्घातात कै. काकासाहेब दीक्षित यांनी बाबांनी त्यांना **"आता आपण जाऊ ते आठ वर्षांचे होऊन येऊ"** असे म्हटल्याचे नमूद केले आहे. तसेच अ. ४३ मध्ये हेमाडपंतही म्हणतात, **"ऐसें बांधुनी प्रेमफांसा। बाटती महाराज गेले प्रवासा। येतील मागुतेनी हा पूर्ण भरंवसा। भक्तमानसा झालासे"॥१४४॥** असो.

ज्योतिंद्रांनी पुढे लग्न केले व त्यांना बरीच संततीही झाली. त्यांनी प्रपंच केला, पण अध्यात्मातच त्यांचे विशेष लक्ष राहिले. साईबाबा म्हणजे त्यांचे सर्वकाही दैवत होते. शेवटी १९६५ साली श्रावण महिन्यातील सोमवारी ते साईचरणी विलीन झाले. धन्य त्यांची भक्ती व धन्य त्यांचे भाग्य!

---

(पृष्ठ क्र. ४६ वरून)

(आनंदनाथासारख्या मुक्तपुरुषाने बाबांसारख्या अवतारी पुरुषाचे दर्शन घेऊन त्यांचे माहात्म्य सांगण्याचा हा प्रथमच योग घडला. त्यानंतर बीडकर महाराज (१८७३) व गंगागीर (१८७५) यांनीही बाबांचे दर्शन घेतले. या प्रसंगातून बाबांची व स्वामीसमर्थांची १८५१ ते ५८ या भ्रमंतीच्या काळातील भेट व कृपामीलन स्पष्टपणे सुचविले जाते. बहुधा स्वामी मंगळवेढ्याहून मोहोळ येथे गेल्यानंतर हा भेटीचा योग आला असावा. स्वामीचरित्रकारांनी मात्र मंगळवेढ्याचाच नामनिर्देश केला आहे.)

**"जे शरयूच्या तटीं उमटले**
**कालिंदीच्या कुशीत रमले**
**वनवासी प्रासादी भ्रमले**
**दिव्य चरण ते पुनरपि करिती शिरडीतून पुकार"**

**–श्री साईगीतायन**

---

## श्री साईंची चित्रकथा

श्री साईबाबा शिरडीत प्रथम निंबातळी ध्यानस्थ अवस्थेत दिसले. त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज विलसत होते. त्यांना पहिल्यांदा पाहिले ते नाना चोपदार यांच्या आईने. त्यानंतर......




गावकऱ्यांमध्ये कुजबुज सुरु झाली. तर्क-वितर्क केले जाऊ लागले. कुतुहलाने कुणी विचारु लागले..... कोण बरे हा तरुण असावा ? कुणालाच काही थांगपत्ता लागे ना!



एकदा काय झाले! खंडोबाचे वारे एका गावकऱ्याच्या अंगात आले. त्याच्याकडे गावकऱ्यांनी त्या तरुणाविषयी चौकशी केली.



तेव्हा खंडोबाचे वारे धावतच नीम वृक्षाजवळ आले व तेथे त्याने जमीन खोदायला सांगितले. जमीन खोदताच पाहतात तो काय! तेथे एक गुंफा आढळून आली. आणि त्या गुंफेत दीप प्रज्वलित असलेले दिसले. वाऱ्याने सांगितले, "या ठिकाणी त्या तरुणाने सतत बारा वर्षे तपस्या केली आहे. त्या तरुणाच्या गुरुची समाधी येथे होती."



त्यानंतर काही दिवसांतच तो तरुण शिरडीतून अदृश्य झाला.

# परमेश्वराचा शोध कुठे घ्यावा?

–श्री. अशोक कडू
उरण, रायगड.

अनादि काळापासून मानवाने परमेश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ईश्वर हा निर्गुण, निराकार असून संपूर्ण विश्व व्यापून राहिला आहे. ज्या दृष्टीने त्याच्याकडे आपण पाहू तसा तो दिसतो. स्वत: ईश्वराच्या रुपात विलीन होऊन ईश्वरच होणे, हीच खरी ईश्वराची कल्पना आहे. एकनाथ महाराजांनी काशी-विश्वेश्वराहून आणलेली पवित्र गंगा तहानलेल्या गाढवाला पाजली आणि त्याचा जीव वाचविला. त्यांना त्या तहानेने व्याकुळ झालेल्या मुक्या जीवात परमेश्वर दिसला. संत सावतामाळी म्हणतात, ''कांदा, मुळा, भाजी अवघि विठाबाई माझी.'' सावतामाळी यांचा विठोबा शेतामध्ये, भाजीपाल्यात होता. त्यांना सर्वत्र पंढरपूरचा विठ्ठलच दिसत होता. ते परमेश्वराच्या रूपात विलीन झाले होते. संत तुकाराम, संत रामदास स्वामी यांनी जनजागृतीकरिता व अन्यायाशी झगडण्यासाठी जनतेला आपल्या कीर्तन-प्रवचनाद्वारे उपदेश केला. अन्यायाने दबलेल्या, पिचलेल्या सर्वसामान्य जनतेत त्यांना परमेश्वर दिसला. ज्ञानेश्वर माऊलींनी तर 'ज्ञानेश्वरी'रूपी अमृताचा कुंभच आपल्यासाठी मागे सोडला आहे. ज्ञानेश्वरीतील प्रत्येक अभंग म्हणजे अंतरंगातील ईश्वराचा आवाज. अंतरंगातील ईश्वरच त्यांच्या मुखातून बोलत होता.

आपल्या महाराष्ट्राच्या पवित्र भूमीमध्ये संत तुकाराम, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर, संत रामदास, संत गोराकुंभार, संत सावतामाळी असे महान पुण्यात्मे होऊन गेले. त्यांनी ईश्वराला पाहिले, एवढेच नव्हे तर ईश्वर त्यांच्याशी बोलत असे. आपल्या अंतरंगातील देवाबद्दल त्यांना पराकाष्ठेचे प्रेम वाटे. त्या प्रेमाने त्यांनी केलेली कवने अमृताहून गोड निघाली आणि सर्वसामान्यांच्या हृदयावर विराजमान झाली, अभंगांच्या रूपाने सर्वांच्या मुखी घोळू लागली.

परमेश्वरप्राप्तीचा मार्ग संतांनी सांगितला आहे. माणसाची परमेश्वरावर नितांत श्रद्धा असली पाहिजे. परंतु त्याअगोदर त्याची स्वत:वर श्रद्धा असायला हवी. श्रद्धेने साध्य होणार नाही असे जगात काहीही नाही. प्रत्येकाने श्रद्धेने वागावे. कोणी कोणाच्या श्रद्धेच्या आड जाऊ नये. दुसऱ्यांची थट्टा, निंदा करू नये. श्रद्धा आणि भक्ती ह्या दोन बहिणी आहेत. परमेश्वरप्राप्तीसाठी श्रद्धेच्या जोडीला भक्तीची अत्यंत आवश्यकता आहे. स्वस्वरूपाची आवड हीच खरी भक्ती. भक्ती हा एक संस्कार आहे. भक्तीने दानवाचा मानव आणि मानवाचा संत होतो. भक्तीचा महिमा असा मोठा आहे की तो बोलून दाखविता येत नाही. तिचा अनुभव ज्याचा त्याने घ्यायचा असतो.

परमेश्वरप्राप्तीसाठी अहोरात्र चिंतन, मनन आणि निष्ठेने कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे. कर्तव्यनिष्ठ होऊन कल्याणकारी कृत्ये करावी. ती करीत असताना मनाने दयाघन प्रभूचे चिंतन करावे. प्रार्थना अंत:करणपूर्वक असावी. प्रार्थनेला अंत:करणाची आवश्यकता असते म्हणून कामाव्यतिरिक्त जो वेळ मिळेल त्यामध्ये मानवाने नामात दंग राहिले पाहिजे. नामाचा महिमा मोठा आहे. नाम हे परमेश्वरप्राप्तीसाठी असून अंतिम मोक्षाला नेणारे एक दिव्य साधन आहे.

सद्गुरुला अनन्यभावाने शरण जाणे, हीसुद्धा एक परमेश्वर पूजाच होय! गुरु हा सद्गुरु असावा. गुरुवचनांवर विश्वास ठेवावा. अंत:करणात जर तळमळ असेल तर गुरुकृपा होतेच. आर्ततेने मारलेली हाक देवापर्यंत पोहचते आणि मग देव माणसाला कोणत्याही रुपात भेटून जातो.

सर्वसामान्यांनी परमेश्वराला कसे प्राप्त करून घ्यावे यासाठी भक्तियोगाची साधना रामदास स्वामी, संत तुकाराम यांनी आपल्या वाङ्मयात सांगितली आहे. रामदास स्वामी म्हणतात, **''आधी प्रपंच करावा नेटका''**. प्रपंच म्हणजे संसार. संसार म्हटला म्हणजे बायकामुले आणि सर्व नातीगोती ही आलीच. प्रपंच चालविण्यासाठी अर्थार्जन करावे लागते. स्वामींनी सावधान म्हटल्याबरोबर खऱ्या अर्थाने सावध होऊन लग्नमंडपातून पळ काढला असला तरी प्रापंचिक माणसांच्या यातना त्यांना पूर्ण ठाऊक होत्या. म्हणून प्रपंच करीत असताना देवाचे नामस्मरण करून परमार्थ साधनेचा त्यांनी सल्ला दिला आहे.

संत ही परमेश्वराची चालती-बोलती सगुण मूर्ती. त्यांनी सांगितलेली कर्तव्ये पार पाडली आणि तत्वांचे आचरण केले तर ईश्वर शोधणे आपणास कठीण जाणार नाही.

संत सांगतात की, ''मानवा, तू तुझ्या कर्तव्याची जाणीव ठेव. श्रद्धायुक्त अंत:करणाने तुझ्या हृदयातील परमेश्वराची तू पूजा बांध. ईश्वराचा संचार सर्वत्र आहे. सद्गुरुच्या कृपाप्रसादाने आत्मप्राप्तीच्या मार्गावर मानवाची प्रगती झपाट्याने होते म्हणून तू सद्गुरुला शरण जा. सर्वश्रेष्ठ अशा मानवता धर्माचे पालन कर. प्रपंच कर; परंतु त्यात आसक्त होऊ नकोस. सर्वांवर प्रेम कर. प्राणीमात्रांवर दया कर. गुरुची भक्ती कर. गुरुभक्तीपेक्षा श्रेष्ठ असे ब्रह्मांडात काहीच नाही. ज्याच्या मुखी गुरुनाम असते तो देहासकटच परब्रह्म होय! गुरुवर निष्ठा ठेव. देहाने, मनाने व अंत:करणाने सद्गुरुला अनन्यभावे शरण जा. म्हणजे तुला खऱ्या परमेश्वराचे दर्शन होईल. ईश्वर त्याचवेळी माणसास भेटेल. माणूस एकदा का परमेश्वरचिंतनात लीन झाला म्हणजे त्याला सर्वत्र, सर्व विश्व व्यापून राहिलेला परमेश्वरच दिसेल.''

# साईनामाचे माहात्म्य

-श्री. अजित गोसावी
बोरीवली, मुंबई.

विश्वाला आपल्या अस्तित्वाची जाणीव परमेश्वर नेहमीच कोणत्या ना कोणत्या रूपाने देत असतो. अतीव सुख-दुःखाच्या या पसाऱ्यात ज्याच्या त्याच्या इच्छेनुसार त्याला ईश्वराचा कृपाकटाक्ष लाभत असतो. मग जसे रोडावलेले रोपटे पाणी घातल्यावर तरारून उठते तशी त्या व्यक्तीची श्रद्धा वाढीस लागते, बहरायला लागते. माणसाचे 'मी'पणाचे पाश तिथे हळूहळू गळून पडायला सुरुवात होते, अहंकार संपू लागतो, तो परमेश्वरस्वरूप होतो; कारण भगवंताच्या कृपादृष्टीचा परिसस्पर्श त्याला होतो आणि मग पांडवांच्या प्रत्येक कार्यास जसा भगवान श्रीकृष्णाचा वरदहस्त होता त्याचप्रमाणे विश्वाच्या अव्याहतपणे चालू असणाऱ्या या मोहमयी रहाटगाड्यास कुणाच्यातरी अलौकिक श्रेष्ठत्वाचा आधार आहे, याची प्रचिती सर्वसामान्यांना येते.

श्री साईंचा अवतारसुद्धा अशाच व्यथा, दैन्य, संकटे यांनी त्रस्त झालेल्या जनसामान्यांसाठी होता. आजही याचा अनुभव ठायीठायी येतो. दूरवरून मंदिर जरी दिसत असले तरी मंदिराच्या अंतर्भागातील कलात्मकता आपल्याला अनोळखी, अपरिचित असते त्याचप्रमाणे शिरडीत पाऊल ठेवल्याखेरीज तेथील साईंच्या भक्तिप्रभावाची कल्पना आपल्याला येणार नाही. व्यावहारिक जीवनाला वैतागलेल्या सर्वसामान्य माणसालाही एक वेगळीच मन:शांती येथे लाभते. साईनामातील गोडवा त्याला आकृष्ट करतो. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांनी पछाडलेले व्यावहारिक जीवन आणि हा वेगळेपणाचा साक्षात्कार यामुळे सत्य नावाची वस्तु यापलीकडे अस्तित्वात नाही, याची जाणीव होते.

भक्तांच्या हाकेला 'ओ' देण्यासाठी साई सदैव तत्पर असतात. कोणतीही साधना करा, पण ती श्रद्धेने आणि भक्तिभावाने करा, असा त्यांचा उपदेश आपल्या भक्तांना होता. 'श्रद्धा' आणि 'सबुरी'ने परमपदाची प्राप्ती साधक सहज करू शकेल, खऱ्या ज्ञानाची, खऱ्या सुखाची योग्य दिशा त्याला याच मार्गाने सापडेल. नामस्मरणाने भक्त आणि ईश्वर यांतील अंतर कमी होते. "हाताने काम व मुखाने अखंड साईनाम" हाच प्रापंचिक जीवनात सुखधामाला पोहोचण्याचा राजमार्ग आहे. साईभक्तांच्या छोट्या-छोट्या इच्छादेखील पूर्ण करतात. प्रसन्न चित्ताने, भक्तिभावाने साईनामाचा जो अभिषेक करतो, त्याच्या जीवनात वसंत बहरून येतो.

भगवंताच्या नामस्मरणासाठी देहाला कष्ट नक्कीच होत नाहीत. फक्त "मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण" या उक्तीप्रमाणे थोड्याफार प्रमाणात का होईना प्रसन्न चित्ताने, शुद्ध अंत:करणाने केलेला नामजप कधीही वाया जात नाही. श्री साई सांगत असत की, "प्रत्येक प्राणीमात्रात, इतकेच नव्हे तर किडमुंगीतही माझ्या अस्तित्वाच्या खुणा आहेत. मी सर्व ठायी व्यापून, भरून राहिलो आहे. त्या दृष्टीने सर्वत्र पहा. जो मला शरण आला आणि वाया गेला, असं घडणं कधीही शक्य नाही."

साईंना जो विनम्रतेने शरण गेला त्याच्या मनोकामना कधीही अपूर्ण राहणार नाहीत. कोणत्यातरी रूपाने साई भक्तांच्या हाकेला धावून येतात, ज्यामुळे भक्ताचे साईप्रेम अधिक दृढ होते, डोळस बनते. मानवी जीवनात अखंड सुख-दुःख भरलेले असून हा असा भवसागर यशस्वीरीत्या पार करायचा असेल तर नामस्मरण हा त्याला एकमेव उपाय आहे. ज्याप्रमाणे गंगेचे उदक कितीही प्राशन केले तरी गंगेला कधी खळी पडत नाही त्याप्रमाणे साईनामाची सरिता अखंडपणे वहात असते. तिला अंत हा नाहीच मुळी. त्यामुळे नामस्मरण जेवढे होईल तेवढे थोडेच. त्याद्वारे लाभणारा आनंद जीवन प्रकाशमय करून सोडतो. साईनामाचे भांडार द्रौपदीच्या अक्षय थाळीसारखे समृद्ध आहे.

साईंचे शिरडी संस्थान अद्वितीय आहे. संस्थानचे कामकाज तर खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. श्री साईंचे मंदिर, मंदिरातील भाविकतेने भारलेले वातावरण येथे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनाला मोहिनी घालतात. भाविकांच्या श्रद्धांचा यथायोग्य आदर येथे होतो. जाती, पंथ, धर्म यांचे बंधन भक्तीच्या आड येत नाही. आरतीच्या वेळी तर प्रचंड जनसमुदाय लोटतो. नकळत हात जोडले जातात. साईंच्या समाधीसमोर मस्तक लीन होते आणि '**नमामीश्वरं सद्गुरु साइनाथम्**' असा साईनामाचा उच्चार मुखातून केव्हा बाहेर पडतो तेच समजत नाही.